पतित नसोन जाला । यातना नसोन पावला । नानापरी ॥ ६ ॥ ऐसा श्रोतयांचा अनुमान । श्रोतीं घेतलें आडरान । आतां याचें समाधान । केलें पाहिजे ॥ ७ ॥ वक्ता म्हणे सावध व्हावें । तुम्हीं बोलतां बरवें । परी हें तुमच्यांच अनुभवें । तुम्हांस घडे ॥ ८ ॥ ज्याचा अनुभव जैसा । तो तो बोलतो तैसा । संपदेविण जो धिवसा । तो निरर्थक ॥ ९ ॥ नाहीं ज्ञानाची संपदा । अज्ञानदारिद्रें आपदा । भोगिल्याच भोगी सदा । शब्दज्ञानें ॥ १० ॥ योगी ओळखावा योगेश्वरें । ज्ञानी ओळखावा ज्ञानेश्वरें । महाचतुर तो चतुरें । वोळखावा ॥ ११ ॥ अनुभवी अनुभवियासीच कळे । अलिप्त अलिप्तपणें निवळे । विदेहाचा देहभाव गळे । विदेही देखतां ॥१२॥ बद्धासारिखा सिद्ध । आणी सिद्धासारिखा बद्ध । येक भावील तो अबद्ध । म्हणावाच नलगे ॥ १३ ॥ झडपला तो देहधारी । आणी देहधारक पंचाक्षरी । परंतु दोघां येकसरी । कैसी द्यावी ॥ १४ ॥ तैसा अज्ञान पतित । आणी ज्ञानी जीवन्मुक्त । दोघे समान मानील तो युक्त । कैसा म्हणावा ॥ १५ ॥ आतां असो हे दृष्टांत । प्रचीत बोलों कांहीं हेत । येथें श्रोतीं सावचित्त । क्षणयेक व्हावें ॥ १६ ॥ जो ज्ञानें गुप्त जाला । जो विवेकें विराला । जो अनन्यपणें उरला । नाहींच कांहीं ॥ १७ ॥ तयास कैसें गवसावें । शोधूं जातां तोचि व्हावें । तोचि होतां म्हणावें । नलगेचि कांहीं ॥ १८ ॥ देहीं पाहतां दिसेना । तत्वें शोधितां भासेना । ब्रह्म आहे निवडेना । कांहीं केल्या ॥ १९ ॥ दिसतो तरी देहधारी । परी कांहींच नाहीं अंतरीं । तयास पाहातां वरिवरी । कळेल कैसा ॥ २० ॥ कळाया शोधावें अंतर । तंव तो नित्यनिरंतर । जयास धुंडितां विकार ।

न गेल्यासारखेंच आहे ! ' कुटून नाहीं कुटिला । रडोन नाहीं रडला । कुंथोन नाहीं कुंथिला । योगेश्वर ' (१–७).
२ उत्तर —बाबारे ! शब्दज्ञानाच्या बळावर तूं व्यर्थ आडरान घेतलें आहेस. 'ज्याचा अनुभव जैसा । तो तो बोलतो तैसा. ' अलिप्त पुरुषच अलिप्ताला, विदेही विदेह्याला पाहून संतोष पावतो. ज्ञानसंपत्तीनें श्रीमंत झालेल्याचें वर्म अज्ञान दरिद्र्याला कळत नसतें. योगी योगेश्वरानें, ज्ञानी ज्ञान्यानें, महाचतुर चतुरानेंच ओळखावा. बद्ध आणि सिद्ध सारखे मानील तो कांहीं तरी अबद्ध बोलतो आहे हें न बोलतांच कळण्यासारखें आहे. पतित आणि जीवनमुक्त एक मानील, त्याची बुद्धि कोणी वर्णावी ? भूतानें झडपला जातो तो मनुष्य व भूत काढणारा पंचाक्षरीही मनुष्यच, म्हणून दोघांची बरोबरी करणाराला शहाणा कोण म्हणेल ? (८–१४) असो. अनुभवाची गोष्ट सांगतों. जो ज्ञानानें गुप्त झाला, विवेकानें स्वस्वरूपीं विराला, जो ब्रह्माशीं अनन्य होऊन देहबुद्धीनें वेगळा उरला नाहीं, त्याला शोधावें म्हणजे शोधणाराही तद्रूपच होऊन जातो, आणि मग असल्या शंकाकुशंका घेण्यास जागा उरत नाहीं. ब्रह्ममय झालेला साधु दिसावा कसा ? तो देहांत दिसत नाहीं, तत्वांत सांपडत नाहीं, ब्रह्मांत वेगळा निवडून घेतां येत नाहीं. देहधारी तर दिसतो, पण अंतरांत कांहींच नाहीं असा होऊन राहिल्यामुळें आढळत नाहीं. त्याचें अंतर शोधावें तर तो निरंतर झालेला, त्याला क्रोधलोभादि विकार सर्व घेऊन धुंडायला जावें तों ते विकारच त्याला सामील होतात म्ह० निर्विकार होतात. असा साधु

निर्विकार होती ॥ २१ ॥ तो परमात्माचि केवळ । तयास नाहीं मायामळ । अखंड हेतूचा विटाळ । जालाच नाहीं ॥ २२ ॥ ऐसा जो कां योगीराज । तो आत्मा सहजीं सहज । पूर्णब्रह्म वेदबीज । देहाकारें कळेना ॥ २३ ॥ देह भांवितां देहचि दिसे । परी अंतर अनारिसें असे । तयास शोधितां नसे । जन्ममरण ॥ २४ ॥ जयास जन्ममरण व्हावें । तें तो नव्हेचि स्वभावें । नाहींच तें आणावें । कोठून कैंचें ॥ २५ ॥ निर्गुणास जन्म कल्पिला । अथवा निर्गुण उडविला । तरी उडाला आणि जन्मला । आपला आपण ॥ २६ ॥ माध्यानीं थुंकितां सूर्यावरी । तो थुंका पडे आपणाचवरी । दुसऱ्यास चिंतितां अंतरीं । आपणास घडे ॥ २७ ॥ समर्थ रायाचें महिमान । जाणतां होतें समाधान । परंतु भुंकों लागलें श्वान । तरी तें श्वानचि आहे ॥ २८ ॥ ज्ञानी तो सत्य स्वरूप । अज्ञान देखे मनुष्यरूप । भावासारिखा फळद्रूप । देव तैसा ॥ २९ ॥ देव निराकार निर्गुण । लोक भाविती पाषाण । पाषाण फुटतो निर्गुण । फुटेल कैसा ॥ ३० ॥ देव सदोदित संचला । लोकीं बहुविध केला । परंतु बहुविध जाला । हें तों घडेना ॥ ३१ ॥ तैसा साधु आत्मज्ञानी । बोधें पूर्ण समाधानी । विवेकें आत्मनिदानीं । आत्मरूपी ॥ ३२ ॥ जळोन काष्ठाचा आकार । अग्नि दिसे काष्ठाकार । परी काष्ठ होईल हा विचार । बोलोंच नये ॥ ३३ ॥ कर्पूर असे तों जळतां दिसे । तैसा ज्ञानी देह भासे । तयास जन्मवितां कैसें । कर्दळीउदरीं ॥ ३४ ॥ बीज भाजलें उगवेना । वस्त्र जळालें उकलेना । वोघ निवाडितां निवडेना । गंगेमध्यें ॥ ३५ ॥ वोघ गंगेमागें दिसे । गंगा येकदेसी असे । साधु कांहींच न भासे । आणी आत्मा सर्वगत ॥ ३६ ॥ सुवर्ण नव्हे

म्ह० मूर्त परमात्माच होय. त्याला मायेचा--हेतूचा विटाळ होत नाहीं. तो सहजींसहज आत्माराम, आकारास आलेलें वेदरहस्यच तें. देहाकडून पहाल तर त्याचा देहच दिसेल. त्याचें अंतर शोधाल तर तेंच तुम्ही होऊन तुमचें जन्ममरण टळेल. जन्ममृत्यु ज्या मायेकरितां देहाच्या मागें लागले आहेत तो देह तो नव्हे, तो निर्गुण ब्रह्मच आहे. निर्गुणाला जन्ममरण कल्पिलें तरी तें त्याला न स्पर्शतां कल्पणाऱ्याच्या मागें लागतें. मध्यान्हकाळीं सूर्यावर थुंकल्यास थुंकणाऱ्याच्याच तोंडावर तो थुंका पडतो, सूर्याला त्याचें काय ? दुसऱ्याचें बरें वाईट चिंतिलें कीं तेंच चिंतणारास होतें. राजाचें ऐश्वर्य पाहून एखादें कुत्रें भुंकूं लागलें तर त्याला काय म्हणावें ? कुत्रेंच तें ! ज्ञानी सत्य ज्ञानस्वरूप असतो, त्याला नेणत्यानें मनुष्यभावानें पाहिलें तर बिघडतें ? ज्याला त्याला आपल्या भावासारखें फळ मिळत असतें (१५–२९). देव व साधु यांच्याविषयीं जशी भावना करावी तसें फळ मिळतें. देव निर्गुण आहे व लोक पाषाण म्हणतात, पण देव पाषाणासारखा फुटत नसतो. देव एक सर्वव्यापी, लोक म्हणतात तो नानात्व पावला आहे ; पण लोकांच्या म्हणण्यामुळें तो एकत्व सोडून बहुविध झाला हें कांहीं होत नाहीं. पूर्णबोधामें समाधान पावलेला साधुही तसाच होय. काष्ठ जळतांना अग्नि काष्ठाच्या आकारासारखा दिसला तरी तो काष्ठ होत नाहीं. ज्ञान्याचा देह कापराच्या खड्यासारखा आहे. कापूर एकदां जळाला कीं पुन्हां कर्दळीउदरीं जन्म पावत नाहीं, तसा ज्ञानी पुन्हां देहाला लगटत नाहीं. भाजलेलें बीज पुन्हां उगवत नाहीं, लुगडें जळालेलें उकलत

लोखंड । साधूस जन्म थोतांड । अज्ञान प्राणी जडमूढ । तयास हें उमजेचिना ॥ ३७ ॥ अंधास कांहींच न दिसे । तरी ते लोक आंधळे कैसे । सन्निपातें बरळतसे । सन्निपाती ॥ ३८ ॥ जो स्वप्नामधें भ्याला । तो स्वप्नभयें वोसणाला । तें भय जागत्याला । केंवि लागे ॥ ३९ ॥ मुळी सर्पाकार देखिली । येक भ्याला येकें वोळखिली । दोघांची अवस्था लेखिली । सारिखीच कैसी ॥ ४० ॥ हातीं धरितांहि डसेना । हें येकासही भासेना । तरी ते तयाची कल्पना । तयासीच बाधी ॥ ४१ ॥ विंचु सर्प डसला । तेणें तोचि जाजावला । तयाचेनि लोक जाला । कासावीस कैसा ॥ ४२ ॥ आतां तुटला अनुमान । ज्ञानियांस कळे ज्ञान । अज्ञानांस जन्ममरण । चुकेचिना ॥ ४३ ॥ येका जाणण्यासाठीं । लोक पडिले अटाटीं । नेणपणें हिंपुटी होती । जन्ममरणें ॥ ४४ ॥ तेंचि कथानुसंधान । पुढें केलें परिच्छिन्न । सावधान सावधान । म्हणे वक्ता ॥ ४५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे निःसंगदेहनिरूपण-नाम समास तृतीय ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥ पृथ्वीमध्य लोक सकळ । येक संपन्न येक दुर्बळ । येक निर्मळ येक वोंगळ । काय निमित्य ॥ १ ॥ कितियेक राजे नांदती । कितीयेक दरिद्र भोगिती । कितीयेकांची उत्तम स्थिती । कितीयेक अधमाधम ॥ २ ॥ ऐसें काय निमत्य जालें । हें मज पाहिजे निरोपिलें । याचें उत्तर ऐकिलें । पाहिजे श्रोतीं ॥ ३ ॥ हे सकळ गुणपासीं गती । सगुण भाग्यश्री भोगिती । अवगुणास दरिद्रप्राप्ती । यदर्थीं संदेह नाहीं ॥ ४ ॥ जो जो जेथें उपजला । तो तो ते वेवसाई उमजला । तयास लोक म्हणती भला । कार्यकर्ता ॥ ५ ॥ जाणता तो कार्य करी । नेणता कांहींच न करी । जाणता तो पोट भरी । नेणता भीक मागे ॥ ६ ॥ हें तों प्रगटचि असे । जनीं

नाहीं, ओहोळ गंगेंत मिळून गेल्यावर पुन्हां ओहोळपणानें सांपडत नाहीं. ओघ गंगेला मिळण्याच्या पूर्वीं तरी असतो म्हणून हा दृष्टांत एकदेशी आहे. साधु आत्मस्वरूपाकार झाला कीं मागेंच कांहीं राहत नाहीं. साधूस जन्म बोलूंच नये. स्वप्नांत भ्यालेला व जागा, सर्पाकार मुळी पाहून एक भ्यालेला व तिला एक ओळखणारा, हे एक नव्हत. सर्प विंचु ज्याला डसतात तोच बरळतो, इतर नव्हे. एक ज्ञान नसल्यामुळें लोक कष्टी होऊन जन्ममृत्यु भोगतात (३०–४५). [द० ९, स० ३]

प्रश्न—पृथ्वीवर अनेक लोक असून एक संपन्न व एक दुर्बळ, एक सोज्वळ व एक ओंगळ, एक उत्तम व एक अधम असा भेद कां झाला ? (१–३) उत्तर—हा भेद गुणांमुळें झाला. गुणी भाग्य भोगतात व अवगुणी दारिद्य भोगतात. जो आपला व्यवसाय समजून जाणतेपणानें करितो त्याला कार्यकर्ता म्हणतात. जाणता कार्य करितो व पोट भरितो, नेणता कांहींच करीत नाहीं व भीक मागतो. विद्यावंत भाग्यास चढतो व विद्याहीन करंटा होतो.

पाहातां प्रत्यक्ष दिसे। विद्येविण करंटा वसे। विद्या तो भाग्यवंत ॥ ७ ॥ आपुली विद्या न सिकसी। तरी काये भीक मागसी। जेथें तेथें बुद्धी ऐसी। वडिलें सांगती ॥ ८ ॥ वडिल आहे करंटा। आणि समर्थ होय धाकुटा। कां जे विद्येनें मोठा। म्हणोनियां ॥ ९ ॥ विद्या नाहीं बुद्धि नाहीं। विवेक नाहीं साक्षेप नाहीं। कुशळता नाहीं व्याप नाहीं। म्हणोन प्राणी करंटा ॥ १० ॥ इतुकेंही जेथें वसे। तेथें वैभवास उणें नसे। वैभव सांडितां अपैसें। पाठीं लागे ॥ ११ ॥ वडिल समर्थ धाकुटा भिकारी। ऐका याची कैसी परी। वडिलाऐसा व्याप न करी। म्हणोनियां ॥ १२ ॥ जैसी विद्या तैसी हांव। जैसा व्याप तैसें वैभव। तोलासारिखा हावभाव। लोक करिती ॥ १३ ॥ विद्या नसे वैभव नसे। तेथें निर्मळ कैंचा असे। करंटपणें वोखटा दिसे। वोंगळ आणी विकारी ॥ १४ ॥ पशु पक्षी गुणवंत। त्यास कृपा करिती समर्थ। गुण नस्तां जिणें व्यथ। प्राणीमात्रांचें ॥ १५ ॥ गुण नाहीं गौरव नाहीं। सामर्थ्य नाहीं महत्व नाहीं। व्याप नाहीं वैभव नाहीं। प्राणीमात्रासीं ॥ १६ ॥ याकारणें उत्तम गुण। तेंचि भाग्याचें लक्षण। लक्षणेंविण अवलक्षण। सहजचि जालें ॥ १७ ॥ जनामध्यें जो जाणता। त्यास आहे मान्यता। कोणी येक विद्या असतां। महत्व पावे ॥ १८ ॥ प्रपंच अथवा परमार्थ। जाणता तोचि समर्थ। नेणता जाणिजे व्यर्थ। निःकारण ॥ १९ ॥ नेणतां विंचु सप डसे। नेणतां जीवघात असे। नेणतां कार्य नासे। कोणी येक ॥ २० ॥ नेणतां प्राणी सिंतरे। नेणपणें तऱ्हे भरे। नेणपणें ठके विसरे। पदार्थ कांहीं ॥ २१ ॥ नेणतां वरी जिंकती। नेणतां अपाई पडती। नेणतां संहारती घडती। जीवनाश ॥ २२ ॥ आपुलें स्वहित

' आपली विद्या शिकत नाहींस तर काय भीक मागणार? असेंच वडिल माणसें मुलांस विचारतात. वडिल करंटा असला तरी धाकटा विद्या शिकून योग्यतेस चढतो. विद्या नाहीं, बुद्धि नाहीं, विवेक नाहीं, साक्षेप (उद्योग) नाहीं, कुशलता नाहीं, व्याप नाहीं म्हणून प्राणी करंटा होतो. हे सर्व गुण अंगीं असल्यावर ऐश्वर्याला काय कमी आहे? नको म्हटलें तरी तें पाठीस लागतें. वडिलाचा व्याप मुलानें चालविला नाहीं तर मुलगा करंटा निघतो. विद्या असेल त्या प्रमाणांत हांव (महत्त्वाकांक्षा), हांवअसल त्या मानानें – वैभव – तोलासारखे लोक वागतात. पशुपक्ष्यांतही गुण असले तर श्रीमंत त्यांचें कौतुक करितात; गुण नसतील तर जिण व्यर्थ होतें. गुण, गौरव, सामर्थ्य, महत्त्व, कौशल्य, तर्क हें पाहिजे. तात्पर्य, उत्तम गुण हेंच भाग्यलक्षण व गुणहीनता हें करंटलक्षण समजावें (४–१७). जाणत्याला मान्यता आहे. कांहीं तरी गुण पाहिजे म्हणजे महत्त्व येतें. प्रपंचांत काय व परमार्थांत काय जाणत्याचें सामर्थ्य चालतें. नेणतां – गर वागणुकीनें – विंचु सर्प डसतात, अपघात किंवा कार्यनाश होतो; नेणतेपणामुळें मनुष्य फसतो, तऱ्हेवाईकपणा करितो, विसराळु होतो; नेणत्याचे डाव शत्रु फसवितो, नेणता संकटांत पडतो, जीवनाशही घडतो (१८–२२). मनुष्यास स्वहित कळत नाहीं

न कळे जना । तेणें भोगिती यातना । ज्ञानेवीण तों अज्ञानां । अधोगती ॥ २३ ॥ मायाब्रह्म जीवशिव । सारासार भावाभाव । जाटिल्यासाठीं होतें वाव । जन्ममरण ॥ २४ ॥ कोण कर्ता निश्चयेंसी । बद्ध मोक्ष तो कोणासी । ऐसें जाणतां प्राणीयांसी । सुटिका घडे ॥ २५ ॥ जाणिजे देव निर्गुण । जाणिजे मी तो कोण । जाणिजे अनन्य लक्षण । म्हणिजे मुक्त ॥ २६ ॥ जितुकें जाणोन सांडिलें । तितुकें दृश्य वोलांडिलें । जाणत्यास जाणतां तुटलें । मूळ मीपणाचें ॥ २७ ॥ न जाणतां कोटीवरी । साधनें केलीं परोपरी । तरी मोक्षास अधिकारी । होणार नाहीं ॥ २८ ॥ मायाब्रह्म वोळखावें । आपणास आपण जाणावें । इतुक्यासाठीं स्वभावें । चुके जन्म ॥ २९ ॥ जाणतां समर्थाचें अंतर । प्रसंगें वर्ते तदनंतर । भाग्य वैभव अपार । तेणेंचि पावे ॥ ३० ॥ म्हणोन जाणणें नव्हे सामान्य । जाणतां होईजे सर्वमान्य । कांहींच नेणतां अमान्य । सर्वत्र करिती ॥ ३१ ॥ पदार्थ देखोन भूत भावी । नेणतें झडपोन प्राण ठेवी । मिथ्या आहे उठाठेवी । जाणते जाणती ॥ ३२ ॥ जाणत्यासी कळे वर्म । नेणत्याचें खोटें कर्म । सकळ कांहीं धर्माधर्म । जाणतां कळती ॥ ३३ ॥ नेणत्यास यमयातना । जाणत्यास कांहींच लागेना । सकळ जाणोन विवंचना । करी तो मुक्त ॥ ३४ ॥ नेणतां कांहीं राजकारण । अपमान करून घेती प्राण । नेणतां कठिण वर्तमान । समस्तांस होय ॥ ३५ ॥ म्हणोनियां नेणणें खोटें । नेणते प्राणी ते करंटे । जाणतां विवरतां तुटे । जन्ममरण ॥ ३६ ॥ म्हणोन अलक्ष करूं नये । जाणणें हाचि उपाय । जाणतां सांपडे सोय । परलोकाची ॥ ३७ ॥ जाणणें सकळांस प्रमाण । मूर्खास वाटे अप्रमाण । परंतु अलिप्तपणाची खूण । जाणतां कळे ॥ ३८ ॥ येक जाणणें करून परतें ।

म्हणून तो यातना भोगतो, नेणतेपणानें (ज्ञान नसल्यानें) अधोगतीस जातो. मायाब्रह्म, जीवशिव, भावअभाव, हे सारे जाणल्यानें (जाटिल्यासाठीं) जन्ममरणांपासून सुटका होते. कर्ता कोण, बंधमोक्षाचें स्वरूप काय, निर्गुण देव कोणता, व त्याला जाणणारा मी कोण, या उभयतांतली अनन्यता कशी हें सर्व जाणल्यानें मुक्ति होते. जितकें जाणून सोडलें तितक्या दृश्याच्या बंधांतून हा सुटतो, व जाणत्यास जाणलें म्हणजे अहंकार निःशेष गळतो. कोट्यवधि साधनें केलीं आणि जाणत्यास जाणलें नाहीं तर मोक्षाधिकार प्राप्त होत नाहीं. मायाब्रह्म ओळखावें, आपण कोण हें पहावें म्हणजे जन्मदुःख दूर होतें. समर्थाचें अंतर जाणून प्रसंगाप्रमाणें वागतां आलें तरच वैभव मिळतें. म्हणून जाणणें ही सामान्य गोष्ट नाहीं (२३–३१). एखादा पदार्थ पाहिला व हें भूत आहे असें मनांत शिरलें कीं मनुष्य झडपला जाऊन प्राणास मुकतो. अशीं नेणत्यांचीं उदाहरणें थोडीं नाहींत. जाणता वर्म जाणून घेतो. नेणत्याच्या मागें यमयातनेपर्यंतचीं सर्व दुःखें लागतात, जाणता हरप्रयत्नानें सुटून जातो. राजकारण न जाणतां केलें तर प्राणास मुकावें लागतें, कठिण प्रसंग येतात. तात्पर्य, नेणणें खोटें व नेणते प्राणी करंटे. म्हणून जाणतेपण धरावें, जाणणें हाच उपाय. जाणतां प्रपंच, राजकारण, परमार्थ सर्व कांहीं साध्य होतें. सर्व कार्य करून अलिप्त कसें रहावें हें जाणत्यासच कळतें. एक जाणणें सोडून (ज्ञानावांचून) सोडविण्यास कोण

कोण सोडील प्राणियांतें । कोणी येक कार्य जें तें । जाटिल्याविण न कळे ॥ ३९ ॥ जाणणें म्हणिजे स्मरण । नेणणें म्हणिजे विस्मरण । दोहींमध्यें कोण प्रमाण । शाहाणे जाणती ॥ ४० ॥ जाणते लोक ते शाहाणे । नेणते वेडे दैन्यवाणे । विज्ञान तेंही जाणपणें । कळों आलें ॥ ४१ ॥ जेथें जाणपण खुंटलें । तेथें बोलणेंही तुटलें । हेतुरहित जालें । समाधान ॥ ४२ ॥ श्रोते म्हणती हें प्रमाण । जालें परम समाधान । परी पिंडब्रह्मांड ऐक्यलक्षण । हें निरोपावें ॥ ४३ ॥ ब्रह्मांडीं तेंचि पिंडीं असे । बहुत बोलती ऐसें । परंतु याचा प्रत्यय विलसे । ऐसें केलें पाहिजे ॥ ४४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्य-संवादे जाणपणनिरूपणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ पिंडासारिखी ब्रह्मांडरचना । न ये आमुच्या अनुमाना । प्रचित पाहातां नाना । मतें भांबावती ॥ १ ॥ जें पिंडीं तेंचि ब्रह्मांडीं । ऐसी बोलावयाची प्रौढी । हें वचन घडीनें घडी । तत्वज्ञ बोलती ॥ २ ॥ पिंड ब्रह्मांड येक राहाटी । ऐसी लोकांची लोकधाटी । परी प्रत्ययाचे परीपाटीं । तगों न सके ॥ ३ ॥ स्थूळ सूक्ष्म कारण महाकारण । हे पिंडींचे च्यारी देह जाण । विराट हिरण्य अव्याकृत मूळप्रकृती हे खूण । ब्रह्मांडींची ॥ ४ ॥ हे शास्त्रधाटी जाणावी । परी प्रचीत कैसी आणावी । प्रचीत पाहातां गथागोवी । होत आहे ॥ ५ ॥ पिंडीं आहे अंतःकरण । तरी ब्रह्मांडीं विष्णु जाण । पिंडीं बोलिजेतें मन । तरी ब्रह्मांडीं चंद्रमा ॥ ६ ॥ पिंडीं बुद्धी ऐसें बोलिजे । तरी ब्रह्मांडीं ब्रह्मा ऐसें जाणिजे । पिंडीं चित्त ब्रह्मांडीं वोळखिजे । नारायणु ॥ ७ ॥ पिंडीं बोलिजे अहंकार । ब्रह्मांडीं रुद्र हा निर्धार । ऐसा बोलिला विचार । शास्त्रांतरीं ॥ ८ ॥ तरी कोण विष्णूचें अंतःकरण । कैसें चंद्राचें मन । ब्रह्मयाचें बुद्धिलक्षण । मज निरोपावें ॥ ९ ॥ नारायणाचें कैसें चित्त । रुद्र

समर्थ आहे ? कोणतेंच काम जाणल्यावांचून होत नाहीं. जाणणें म्ह० स्वस्वरूपाचें स्मरण व नेणणें म्ह० स्वस्वरूपाचें विस्मरण. जाणते ते शहाणे व नेणते ते वेडे दैन्यवाणे. जाणतेपणानेंच ज्ञानाचें विज्ञान (स्वरूपस्थिति) होते. ज्या ब्रह्म-स्वरूपाच्या ठिकाणीं जाणणें (ज्ञान) खुंटतें तेथें हें बोलणेंही संपतें व सहजसमाधान प्राप्त होतें (३२-४४). [द० ९, स० ४]

जें पिंडीं तें ब्रह्मांडीं किंवा पिंडासारखी ब्रह्मांडरचना असें बोलण्यांत येतें त्याचें मर्म काय तें सांगतों. स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण असे पिंडाचे चार देह व विराट, हिरण्य, अव्याकृत व मूळ प्रकृति हे ब्रह्मांडाचे चार देह. आतां याची प्रचीत पाहावी (१–५). ब्रह्मांडांत ज्यांना विष्णु, चंद्र, ब्रह्मा, नारायण व रुद्र म्हणतात, तेच पिंडांत अनुक्रमें अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त व अहंकार हे आहेत (६–८). सिंहापुढें श्वान तसें प्रचीतनिश्चयापुढें अनुमान आहे. म्हणून ब्रह्मादिदेवांचीं अंतःकरणपंचकें आम्हांस सांगा असें म्हणेल तर, ज्याला या

अहंकारचा हेत । हा विचार पाहोन नेमस्त । मज निरोपावा ॥ १० ॥ प्रचीतनिश्चयापुढें अनुमान । जैसें सिंहापुढें आलें श्वान । खऱ्यापुढें खोटें प्रमाण । होईल कैसें ॥ ११ ॥ परी यास पारखी पाहिजे । पारखीनें निश्चय लाहिजे । परीक्षा नस्तां राहिजे । अनुमानसंशई ॥ १२ ॥ विष्णु चंद्र आणी ब्रह्मा । नारायण आणी रुद्रनामा । यां पांचांचीं अंतःकर्णपंचकें आम्हां । स्वामी निरोपावीं ॥ १३ ॥ येथें प्रचित हें प्रमाण । नलगे शास्त्राचा अनुमान । अथवा शास्त्रीं तरी पाहोन । प्रत्ययो आणावा ॥ १४ ॥ प्रचितीवीण जें बोलणें । तें अवघेंचि कंटाळवाणें । तोंड पसरून जैसें सुणें । रडोन गेलें ॥ १५ ॥ तेथें काय हो ऐकावें । आणी काय शोधून पाहावें । जेथें प्रत्ययाच्या नांवें । शून्याकार ॥ १६ ॥ आवघे आंधळेचि मिळाले । तेथें डोळसाचें काय चाले । अनुभवाचे नेत्र गेले । तेथें अंधकार ॥ १७ ॥ नाहीं दुग्ध नाहीं पाणी । केली विष्ठेची सारणी । तेथें निवडावयाचे धनी । ते येक डोंबकाउळे ॥ १८ ॥ आपुले इच्छेनें बोलिलें । पिंडाऐसें ब्रह्मांड कल्पिलें । परी तें प्रचीतीस आलें । कोण्याप्रकारें ॥ १९ ॥ म्हणोन हा अवघाच अनुमान । अवघें कल्पनेचें रान । भलीं न घ्यावें आडरान । तस्करीं घ्यावें ॥ २० ॥ कल्पून निर्मिले मंत्र । देव ते कल्पनामात्र । देव नाहीं स्वतंत्र । मंत्राधीन ॥ २१ ॥ येथें न बोलतां जाणावें । बोलणें विवेका आणावें । आंधळें पाउलीं वोळखावें । विचक्षणें ॥ २२ ॥ जयास जैसें भासलें । तेणें तसें कवित्व केलें । परी हें पाहिजे निवडिलें । प्रचीतीनें ॥ २३ ॥ ब्रह्यानें सकळ निर्मिलें । ब्रह्यास कोणें निर्माण केलें । विष्णूनें विश्व पाळिलें । विष्णूस पाळिता कवणु ॥ २४ ॥ रुद्र विश्वसंव्हार कर्ता । परी कोण रुद्रास संव्हारिता । कोण काळाचा नियंता । कळला पाहिजे ॥ २५ ॥ याचा कळेना विचार । तों अवघा अंधकार । म्हणोनियां सारासार । विचार करणें ॥ २६ ॥ ब्रह्मांड स्वभावेंचि जालें । परंतु हें पिंडाकार कल्पिलें । कल्पिलें परी प्रत्यया आलें । नाहीं

विषयाबद्दल जें वाटलें तें त्यानें कवित्व केलें आहे—याचा मुख्य विचार असा करायचा आहे कीं ज्या मंत्रांनीं देवांची आपण प्राणप्रतिष्ठा करितों ते मंत्र व ते देव कल्पनेचे आहेत. ‘ कल्पून निर्मिले मंत्र । देव ते कल्पनामात्र ’ हें न बोलतां जाणावें. ब्रह्यानें सकळ निर्मिलें पण त्याचा निर्माणकर्ता कोण ? विष्णूनें विश्व पाळिलें पण त्याचा पालक कोण ? रुद्र विश्वाचा संहारकर्ता पण त्यास संहारकर्ता कोण हें कळलें पाहिजे. हें नीट कळत नाहीं तोंवर सगळा अंधकार आहे. ब्रह्मांड स्वभावेंचि झालें आहे, याचा कोणी कर्ता असून त्यानें तें सहेतुक केलें आहे असें नाहीं. ब्रह्मांड हें पिंडासारखें आहे अशी कल्पना केली आहे पण त्याचा कोणास प्रत्यय आला आहे असें नाहीं. औट कोटि भूतावळी व तितकेच मंत्र व तीर्थें आहेत,

कदा ॥ २७ ॥ पाहातां ब्रह्मांडाची प्रचिती । कित्येक संशय उठती । हें कल्पनिक श्रोतीं । नेमस्त जाणावें ॥ २८ ॥ पिंडासारिखी ब्रह्मांडरचना । कोण आणितो अनुमाना । ब्रह्मांडीं पदार्थ नाना । ते पिंडीं कैंचे ॥ २९ ॥ औट कोटी भूतावळी । औट कोटी तीर्थावळी । औट कोटी मंत्रावळी । पिंडीं कोठें ॥ ३० ॥ तेतीस कोटी सुरवर । अठ्यासि सहस्र ऋषेश्वर । नवकोटी कात्यायणीचा विचार । पिंडीं कोठें ॥ ३१ ॥ च्यामुंडा छपन्न कोटी । कित्येक जीव कोट्यानुकोटी । चौऱ्यांसी लक्ष योनीची दाटी । पिंडीं कोठें ॥ ३२ ॥ ब्रह्मांडीं पदार्थ निर्माण जाले । पृथगाकारें वेगळाले । तेहि तितुके निरोपिले । पाहिजेत पिंडीं ॥ ३३ ॥ जितुक्या औषधी तितुकीं फळें । नाना प्रकारीं रसाळें । नाना बीजें धान्यें सकळें । पिंडीं निरोपावीं ॥ ३४ ॥ हें सांगतां पुरवेना । तरी उगेंची बोलवेना । बोलिणें न येतां अनुमाना । लाजिरवाणें ॥ ३५ ॥ तरी हें निरोपिलें नवचे । फुकट बोलतां काय वेंचे । याकारणें अनुमानाचें । कार्य नाहीं ॥ ३६ ॥ पांच भूतें ते ब्रह्मांडीं । आणी पांचचि वर्तती पिंडीं । याची पाहावी रोकडी । प्रचीत आतां ॥ ३७ ॥ पांचा भूतांचें ब्रह्मांड । आणी पंचभूतिक हें पिंड । यावेगळें तें उदंड । अनुमानज्ञान ॥ ३८ ॥ जितुकें अनुमानाचें बोलणें । तितुकें वमनप्राये त्यागणें । निश्चयात्मक तेंचि बोलणें । प्रत्ययाचें ॥ ३९ ॥ जेंवि पिंडीं तेंचि ब्रह्मांडीं । प्रचीत नाहीं कीं रोंकडी । पंचभूतांची तांतडी । दोहींकडे ॥ ४० ॥ म्हणोनि दोहींचें थानमान । हा तो अवघाचि अनुमान । आतां येक समाधान । मुख्य तें कैसें ॥ ४१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अनुमाननिरसननाम समास पंचम ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥ आकाश जैसें निराकार । तैसा ब्रह्माचा विचार । तेथें वायोचा विकार । मूळमाया ॥ १ ॥ हें दासबोधीं असे बोलिलें । ज्ञानदशकीं

हीं सर्व पिंडांत कोठें आहेत ? तेतीस कोटि सुरवर, अठ्यांसी सहस्र ऋषीश्वर, चौऱ्यांशीं लक्ष योनी, नाना औषधीं, फळें, बीजें, धान्यें ब्रह्मांडांत आहेत तीं सारीं पिंडांत कोठें आहेत हें कांहीं सांगतां पुरवणार नाहीं. तात्पर्याकडे लक्ष द्यावें. अनुमानाचें सांगणें काय कामाचें ? मुख्य सारासार विचार पाहिला पाहिजे. आडरानांत शिरूं नये, प्रत्यय पहावा. प्रत्यय तर एवढाच आहे कीं पंचभूतांचें ब्रह्मांड आहे व पिंडही पंचभूतात्मकच आहे, यावेगळें जें जें बोलणें तें तें अनुमानाचें होईल. अनुमानाचें बोलणें वमनप्राय त्यागावें. पिंडब्रह्मांडाच्या देहाचें स्थानमान, रचना व तदंतर्गत पदार्थ, देवता इ० जें कांहीं बोलणें होतें तें सारें अनुमानाचें आहे. परमार्थास त्याचें महत्त्व नाहीं ब्रह्मांड तसेंच पिंड पंचभूतात्मक आहे व दोन्हीं नाशवंत आहेत हें जाणून समाधान पहावें (९–४१). [द० ९, स० ५].

निराकार आकाशांत जसा वायूचा विकार तशी निर्गुणब्रह्माच्या ठिकाणीं मूळमाया हें मागें स्पष्ट सांगितलें असून

प्रांजळ केलें । मूळमायेंत दाखविलें । पंचभूतिक ॥ २ ॥ तेथें जाणीव तो सत्वगुण । मध्य तो रजोगुण । नेणीव तमोगुण । जाणिजे श्रोतीं ॥ ३ ॥ म्हणाल तेथें कैंची जाणीव । तरी ऐका याचा अभिप्राव । पिंडीं महाकारण देहीं सर्व-। साक्षिणी अवस्था ॥ ४ ॥ तैसी मूळप्रकृती ब्रह्मांडींचें । महाकारण देह साचें । म्हणोन तेथें जाणीवेचें । आधिष्ठान आलें ॥ ५ ॥ असो मूळमायेभीतरीं । गुप्त त्रिगुण वास करी । स्पष्ट होती संधीं चतुरीं । जाणावी गुणक्षोभिणी ॥ ६ ॥ जैसा तृणाचा पोटराकळा । पुढें उकलोन होय मोकळा । तैसी मूळमाया अवलीळा । गुणाप्रसवली ॥ ७ ॥ मूळमाया वायो-स्वरूप । ऐक गुणक्षोभिणीचें रूप । गुणविकार होतांचि अल्प । गुणक्षोभिणी बोलिजे ॥ ८ ॥ पुढें जाणीव मध्यस्त नेणीव । मिश्रित चालिला स्वभाव । तेथें मातृकास ठाव । शब्द जाला ॥ ९ ॥ तो शब्दगुण आकाशींचा । ऐसा अभिप्राव येथींचा । शब्देंचि वेदशास्त्रांचा । आकार जाला ॥ १० ॥ पंचभूतें त्रिगुणाकार । अवघा वायोचा विकार । जाणीवनेणीवेचा विचार । वायोचिकरितां ॥ ११ ॥ वायो नस्तां कैंची जाणीव । जाणीव नस्तां कैंची नेणीव । जाणीवनेणीवेस ठाव । वायोगुणें ॥ १२ ॥ जेथें मुळींच नाहीं चळण । तेथें कैंचें जाणीवलक्षण । म्हणोनि वायोचा गुण । नेमस्त जाणावा ॥ १३ ॥ येकापासून येक जालें । हें येक दिसोन आलें । स्वरूप मुळींच भासलें । त्रिगुणभूतांचें ॥ १४ ॥ असो हा मूळमायेचा कर्दमु । पुढें स्पष्टतेचा अनुक्रमु ।

मूळमायेंतच पंचभौतिक दाखविलें आहे. आतां मूळमायेंतच जाणीव म्ह० सत्त्वगुण, नेणीव म्ह० तमोगुण व कांहीं जाणीव कांहीं नेणीव म्ह० रजोगुण असे तीन गुणही सूक्ष्मरूपानें आहेत हें पाहिलें पाहिजे. पिंडाचा महाकारणदेह जशी सर्वसाक्षिणी तूर्या अवस्था त्याप्रमाणें ब्रह्मांडाचा महाकारणदेह मूळमाया. तुर्येप्रमाणेंच मूळमायेंतही जाणीव आहे. मूळमायेत त्रिगुण गुप्त आहेत पण ते स्पष्ट होतांच तिला गुणक्षोभिणी किंवा गुणमाया म्हणतात (१-६). तृणाचा पोटरा आलेला कळा म्ह० उमलण्यापूर्वीचें कणीस. (पोटरा = गाभा, गर्भ. पोटरा कळा = गर्भांत असलेलें कणीस. 'पीक पोटऱ्यांत आलें' ही शेतकऱ्यांची भाषा आहे). कणीस जसें उकलून बाहेर पडतें तशी मूळमाया उकलून – प्रगटतेस येऊन – गुणांला प्रसवते, अर्थात् वायुस्वरूप मूळमायेचें अधिक व्यक्त स्वरूप म्हणजे गुणमाया होय (७–८). गुणमायेपासून जाणीव म्ह० सत्त्वगुण, मध्यस्थ म्ह० जाणीव – नेणीव – म्ह० रजोगुण व नेणीव म्ह० तमोगुण – असा मिश्रित स्वभाव चालला व या गुणांच्या ठायीं अकार, उकार, मकार अशा अ-उ-म् (व अर्धमात्रा) म्ह० ॐ अशा मात्रांचा शब्द-ध्वनि उत्पन्न झाला. तो शब्दगुण आकाशाचा व शब्दामुळेंच वेदशास्त्रें आकाराला आलीं. शब्द हा आकाशाचा गुण असल्यामुळें तेथें ॐ असा मात्रामय शब्द निर्माण झाला. अर्थात् आकाशापासून वायु, वायूपासून अग्नि, अग्निपासून पाणी व पाण्यापासून पृथ्वी अशा क्रमानें पंचभूतें निर्माण झालीं. 'पंचभूतें त्रिगुणाकार । अवघा वायूचा विकार' म्ह० त्रिगुणमिश्रित पंचभूतें म्ह० अष्टधा प्रकृति ही मुळीं वायुस्वरूप आहे. वायूच्या चळणामुळेंच जाणीव (सत्वगुण) व जाणीव नाहीं म्हणून नेणीव (तमोगुण) व उभयसंगतीनें रजोगुण असे तीनही गुण वायूच्या चळणामुळेंच दिसून येतात. आकाशापासून वायु, इ० पंचभूतांचा क्रम दिसोन येतो पण 'स्वरूप मुळींच भासलें । त्रिगुण भूतांचें' म्ह० तीन गुण व पंचभूतें मिळून जी अष्टधाप्रकृति तिचें स्वरूप मुळींच म्ह० वायुरूप मूळमायेच्याच ठिकाणीं आहे. असा हा त्रिगुणपंचभूतांचा कर्दम मूळमायेंतच

सांगतां येकापासून येक उगमु । हेंही खरें ॥ १५ ॥ वायोचा कर्दम बोलिला । तयापासून अग्नि जाला । तोहि पाहातां देखिला । कर्दमुचि ॥ १६ ॥ अग्नीपासून जालें आप । तेंही कर्दमस्वरूप । आपापासून पृथ्वीचें रूप । तेंही कर्दमरूपी ॥ १७ ॥ येथें आशंका उठिली । भूतांस जाणीव कोठें देखिली । तरी भूतांत जाणीव हे ऐकिली । नाहीं वार्ता ॥ १८ ॥ जाणीव म्हणिजे जाणतें चळण । तेंचि वायोचें लक्षण । वायोअंगीं सकळ गुण । मागां निरोपिले ॥ १९ ॥ म्हणोनी जाणीवनेणीवमिश्रित । अवघें चालिलें पंचभूत । म्हणोनियां भूतांत । जाणीव असे ॥ २० ॥ कोठें दिसे कोठें न दिसे । परी तें भूतीं व्यापून असे । तीक्ष्ण बुद्धि करितां भासे । स्थूळ सूक्ष्म ॥ २१ ॥ पंचभूतें आकारलीं । भूतीं भूतें कालवलीं । तरी पाहातां भासलीं । येक स्थूळ येक सूक्ष्में ॥ २२ ॥ निरोधवायो न भासे । तैसी जाणीव न दिसे । न दिसे परी ते असे । भूतरूपें ॥ २३ ॥ काष्ठीं अग्नी दिसेना । निरोधवायो भासेना । जाणीव तैसी लक्षेना । येकायेकीं ॥ २४ ॥ भूतें वेगळालीं दिसती । पाहातां येकीं येक भासती । बहुत धूर्तपणें प्रचीती । वोळखावी ॥ २५ ॥ ब्रह्मापासून मूळमाया । मूळमायेपासून गुणमाया । गुणमायेपासून तया । गुणास जन्म ॥ २६ ॥ गुणापासूनियां भूतें । पावलीं स्पष्ट दशेतें । ऐसियांचीं रूपें समस्तें । निरोपिलीं ॥ २७ ॥ आकाश गुणापासून जालें । हें कदापी नाहीं घडलें । शब्दगुणास कल्पिलें । आकाश वायां ॥ २८ ॥ येक सांगतां येकचि भावी । उगीच करी गथागोवी । तया वेडियाची उगवी । कोणें करावी ॥ २९ ॥ सिकविल्यांहि कळेना । उमजवि-

आहे, व जें बीजांत आहे तेंच वृक्षांत उमटतें हा न्याय प्रसिद्धच आहे, पंचभूतांचा कर्दम मूळमायेंतच असल्यामुळें पुढें जीं आकाश, वायु, अग्नि, आप व पृथ्वी हीं भूतें झालीं त्या प्रत्येक भूतांत इतर चार भूतांचा अंतर्भाव असल्यामुळें पांचही भूतें कर्दमरूप (मिश्रित) आहेत हें ओघानेंच आलें (९–१७). पंचभूतांतही जाणीव आहे, कोठें सूक्ष्म आहे व कोठें स्थूल आहे, पण ती नाहीं असें म्हणतां येत नाहीं. काष्ठांत अग्नि दिसत नाहीं किंवा निरोधवायु (न हालणारा वायु) भासत नाहीं म्हणून तो नाहीं म्हणतां येत नाहीं त्याप्रमाणें पंचभूतांत जाणीव म्ह. सत्त्वगुण (अर्थात् पुढचे रजोगुण व तमोगुणही) भासत नाहीं व म्हणून नाहीं म्हणतां येत नाहीं. त्याप्रमाणेंच प्रत्येक भूतांत इतर भूतांचे अंश आहेत, त्याप्रमाणें त्रिगुणही आहेत. भूतें भिन्नभिन्न दिसतात पण विचारानें पाहतां एकच आहेत (१८–२५). “ ब्रह्मापासून मूळमाया, तिच्यापासून गुणमाया, गुणमायेपासून त्रिगुण, गुणांपासून स्पष्टतेस आलेलीं पंचभूतें, असा क्रम आपण सांगतां ; त्यावरून ‘ गुणांपासून भूतें जालीं ’ असें म्हटल्यानें आकाश हेंही अर्थात् गुणापासून झालें असाच आपला अभिप्राय दिसतो. पण आकाश गुणांपासून झालें हें म्हणणें योग्य वाटत नाहीं, कां कीं ‘ शब्दगुणमाकाशम् ’ म्हणजे शब्द हा आकाशाचा गुण आहे असें जें शास्त्र सांगतें तें काय खोटें आहे ? ” (२६–२८) अशी श्रोत्यानें शंका घेतली. यावर समर्थ म्हणतात कीं सांगावें एक व यानें मनांत घ्यावें दुसरेंच ; अशा श्रोत्यांची समजूत पाडणें कठिण आहे ! शिकविल्यावरही ज्याला कळत नाहीं, समजूत पाडल्यावरही पडत

त्यांही उमजेना । दृष्टांतेंही तर्केना । मंदरूपी ॥ ३० ॥ भूतांहून भूत थोर । ह्माहि दाविला विचार । परी भूतांवडिल स्वतंत्र । कोण आहे ॥ ३१ ॥ जेथें मूळमाया पंचभूतिक । तेथें काय राहिला विवेक । मूळमायेपरतें येक । निर्गुणब्रह्म ॥ ३२ ॥ ब्रह्मीं मूळमाया जाली । तिची लीळा परीक्षिली । तंव ते निखळ वोतली । भूतें त्रिगुणांची ॥ ३३ ॥ भूतें विकारवंत चत्वार । आकाश पाहातां निर्विकार । आकाश भूत हा विचार । उपाधीकरितां ॥ ३४ ॥ पिंडीं व्यापक म्हणोन जीव । ब्रह्मांडीं व्यापक म्हणोन शिव । तैसाच आहे अभिप्राव । आकाशाचा ॥ ३५ ॥ उपाधीमध्यें सांपडलें । सूक्ष्म पाहातां भासलें । इतुक्यासाठीं आकाश जालें । भूतरूप ॥ ३६ ॥ आकाश अवकाश तो भकास । परब्रह्म तें निराभास । उपाधी नस्तां जें आकाश । तेंचि ब्रह्म ॥ ३७ ॥ जाणीव नेणीव मध्यमान । हेंचि गुणाचें प्रमाण । येथें निरोपिले त्रिगुण । रूपेंसहित ॥ ३८ ॥ प्रकृती पावली विस्तारातें । पुढें येकाचें येकचि होतें । विकारवंताचि तयातें । नेम कैंचा ? ॥ ३९ ॥ काळें पांढरें मेळवितां । पारवें होय तत्वतां । काळें पिवळें मेळवितां । हिरवें होय ॥ ४० ॥ ऐसे रंग नानापरी । मेळवितां पालट धरी । तैसें दृश्य हें विकारी । विकारवंत ॥ ४१ ॥ येका जीवनें नाना रंग । उमटों लागती तरंग । पालटाचा लागवेग । किती म्हणोन पाहावा ॥ ४२ ॥ येका उदकाचे विकार । पाहातां दिसती अपार । पांचा भूतांचे विस्तार । चौऱ्यांसी लक्ष योनी ॥ ४३ ॥ नाना देहाचें बीज उदक । उदकापासून सकळ लोक । किडा

नाहीं, दृष्टांतानेंही उमज पडत नाहीं अशा मंद श्रोत्याला सांगावें तरी कसें ? पंचभूतें एकापेक्षां एक वरचढ आहेत हेंही आम्हीं सांगितलें आहे, पण भूतांहून वरिष्ठ कोण आहे ? मूळमाया मूळांत पंचभूतात्मक अर्थात् मिथ्या आहे व तिच्या पलीकडे एक निर्गुण ब्रह्म आहे, ब्रह्मीं मूळमाया झाली तिचा विचार पाहिला म्हणजे ती भूतें व त्रिगुण यांची ओतीव मूस आहे असेंच ठरतें. आतां पृथ्वी, आप, तेज व वायु हीं चार भूतें विकारवंत आहेत व आकाश हें निर्विकार आकाशाचा भूतांत अंतर्भाव केला तो केवळ उपाधीसाठीं केला आहे, आकाश हें वास्तविक भूत आहे असें नव्हे. पिंडाच्या उपाधीसाठीं जीव व ब्रह्मांडाच्या उपाधीसाठीं शिव असें सांगितलें म्हणून 'जीव' व 'शिव' सत्यार्थानें पाहायला जाणें वेडेपणाचें आहे, तसें उपाधीस्तव आकाश भूतांत धरिलें म्हणून इतर चार भूतांप्रमाणें तेंही गुणापासून झालें असें समजणें गैर आहे (२९–३५). उपाधीमुळें व भासरूप असल्यामुळेंच आकाश भूतांत गणिलें जातें. आकाश = अवकाश = भकाश=भासरूप म्ह० शून्य. आकाश भासरूप व ब्रह्म निराभास. उपाधी आहे म्हणून आकाशाला भूत म्हणायचें, नाहींतर उपाधिरहित आकाश तेंच ब्रह्म होय (३६–३७). जाणीव (सत्व), जाणीवनेणीव (रज) व नेणीव (तम) हें गुणांचें प्रमाण होय, व या गुणांत गुणरूपेंही आलीं असें जाणावें. अष्टधाप्रकृति बोलून चालून विकारवंत. तिच्यांत एकापासून अनेक झाले त्याचा ताळमेळ कसा ठेवायचा ? काळ्यांत पांढरा रंग मिळविला कीं पारवा होतो व पिंवळा मिळविला कीं हिरवा होतो, असे अनेक रंग होतात. तसेंच दृश्य (प्रकृति) अनंत विकारांना प्रसवते. एका पाण्यावर अनेक तरंग येऊन अनेक रंग होतात; नित्य पालटणाऱ्या या विकारी दृश्याबद्दल काय सांगावें ? एका उदकांतून अनेक विकारांचा तसा पंचभूतांतून ८४ लक्ष योनींचा उद्भव झाला. उदकापासून अनंत देह झाले. किडा, मुंगी,

मुंगी श्वापदादिक । उदकेंचि होय ॥ ४४ ॥ शुक्लीत शोणीत म्हणिजे नीर । त्या नीराचें हें शरीर । नखें दंत अस्थिमात्र । उदकाच्या होती ॥ ४५ ॥ मुळ्यांचे बारीक पागोरे । तेणें पंथें उदक भरे । त्या उदकेंचि विस्तारे । वृक्षमात्र ॥ ४६ ॥ अंबेवृक्ष मोहरा आले । अवघे उदकाकरितां जाले । पानीं फुलीं फळीं लगडले । सावकास ॥ ४७ ॥ खोड फोडून आंबे पाहातां । तेथें दिसेना सर्वथा । खांद्या फोडून फळें पाहातां । वोलीं सालें ॥ ४८ ॥ मुळापासून सेवटवरी । फळ नाहीं तदंतरीं । जळरूप फळ चतुरीं । विवेकें जाणावें ॥ ४९ ॥ तेंचि जळ सेंड्या चढे । तेव्हां वृक्षमात्र लगडे । येकाचें येकचि घडे । येणें प्रकारें ॥ ५० ॥ पत्रें पुष्पें फळें भेद । किती करावा अनुवाद । सूक्ष्म दृष्टीनें विशद । होत आहे ॥ ५१ ॥ भूतांचे विकार सांगों किती । क्षणक्षणां पालटती । येकाचे येकचि होती । नाना वर्ण ॥ ५२ ॥ त्रिगुणभूतांची लटपट । पाहों जातां हे खटपट । बहु रूप बहु पालट । किती म्हणोन सांगावा ॥ ५३ ॥ ये प्रकृतीचा निरास । विवेकें करावा सावकास । मग परमात्मा परेश । अनन्यभावें भजावा ॥ ५४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे गुणरूपनिरूपणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ आधीं स्थूळ आहे येक । तरी मग अंतःकरणपंचक । जाणतेपणाचा विवेक । स्थूळाकरितां ॥ १ ॥ तैसेंचि ब्रह्मांडेंवीण कांहीं । मूळमायेसि जाणीव नाहीं । स्थूळाच्या आधारें सर्वहि । कार्य चाले ॥ २ ॥ तें स्थूळचि नस्तां निर्माण । कोठें राहेल अंतःकरण । ऐसा श्रोतीं केला प्रश्न । याचें उत्तर ऐका ॥ ३ ॥ कोसले अथवा कांटेघरें ।

पशु आदिकरून सर्व जीव एका उदकापासून आले. पुरुषाचें शुक्र (रेत) व स्त्रियांचें शोणित (रक्त) म्हणजे उदकच. तेव्हां मनुष्ययोनी उदकापासूनच झाली असल्याचें उघड आहे. नखें, दंत, अस्थि सर्व उदकापासूनच. मुळ्यांच्या बारीक पांगोऱ्यांतून उदक भरून वृक्ष निर्माण होतात. आंब्याच्या झाडांना मोहर येतो, पान, फूल, फळ हे सर्व विकार उदकाचेच. आंबा फोडून पाहिला किंवा खांद्यांचे ढलपे काढले, किंबहुना मूळापासून अग्रापर्यंत पाहिलें तरी फळ जळरूपच आहे असें विवेकानें समजतें. तेंच जळ शेंड्यापर्यंत चढलें व अनंत आंबे लगटले म्हणजे एकाचे अनंत घडल्याचें पाहून कौतुक वाटतें. पत्रपुष्पफलादि किती प्रकार एका उदकाचे होतात ? सूक्ष्म दृष्टि घालून पाहतां हें सर्व ध्यानीं येतें. भूतांचे क्षणक्षणीं अनंत पालट होतात ते सर्व कोठवर सांगावे ? एका ओंकारापासून अनेक वर्ण होतात ते असेच. तात्पर्य, सारी खटपट व लटपट त्रिगुण व पंचभूतें यांची होय. किती रंग, किती रूपें झटपट पालटत असतात. हा सारा अष्टधा प्रकृतीचा खेळ चालला आहे. विवेकानें प्रकृति दूर सारून तिचा निरास करून निर्गुण निराभास परमात्मा अनन्य भावानें भजावा (३८–५४).

प्रश्न — स्थूल देहाच्या आश्रयानें अंतःकरण असतें हें जर आपण प्रत्यक्ष पाहतों तर स्थूल देह आधीं व मग अंतःकरण निर्माण झालें, तसेंच ब्रह्मांड आधीं व मग मूळमाया झाली असें कां मानूं नये ? (१–३) उत्तर — आधीं सूक्ष्म

नाना पृष्ठीं चालती घरें । जीव करिती लाहानथोरें । शक्तीनुसार ॥ ४ ॥ शंख सिंपी घुला कवडे । आधीं त्यांचें घर घडे । किंवा आधीं निर्माण किडे । हें आधीं विचारावें ॥ ५ ॥ आधीं प्राणी ते होती । मग घरें निर्माण करिती । हे तों प्रत्यक्ष प्रचिती । सांगणें नलगे ॥ ६ ॥ तैसें आधीं सूक्ष्म जाण । मग स्थूळ होतें निर्माण । येणें दृष्टांतें प्रश्न । फिटला श्रोतयांचा ॥ ७ ॥ तंव श्रोता पुसे आणीक । जी आठवलें कांहीं येक । जन्ममृत्याचा विवेक । मज निरोपावा ॥ ८ ॥ कोण जन्मास घालितो । आणी मागुता कोण जन्म घेतो । हा प्रत्ययो कैसा येतो । कोण्या प्रकारें ॥ ९ ॥ ब्रह्मा जन्मास घालितो । विष्णु प्रतिपाळ करितो । रुद्र अवघें संव्हारितो । ऐसें बोलती ॥ १० ॥ तरी हें प्रवृत्तीचें बोलणें । प्रत्ययास आणी उणें । प्रत्यय पाहातां श्लाघ्यवाणें । होणार नाहीं ॥ ११ ॥ ब्रह्मयास कोणें जन्मास घातलें । विष्णूस कोणें प्रतिपाळिलें । रुद्रास कोणें संव्हारिलें । महाप्रळईं ॥ १२ ॥ म्हणोनि हा सृष्टिभाव । अवघा मायेचा स्वभाव । कर्ता म्हणों निर्गुण देव । तरी तो निर्विकारी ॥ १३ ॥ म्हणावें माया जन्मास घाली । तरी हे आपणचि विस्तारली । आणी विचारितां थारली । हेंही घडेना ॥ १४ ॥ आतां जन्मतो तो कोण । कैसी त्याची वोळखण । आणी संचिताचें लक्षण । तेंहि निरोपावें ॥ १५ ॥ पुण्याचें कैसें रूप । आणी पापाचें कैसें स्वरूप । याहि शब्दाचा आक्षेप । कोण कर्ता ॥ १६ ॥ हें कांहींच न ये अनुमाना । म्हणती जन्म घेते वासना । परी ते पाहातां दिसेना । ना धरितां न ये ॥ १७ ॥ वासना कामना आणी कल्पना । हेतु भावना मति नाना । ऐशा अनंत वृत्ती जाणा । अंतःकरण-

---

निर्माण होतें व मग स्थूळ होतें असाच प्रकार सृष्टींत दिसतो. कोसले म्ह० आपणांभोंवतीं घर करून आंत स्वतःस कोंडून घेणारे किडे वगैरे अनेक प्रकारचे जीव सृष्टींत दिसतात. आधीं किडे का आधीं त्यांचीं घरें? 'शंख शिंपी घुळे कवडे । आधीं त्यांचें घर घडे । किंवा आधीं निर्माण किडे । हें विचारावें ॥'. आधीं प्राणी निर्माण होतात व मग त्यांचीं घरें होतात. सूक्ष्म आधीं, स्थूल नंतर याच न्यायानें सूक्ष्मांत सूक्ष्म अशी मूळमाया प्रथम, नंतर क्रमाक्रमानें ब्रह्मांड अशी सृष्टिरचना सांगितली तीच बरोबर आहे (४–७). प्रश्न – आणखी कांहीं प्रश्न विचारतों. जन्माला कोण घालतें व (मेल्यावर) जन्म कोण घेतें ? ब्रह्मा जन्माला घालतो, विष्णु प्रतिपाळतो व रुद्र संहारितो असें म्हणतात, पण हें केवळ प्रवृत्तीचें (लोकपरिपाठाचें) बोलणें आहे, प्रत्ययास येणारें नाहीं. ब्रह्मा जर जन्मास घालतो तर त्याला जन्माला कोणीं घातलें ? म्हणून हा सृष्टिभाव आहे असें मला वाटतें. निर्गुण देवाकडे कर्तृत्व जात नाहीं, कारण तें निर्विकारी आहे. मायेनें केलें म्हणावें तर माया आपल्या आपणच विस्तारली असून स्थिर व शाश्वत नाहीं. म्हणून जन्मतो कोण तें सांगा. संचित (पुण्यपापात्मक) कर्म करितें म्हणाल तर पुण्य काय, पाप काय, व ही शंका घेणारा मी कोण तें सांगा. वासना जन्म घेते म्हणाल तर ती दिसत नाहीं व धरितां येत नाहीं शिवाय ती अंतःकरणाचीच वृत्ति आहे. पंचभौतिक देह नाना

पंचकाच्या ॥ १८ ॥ असो हें अवघें जाणीवयंत्र । जाणीव म्हणजे स्मरणमात्र । त्या स्मरणास जन्मसूत्र । कैसें लागे ॥ १९ ॥ देहो निर्माण भूतांचा । वायो चाळक तयाचा । जाणणें हा मनाचा । मनोभाव ॥ २० ॥ ऐसें हें सहजचि घडलें । तत्वांचें गुंथाडें जालें । कोणास कोणें जन्मविलें । कोण्या प्रकारें ॥ २१ ॥ तरी हें पाहातां दिसेना । म्हणोन जन्मचि असेना । उपजला प्राणी येना । मागुता जन्मा ॥ २२ ॥ कोणासीच जन्म नाहीं । तरी संतसंगें केलें काई । ऐसा अभिप्राव सर्वही । श्रोतयांचा ॥ २३ ॥ पूर्वी स्मरण ना विस्मरण । मध्येंचि हें जालें निर्माण । अंतर्यामीं अंतःकरण । जाणती कळा ॥ २४ ॥ सावध आहे तों स्मरण । विकळ होतांचि विस्मरण । विस्मरण पडतां मरण । पावती प्राणी ॥ २५ ॥ स्मरण विस्मरण राहिलें । मग तें देहास मरण आलें । पुढें जन्मास घातलें । कोणास कोणें ॥ २६ ॥ म्हणोनी जन्मचि असेना । आणी यातनाही दिसेना । अवघी व्यर्थचि कल्पना । बळावली ॥ २७ ॥ म्हणोन जन्मचि नाहीं कोणासी । श्रोतयांची आशंका ऐसी । मरोन गेलें तें जन्मासी । मागुतें न ये ॥ २८ ॥ वाळल काष्ठ हिरवाळेना । पडिलें फळ तें लागेना । तैसें पडिलें शरीर येना । जन्मास मागुतें ॥ २९ ॥ मडकें अवचितें फुटलें । फुटलें तें फुटोनीच गेलें । तैसेंचि पुन्हां जन्मलें । नाहीं मनुष्य ॥ ३० ॥ येथें अज्ञान आणी सज्ञान । सारिखेंच जालें समान । ऐसा बळावला अनुमान । श्रोतयांसी ॥ ३१ ॥ वक्ता म्हणे हो ऐका । अवघें पाषांड करूं नका । सावध होऊन विवेका । अवलोकावें ॥ ३२ ॥ प्रेत्नेंवीण कार्य जालें । जेविल्यावीण पोट भरलें । ज्ञानेंवीण मुक्त जालें । हें तों घडेना ॥ ३३ ॥ स्वयें आपण जेविला । त्यास वाटे लोक धाला ।

तत्त्वांचें गुंथाडें आहे येथें 'कोणास कोणें जन्मविलें । कोण्या प्रकारें' हें समजत नाहीं. म्हणून 'कोणासच जन्म नाहीं' हें म्हणणार कांहीं आहेत. कोणासच जन्म नाहीं मग सत्संगादि साधनोपाय कशाला सांगतात? मागचें स्मरणविस्मरण कांहीं नाहीं, मध्येंच अंतःकरण जाणती कळा आहे तिचे जीवनमानपर्यंत कांहीं स्मरणकार्य होत असतें, म्हणून जन्म नाहीं, मरण नाहीं आणि पुनर्जन्म नाहीं. म्हणून कोणासही जन्म नाहीं, व मरून गेले ते पुन्हां जन्मास येत नाहींत असेंच म्हणायचें कीं काय? अकस्मात् मडकें फुटावें त्याप्रमाणें मनुष्य मेलें कीं गेलें, तें पुन्हां कांहीं जन्मत नाहीं. लांकूड वाळलें कीं पुन्हां अंकुर फुटून तें हिरवें होत नाहीं, किंवा गळून पडलेलें फळ पुन्हां धरत नाहीं. तसें शरीर एकदां पडलें कीं झालें, पुन्हां जन्म नाहीं. असें म्हणणेंच बरोबर आहे काय? असें असेल तर अज्ञान व सज्ञान सारखेंच समान झालें असें म्हणावें लागेल (८-३१). उत्तर—हो हो! काय प्रश्नांची माळिका हो! असें 'अवघें पाखांड करूं नका', जरा विचारानें घ्या. प्रयत्नावांचून कार्य झालें, जेवल्यावांचून पोट भरलें हें जसें घडत नाहीं, तसें ज्ञानावांचून मुक्त झाले हेंही घडत नाहीं. 'स्वयें आपण जेविला । त्यास वाटे लोक धाला,' पण यानें कांहीं बाकीच्यांचीं पोटें भरत नाहींत. ज्यांना

परंतु हें समस्तांला । घडलें पाहिजे ॥ ३४ ॥ पोहणें सिकला तो तरेल । पोहणें नेणे तो बुडेल । येथेंही अनुमान करील । ऐसा कवणु ॥ ३५ ॥ तैसें जयांस ज्ञान जालें । ते ते तितुकेच तरले । ज्यांचें बंधन तुटलें । तेचि मुक्त ॥ ३६ ॥ मोकळा म्हणे नाहीं बंधन । आणी प्रत्यक्ष बंदीं पडिले जन । त्यांचें कैसें समाधान । तें तुम्ही पाहा ॥ ३७ ॥ नेणे दुसऱ्याची तळमळ । तें मनुष्य परदुःखसीतळ । तैसाच हाही केवळ । अनुभव जाणावा ॥ ३८ ॥ जयास आत्मज्ञान जालें । तत्वें तत्व विवंचिलें । खुणेसी पावतांच बाणलें । समाधान ॥ ३९ ॥ ज्ञानें चुके जन्ममरण । सगट बोलणें अप्रमाण । वेदशास्त्र आणी पुराण । मग कासयासी ॥ ४० ॥ वेदशास्त्रविचारबोली । महानुभावांची मंडळी । भूमंडळीं लोक सकळी । हें मानीतना ॥ ४१ ॥ अवघें होतां अप्रमाण । मग आपलेंच काय प्रमाण । म्हणोन जेथें आत्मज्ञान । तोचि मुक्त ॥ ४२ ॥ अवघेच मुक्त पाहातां नर । हाही ज्ञानाचा उद्गार । ज्ञानेंविण तो उद्धार । होणार नाहीं ॥ ४३ ॥ आत्मज्ञान कळों आलें । म्हणोन दृश्य मिथ्या जालें । परंतु वेढा लाविलें । सकळांसी येणें ॥ ४४ ॥ आतां प्रश्न हा फिटला । ज्ञानी ज्ञानें मुक्त जाला । अज्ञान तो बांधला । आपले कल्पनेनें ॥ ४५ ॥ विज्ञानासारिखें अज्ञान । आणी मुक्तासारिखें बंधन । निश्चयासारखा अनुमान । मानूंचि नये ॥ ४६ ॥ बंधन म्हणिजे कांहींच नाहीं । परी वेढा लाविलें सर्वही । यास उपावचि नाहीं । कळल्यावांचुनी ॥ ४७ ॥ कांहींच नाहीं आणी बाधी । हेंचि नवल पाहा आधीं । मिथ्या जाणिजेना उपाधी । म्हणोनियां ॥ ४८ ॥ भोळा भाव सिद्धी जाव । हा उधाराचा उपाव । रोकडा मोक्षाचा अभिप्राव । विवेकें जाणावा ॥ ४९ ॥ प्राणी व्हावया मोकळा । आधीं पाहिजे जाणिवकळा । सकळ जाणतां निराळा । सहजचि होय ॥ ५० ॥ कांहींच नेणिजे तें अज्ञान । सकळ जाणिजे तें ज्ञान । जाणीव राहातां विज्ञान । स्वयेंचि आत्मा ॥ ५१ ॥ अमृत

ज्ञान झालें तितकेच तरले, त्यांना जन्ममृत्यु नाहीं व या कल्पनाही बाधत नाहींत. पोहणें शिकेल तो तरेल, न शिकेल तो बुडेल. मोकळा झाला तो आपुल्यापुरता ‘ बंधन नाहीं ’ म्हणेल, सर्वच मुक्त आहेत असें कसें म्हणेल ? व असें म्हणेल तर त्याच्या ज्ञानाचें हें लक्षण आहे इतकेंच म्हणतां येईल. अज्ञान व सज्ञान सारखे होणार नाहींत. सर्वच समान हें म्हणणें योग्य नाहीं. ज्ञानानेंच जन्म मरण चुकतें व अज्ञानांस तारण्यासाठीं वेदशास्त्रपुराणें झालीं आहेत. तात्पर्य, ‘ ज्ञानी ज्ञानें मुक्त जाला । अज्ञान तो बांधला । आपुल्या कल्पनेनें बंधन खरोखरच नाहीं, पण हें कळल्यावांचून उपाय नाहीं. बंधन नाहींच हा बुद्धिनिश्चय झाला म्हणजे तोच ज्ञानी. ‘ भोळाभाव सिद्धीजाव ’ हा उधारीचा मार्ग आहे, विवेकानें मोक्ष तात्काळ होतो. ज्ञानावांचून मोक्ष नाहीं. प्राणी मोकळा होण्यास आधीं ज्ञानकळा पाहिजे, जाणून निराळा (मुक्त) सहजच होतो. कांहींच न जाणणें तें अज्ञान, सकळ जाणणें तें ज्ञान व जाणीवही मुरून जाऊन स्वस्वरूप होणें तें विज्ञान. अमर

सेवून अमर जाला। तो म्हणे मृत्य कैसा येतो जनाला। तैसा विवेकी म्हणे। बद्धाला। जन्म तो कैसा ॥ ५२ ॥ जाणता म्हणे जनातें। तुम्हांस भूत कैसें झडपितें। तुम्हांस वीष कैसें चढतें। निर्विष म्हणे ॥ ५३ ॥ आधीं बद्धासारिखें व्हावें। मग हें नलगेचि पुसावें। विवेक दुरी ठेवून पाहावें। लक्षण बद्धाचें ॥ ५४ ॥ निजेल्यास चेईला तो। म्हणे हा कां रे वोसणा तो। अनुभव पाहाणेंचि आहे तो। तरी मग निजोन पाहावा ॥ ५५ ॥ ज्ञात्याची उगवली वृत्ती। बद्धाऐसी न पडे गुंती। धाल्याची अनुभवप्राप्ती। भुकेल्यास नाहीं ॥ ५६ ॥ इतुकेन आशंका तुटली। ज्ञानें मोक्षप्राप्ती जाली। विवेक पाहातां बाणली। आत्मस्थिती ॥ ५७ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विकल्पनिरसननाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ ज्ञाता सुटला ज्ञानमतें। परंतु जन्म कैसा बद्धातें। बद्धाचें काय जन्मतें। अंतकाळीं ॥ १ ॥ बद्ध प्राणी मरोन गेले। तेथें कांहींच नाहीं उरलें। जाणीवेचें विस्मरण जालें। मरणापूर्वी ॥ २ ॥ ऐसी घेतली आशंका। याचें उत्तर ऐका। आतां दुश्चीत होऊं नका। म्हणे वक्ता ॥ ३ ॥ पंचप्राण स्थळें सोडिती। प्राणरूप वासनावृत्ती। वासनामिश्रित प्राण जाती। देह सोडुनियां ॥ ४ ॥ वायोसरिसी वासना गेली। ते वायोरूपेंचि राहिली। पुन्हां जन्म घेऊन आली। हेतुपरत्वें ॥ ५ ॥ कित्येक प्राणी निःशेष मरती। पुन्हां मागुतें जीव येती। ढकलून दिल्हें तेणें दुखवती। हस्तपादादिक ॥ ६ ॥ सर्पदृष्टी जालियावरी। तीं दिवसां उठवी धन्वंतरी। तेव्हां ते माघारी। वासना येते कीं ॥ ७ ॥ कित्येक शवें होऊन पडती। कित्येक तयांस

अमृत पिऊन आला म्हणजे 'या प्राण्यांना मृत्यु कसा येतो' याचें त्याला नवल वाटतें, तसा ज्ञानी बद्धाला म्हणतो 'जन्म ही काय चीज आहे!' जाणता भूतानें पछाडलेल्यास म्हणतो 'भूत कसें लागतें?' निर्विष हा विषदिग्धाला विचारतो 'विष कसें चढतें?' बद्धाची भूमिका समजल्यावर हें पुसावेंच लागत नाहीं. विवेक दूर ठेवून बद्धलक्षण पाहावें. निजलेल्यास 'हा कां उगीच बरळतो आहे' असें जागृत म्हणतो. अनुभव पाहायचा असेल तर निजून पाहावें! तात्पर्य, भुकिस्त मनुष्यास तृप्तीचे ढेकर देणाऱ्याची तृप्ति नाहीं तशी बद्धाची गुंती (पाश) मुक्तास नाहीं. ज्ञानानें मुक्ति हें निश्चित (३२–५७). [द० ९, स० ७]

प्रश्न — बद्धाला पुन्हां जन्म कसा होतो? अंतकाळीं बद्धाचें काय जन्मतें? त्याची जाणीव तर मरणापूर्वीच नष्ट झाली होती (१–३). उत्तर — वासनामिश्रित प्राण निघून जातात त्याला आपण मरण म्हणतों. वायूबरोबर गेलेली वासना वायूरूपानेंच राहते व तीच पुनर्जन्माला कारण होते. कित्येक प्राणी निःशेष (निश्चेष्ट?) मरतात म्ह० सर्वथा मेल्यासारखे दिसतात, पण पुन्हां जिवंत होऊन परलोकाहून ढकलून दिल्याची खूण म्हणून हातपाय मोडल्याचें दाखवितात; कित्येक सर्पदंश झाल्यावर तीन दिवसांनीं वैद्यांच्या प्रयत्नांनीं उठतात व याप्रमाणें यमलोकाहून परत येतात; कित्येक शाप-

उठविती । यमलोकींहून आणिती । माघारे प्राणी ॥ ८ ॥ कित्येक पूर्वीं श्रापिले । ते शापें देह पावले । उश्रापकाळीं पुन्हां आले । पूर्वदेहीं ॥ ९ ॥ कित्येकीं बहु जन्म घेतले । कित्येक परकाया प्रवेशले । ऐसे आले आणी गेले । बहुत लोक ॥ १० ॥ फुंकिल्यासरिसा वायो गेला । तथ वोयासुत निर्माण जाला । म्हणोन वायोरूप वासनेला । जन्म आहे ॥ ११ ॥ मनाच्या वृत्ती नाना । त्यांत जन्म घेते वासना । वासना पाहातां दिसेना । परी ते आहे ॥ १२ ॥ वासना जाणीवहेत । जाणीव मुळींचा मूळतंत । मूळमायेंत असे मिश्रित । कारणरूपें ॥ १३ ॥ कारणरूप आहे ब्रह्मांडीं । कार्यरूपें वर्ते पिंडीं । अनुमानितां । तांतडी । अनुमानेना ॥ १४ ॥ परंतु आहे सूक्ष्मरूप । जैसें वायोचें स्वरूप । सकळ देव वायोरूप । आणी भूतसृष्टि ॥ १५ ॥ वायोमध्यें विकार नाना । वायो तरी पाहातां दिसेना । तैसी जाणीववासना । अति सूक्ष्म ॥ १६ ॥ त्रिगुण आणि पंचभूतें । हे वायोमध्यें मिश्रिते । अनुमानेना म्हणोन त्यातें । मिथ्या म्हणों नये ॥ १७ ॥ सहज वायो चाले । तरी सुगंध दुर्गंध कळों आले । उष्ण सीतळ तप्त निवाले । प्रत्यक्ष प्राणी ॥ १८ ॥ वायोचेनि मेघ वोळती । वायोचेनि नक्षत्रें चालती । सकळ सृष्टीची वर्तती गती । कळतो वायो ॥ १९ ॥ वायोरूपें देवतें भूतें । आंगीं भरती अकस्मातें । विधि केलियां प्रेतें । सावध होतीं ॥ २० ॥ राहाणें ब्राह्मणसमंध जाती । राहाणें ठेवणीं सांपडती । नाना गुंतले उगवती । प्रत्यक्ष राहाणें ॥ २१ ॥ वारें निराळें न बोले । देहामध्यें भरोन डोले । आळी घेऊन जन्मा आले । कित्येक प्राणी ॥ २२ ॥ ऐसा वायोचा विकार । येवंच कळेना

देह टाकून उःशापकाळीं पूर्वदेह घेतात ; कित्येक अनेक जन्म घेतात, परकाया प्रवेश करितात असे कित्येक प्राणी आले व गेले आहेत. फुंकल्यासरिसा प्राणवायु एका देहांतून दुसऱ्या देहांत गेला (यालाच वायुसुत म्हटलें आहे). यावरून वायु-स्वरूप वासनाच जन्म घेते हें उघड आहे (४–१२). वासना ही मनाच्या अनंत वृत्तींपैकीं एक वृत्ति आहे. ती दिसत नाहींच पण आहे. वासना म्ह० जाणीवेचा हेतु. वासना वायुरूप [प्रकृतिअंश व जाणीव ज्ञानरूप (पुरुष अंश) मूळमायेचें कारण जाणीव आहे, जाणीव मूळमायेंत कारणरूपानें मिश्रित आहे (मूळमायेंत वायु व जाणीव असे दोन भाग आहेत.) वायु प्रकृति व जाणीव पुरुष. गणेश व शारदा, शिव व शक्ति हीं प्रकृतिपुरुषांचींच नांवें आहेत. जाणीव ही कारणरूपानें ब्रह्मांडांत आहे व कार्यरूपानें पिंडांत आहे (कारणांतूनच कार्यांत आली आहे). ही वायुसारखीच सूक्ष्म आहे. सर्व देव व पंचभूतें मूळमायेच्या ठिकाणीं वायुरूप आहेत. जाणीव व वासना अतिसूक्ष्म आहेत व म्हणून दिसत नाहींत (१३–१६). त्रिगुण व पंचभूतें वायूंत मिश्रित आहेत, दिसत नाहींत म्हणून नाहींत असें नाहीं. वायूमुळें सुगंध दुर्गंध, उष्णशीतल दिसलें नाहीं तरी कळून येतें. वायूमुळें मेघ वृष्टि करितात, नक्षत्रें चालतात, सकल सृष्टीला चालविणारा वायु आहे. दैवतें व भूतें वायुरूप असल्यामुळें अंगांत भरतात, कांहीं मंत्रप्रयोग (विध, विधि) केल्यानें प्रेतें उठून बसतात, अंगांत शिरून राहिलेलीं दैवतें (राहणें) व ब्राह्मणसमंध जातात, राहण्याच्या योगानें पुष्कळ गोष्टी कळून गुंते उलगडतात, वायु स्वतंत्रपणें कांहीं बोलत नाहीं, देहाच्या आश्रयानें बोलतो व डोलतो, हट्ट (आळी) घेऊन कित्येक प्राणी जन्मास

विस्तार । सकळ कांहीं चराचर । वायोमुळें ॥ २३ ॥ वायो स्तब्धरूपें सृष्टिधर्ता । वायो चंचळरूपें सृष्टिकर्ता । न कळे तरी विचारीं प्रवर्ता । म्हणिजे कळे ॥ २४ ॥ मुळमायेपासून सेवटवरी । वायोचि सकळ कांहीं करी । वायोवेगळे कर्तृत्व चतुरीं । मज निरोपावें ॥ २५ ॥ जाणीवरूप मूळमाया । जाणीव जाते आपल्या ठाया । गुप्त प्रगट होऊनियां । विश्वीं वर्ते ॥ २६ ॥ कोठें गुप्त कोठें प्रगटे । जैसें जीवन उफाळे आटे । पुढें मागुता वोघ लोटे । भूमंडळीं ॥ २७ ॥ तैसा वायोमध्यें जाणीवप्रकार । उमटे आटे निरंतर । कोठें विकारे कोठें समीर । उगाच वाजे ॥ २८ ॥ वारीं अंगावरून जाती । तेणें हातपाय वाळती । वारा वाजतां करपती । आलीं पिकें ॥ २९ ॥ नाना रोगांचीं नाना वारीं । पीडा करिती पृथ्वीवरी । वीज कडाडी अंबरीं । वायोमुळें ॥ ३० ॥ वायोकरितं रागोद्धार । कळे वोळखीचा निर्धार । दीप लागे मेघ पडे हा चमत्कार । रागोद्धारीं ॥ ३१ ॥ वायो फुंकितां भुली पडती । वायो फुंकितां खांडकें करपती । वायोकरितां चालती । नाना मंत्र ॥ ३२ ॥ मंत्रें देव प्रगटती । मंत्रें भूतें अखरकिती । बाजीगरी वोडंबरी करिती । मंत्रसामर्थ्यें ॥ ३३ ॥ राक्षसांची मावरचना । देवांदिकांहि कळेना । विचित्र सामर्थ्यें नाना । स्तंबनमोहनादिकें ॥ ३४ ॥ धडचि पिसें करावें । पिसेंच उमजवावें । नाना विकार सांगावे । किती म्हणोनी ॥ ३५ ॥ मंत्रीं संग्राम देवाचा । मंत्रीं साभिमान ऋषीचा । महिमा मंत्रसामर्थ्याचा । कोण जाणे ॥ ३६ ॥ मंत्रीं पक्षी आटोपिती । मूषकें स्वापदें बांधती । मंत्रीं महासर्प खिळिती । आणी धनलाभ ॥ ३७ ॥ आतां असो हा प्रश्न जाला । बद्धाचा जन्म प्रत्यया आला । मागील प्रश्न फिटला । श्रोतयाचा ॥ ३८ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देहांतनिरूपणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

येतात. हीं वासनेचीं कार्यें पाहतां वासना वायुरूप आहे असेंच ठरतें. वायु चंचलरूपानें सृष्टिकर्ता (ब्रह्मा) व स्तब्धरूपानें सृष्टिधर्ता (विष्णु) आहे. मूळमायेपासून शेवट स्थूळापर्यंत सर्व कांहीं वायूच करितो, वायुवेगळें कर्तृत्व नाहीं (१७–२५). जाणीवरूप मूळमाया गुप्तप्रगट होऊन विश्वांत असते. पाणी जसें कोठें उफाळतें (वर येतें) व कोठें आटतें व असें करीत पुढें भूमंडळावर महानदीरूपानें वाहूं लागतें तशीच जाणीव वायूंत कोठें उमटते व कोठें आटते (२६–२८). वारा अंगावरून जाऊन हातपाय वाळतात, वायूमुळें पिकाला आलेलीं शेतें करपतात, नाना रोगांचे वारे पृथ्वीवर फिरतात, वायूमुळें वीज कडाडून झाडें कोलमंडतात, वायूमुळें निरनिराळे राग व स्वर यांचें ज्ञान होतें. दीपकल्याण रागानें दिवे लागतात, व मेघमल्हाररागानें पाऊस पडतो, वायूमुळें अनेक मंत्र सिद्ध होतात, अंगांतलीं भूतें जातात, बाजीगरी व वोडंबरी विद्या वायुरूप मंत्रांवरच चालतात. वेड्याचे धड (शहाणे) व धडाचे वेडे वायूमुळेंच होतात. स्तंभन, मोहन इ० सारे प्रकार, वायूमुळेंच अस्त्रविद्येंतले मंत्र, पशुपक्षी ताब्यांत ठेवण्याचे मंत्र, सर्पविंचूचे मंत्र, सारे वायूचे खेळ (२९–३८). [द० ९, स० ८]

॥ श्रीराम ॥ ब्रह्म वारितां वारेना । ब्रह्म सारितां सारेना । ब्रह्म कांहीं वोसरेना । येकीकडे ॥ १ ॥ ब्रह्म भेदितां भेदेना । ब्रह्म छेदितां छेदेना । ब्रह्म परतें होयेना । केलें तरी ॥ २ ॥ ब्रह्म खंडेना अखंड । ब्रह्मीं नाहीं दुसरें बंड । तरी कैसें हें ब्रह्मांड । सिरकलें मध्यें ॥ ३ ॥ पर्वत पाषाण सिळा सिखरें । नाना स्थळें स्थळांतरें । भूगोळरचना कोण्या प्रकारें । जाली ब्रह्मीं ॥ ४ ॥ भूगोळ आहे ब्रह्मामध्यें । ब्रह्म आहे भूगोळामध्यें । पाहातां येक येकांमध्यें । प्रत्यक्ष दिसे ॥ ५ ॥ ब्रह्मीं भूगोळें पैस केला । आणी भूगोळही ब्रह्में भेदिला । विचार पाहातां प्रत्ययो आला । प्रत्यक्ष आतां ॥ ६ ॥ ब्रह्में ब्रह्मांड भेदिलें । हें तों पाहतां नीटचि जालें । परी ब्रह्मास ब्रह्मांडें भेदिलें । हें विपरीत दिसे ॥ ७ ॥ भेदिलें नाहीं म्हणावें । तरी ब्रह्मीं ब्रह्मांड स्वभावें । हें सकळांस अनुभवें । दिसतचि आहे ॥ ८ ॥ तरी हें आतां कैसें जालें । विचारून पाहिजे बोलिलें । ऐसें श्रोतीं आक्षेपिलें । आक्षेपवचन ॥ ९ ॥ आतां याचें प्रत्योत्तर । सावध ऐका निरोत्तर । येथें पडिले कीं विचार । संदेहाचे ॥ १० ॥ ब्रह्मांड नाहीं म्हणों तरी दिसे । आणी दिसे म्हणों तरी नासे । आतां हें समजती कैसें । श्रोतेजन ॥ ११ ॥ तंव श्रोते जाले उदित । वक्ता म्हणे सावचित्त । प्रसंगें बोलों उचित । प्रत्योत्तर ॥ १२ ॥ आकाशीं दीपास लाविलें । दीपें आकाश परतें केलें । हें तों घडेना पाहिलें । पाहिजे श्रोतीं ॥ १३ ॥ आप तेज अथवा पवन । सारूं न सकती गगन । गगन पाहातां सघन । चळेल कैसें ॥ १४ ॥ अथवा कठीण जाली मेदिनी । तरी गगनें केली चाळणी । पृथ्वीचें सर्वांग भेदूनी । राहिलें गगन ॥ १५ ॥ याची प्रचीत ऐसी असे । जें जडत्वा आलें तितुकें नासे । आकाश जसें तैसें असे । चळणार नाहीं ॥ १६ ॥ वेगळेपणें पाहावें । तयास आकाश म्हणावें । अभिन्न होतां

प्रश्न —' ब्रह्म वारितां वारेना । ब्रह्म सारितां सारेना । ब्रह्म छेदितां छेदेना । ब्रह्म भेदितां भेदेना —' तरी कैसें हें ब्रह्मांड । सिरकलें मध्यें ?' ब्रह्मांत भूगोल आहे व भूगोळांत ब्रह्म आहे, मग हे ' भूगोळरचना कोण्या प्रकारें परब्रह्मीं जाली ?' ब्रह्म ब्रह्मांडास भेदून राहील हें नीट आहे, पण ब्रह्मांडानें ब्रह्मास भेदिलें हें विपरीत दिसतें ! भेदिलें नाहीं म्हणावें तरी ब्रह्मीं ब्रह्मांड सहजच स्वभावें आहे हें तरी कबूल करा (१–९). उत्तर —'आकाशांत दीप लाविला, म्हणून दीपानें आकाश पलीकडे सारिलें असें होतें काय ? नाहीं. तसेंच ब्रह्मांत ब्रह्मांड भासलें म्हणून ब्रह्म अभंग अखंड आहे असें म्हणण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं. आकाशांतच पृथ्वी, आप, तेज, वायु असूनही गगन सघन व अचळ आहेच कीं नाहीं ? याची प्रचीत एवढीच पहा कीं जें जडत्वाला येतें तें नासतें ; पण आकाश जसेंचें तसेंच अचळ अभेद्य आहे. आकाशाहून एकच पायरी पलीकडची ब्रह्माची. वस्तूपासून वेगळें राहून पाहिलें कीं तें आकाश, वस्तूशीं अभिन्न

स्वभावें । आकाश ब्रह्म ॥ १७ ॥ तस्मात आकाश चळेना । भेद गगनाचा कळेना । भासलें ब्रह्म तयास जाणा । आकाश म्हणावें ॥ १८ ॥ निर्गुण ब्रह्मसें भासलें । कल्पूं जातां अनुमानलें । म्हणोन आकाश बोलिलें । कल्पनेसाठीं ॥ १९ ॥ कल्पनेसी भासे भास । तितुकें जाणावें आकाश । परब्रह्म निराभास । निर्विकल्प तें ॥ २० ॥ पंचभूतांमध्यें वास । म्हणोन बोलिजे आकाश । भूतांतरीं जो ब्रह्मांश । तेंचि गगन ॥ २१ ॥ प्रत्यक्ष होतें जातें । अचळ कैसें म्हणावें त्यातें । म्हणोनियां गगनातें । भेदिलेंचि नाहीं ॥ २२ ॥ पृथ्वी विरोन उरे जीवन । जीवन नस्तां उरे अग्न । अग्न विझतां उरे पवन । तोहि नासे ॥ २३ ॥ मिथ्या आलें आणी गेलें । तेणें खरें तें भंगलें । ऐसें हें प्रचीतीस आलें । कोणेंपरी ॥ २४ ॥ भ्रमें प्रत्यक्ष दिसतें । विचार पाहातां काय तेथें । भ्रममूळ या जगातें । खरें कैसें म्हणावें ॥ २५ ॥ भ्रम शोधितां कांहींच नाहीं । तेथें भेदिलें कोणें काई । भ्रमें भेदिलें म्हणतां ठाईं । भ्रमचि मिथ्या ॥ २६ ॥ भ्रमाचें रूप मिथ्या जालें । मग सुखें म्हणावें भेदिलें । मुळीं लटिकें त्यानें केलें । तेंहि तैसें ॥ २७ ॥ लटिक्यानें उदंड केलें । तरी आमुचें काय गेलें । केलें म्हणतांच नाथिलें । शाहाणे जाणती ॥ २८ ॥ सागरामधें खसखस । तैसें परब्रह्मीं दृश्य । मतीसारिखा मतिप्रकाश । अंतरीं वाढे ॥ २९ ॥ मती करितां विशाळ । कवळों लागे अंतराळ । पाहातां भासे ब्रह्मगोळ । कवीठ जैसें ॥ ३० ॥ वृत्ति त्याहून विशाळ । करितां ब्रह्मांड बद्रीफळ । ब्रह्माकार होतां केवळ । कांहींच नाहीं ॥ ३१ ॥ आपण विवेकें विशाळला । मर्यादेवेगळा जाला । मग ब्रह्मगोळ देखिला । वटबीजन्यायें ॥ ३२ ॥ होतां त्याहून विस्तीर्ण । वटबीज कोटिप्रमाण । आपण होतां परिपूर्ण । कांहींच नाहीं ॥ ३३ ॥ आपण भ्रमें लाहानाळला । केवळ देहधारी जाला । तरी मग ब्रह्मांड त्याला । कवळेल कैसें ॥ ३४ ॥ वृत्ति ऐसी

झालें कीं तें आकाशच ब्रह्म होय ! कल्पनेला भासतें तें आकाश व निराभास निर्विकल्प आहे तें परब्रह्म. ‘ भूतांतरीं जो ब्रह्मांश । तेंचि गगन. ’ पृथिव्यादि चार भूतें होतात जातात म्हणून त्यांस अचळ म्हणतां येत नाहीं, पण आकाश होत जात नाहीं हें तर प्रत्यक्ष दिसतें म्हणून आकाश अचळ आहे. ‘ पृथ्वी विरोन उरे जीवन (जळ) । जीवन नस्तां उरे अग्न । अग्नी विझतां उरे पवन । तोही नासे. ’ पण तसें आकाश होत नाहीं व जात नाहीं व चारी भूतें त्यांत झालीं व गेलीं तरी आकाश भंगत नाहीं, आकाश भेदलें जात नाहीं. तसें ब्रह्मीं ब्रह्मांड भासलें तरी ब्रह्म भेदत नाहीं, तें अखंडच आहे (१०–२४). आतां हें ब्रह्मांड—जग तत्वतः पाहिलें तर भ्रमरूप आहे, भ्रममूळ या जगाला खरें कसें म्हणावें ? जग भ्रमरूप असल्यामुळें ‘ तेथें भेदिलें कोणें काई ? ’ असें असून जगानें ब्रह्म भेदिलें असें कोणी म्हणेल तर खुशाल म्हणो ‘ लटिक्यानें उदंड केलें । तरी आमुचें काय गेलें ? ’ सागरांत खसखस तसें परब्रह्मीं हें दृश्य ब्रह्मांड आहे. मति विशाळ करून पाहिलें तर हा ब्रह्मगोळ कवठाएवढा किंवा आणखी विशाळ केली तर बोराएवढा दिसतो. हें तरी वेगळेपणानें पाहिलें तर दिसतें, आणि ‘ ब्रह्माकार होतां कांहींच नाहीं. ’ आपण भ्रमें लहान देहधारी झालों म्हणून

वाढवावी । पसरून नाहींच करावी । पूर्णब्रह्मास पुरवावी । चहूंकडे ॥ ३५ ॥ जंव येक सुवर्ण आणितां । तेणें ब्रह्मांड मढवितां । कैसें होईल तें तत्वतां । बरें पाहा ॥ ३६ ॥ वस्तु वृत्तीस न कवळे । तेणें वृत्ति फाटोन वितुळे । निर्गुण आत्माच निवळे । जैसा तैसा ॥ ३७ ॥ येथें फिटली आशंका । श्रोतेहो संदेश धरूं नका । अनुमान असेल तरी विवेका । अवलोकावें ॥ ३८ ॥ विवेकें तुटे अनुमान । विवेकें होये समाधान । विवेकें आत्मनिवेदन । मोक्ष लाभे ॥ ३९ ॥ केली मोक्षाची उपेक्षा । विवेकें सारिलें पूर्वपक्षा । सिद्धांत आत्मा प्रत्यक्षा । प्रमाण नलगे ॥ ४० ॥ हीं प्रचीतीचीं उत्तरें । कळती सारासारविचारें । मननध्यासें साक्षात्कारें । पावन होईजे ॥ ४१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे संदहवारणनाम समास नवम ॥ ९ ॥

॥ श्रीराम ॥ देउळामध्यें जनन्नायक । आणी देवळावरी बैसला काक । परी तो देवाहून अधिक । म्हणों नये कीं ॥ १ ॥ सभा बैसली राजद्वारीं । आणी मर्कट गेलें स्तंभावरी । परी तें सभेहून श्रेष्ठ चतुरीं । कैसें मानावें ॥ २ ॥ ब्राह्मण स्नान करून गेले । आणी बक तैसेचि बैसले । परी ते ब्राह्मणापरीस भले । कैसे मानावे ॥ ३ ॥ ब्राह्मणामध्यें कोणी नेमस्त । कोणी जाले अव्यवेस्त । आणी श्वान सदा ध्यानस्थ । परी तें उत्तम नव्हे कीं ॥ ४ ॥ ब्राह्मण लक्षमुद्रा नेणे । माजर लक्षविषईं शाहाणें । परी ब्राह्मणापरीस विशेष कोणें । म्हणावें तयासी ॥ ५ ॥ ब्राह्मण पाहे भेदाभेद । मक्षिका सर्वांस अभेद । परी तीस जाला ज्ञानबोध । हें तों न घडे कीं ॥ ६ ॥ उंच वस्त्रें नीच ल्याला । आणी समर्थ उघडाच बैसला । परी तो आहे परीक्षिला । परीक्षवंतीं ॥ ७ ॥

ब्रह्मांड कवळत नाहीं. वृत्ति वाढवीत वाढवीत अमर्याद वाढवावी व वाढवून नाहींशी करावी व पूर्णब्रह्मास पुरवावी. सोन्याचा एक छोटासा पत्रा आणून त्यानें ब्रह्मांड मढवायचें ठरविलें तर कसें दिसेल तें मनांत आणा बरें ! वस्तु वृत्तीला कवळते व वृत्ति फाटून जाते, लीन होते व नंतर निर्गुण आत्माच उरतो. हें सार विवेकानें ध्यानांत आणा. मोक्षही पूर्वपक्षांत गेला व सिद्धांतरूप आत्मा प्रत्यक्ष झाला. आतां 'प्रत्यक्षाला प्रमाण कशाला ?' विचारानें, मननध्यासानें साक्षात्कार होतो (२५-४१).
[द० ९, स० ९]

(बहिरंग साधनांपेक्षां अंतरंग साधनानें अंतर्निष्ठ होण्यांतच व निर्गुण ब्रह्मानुभव घेण्यांतच जन्माची खरी सफलता आहे. बाह्यात्कार पुष्कळ केला त्यानें लौकिक वाढेल म्हणून अंतर्निष्ठाची योग्यता येईल काय ?) 'देउळामध्यें जगन्नायक । आणि देउळावरी बैसला काक । परी तो देवाहून अधिक । म्हणों नये कीं.' सभा भरली असतां मर्कट खांबावर येऊन बसेल म्हणून तें सभेहून उंच पदवीचें समजलें जाईल काय ? ब्राह्मण स्नान करून गेले व बगळे ध्यानस्थ बसले म्हणून ते श्रेष्ठ होत नाहींत. मांजर लक्ष्यविषयीं शहाणें, कुत्रें सदा ध्यानस्थ, म्हणून तें काय श्रेष्ठ ? मक्षिका सर्वांस अभेद परी तीस बोध जाहला असें कोणी म्हणत नाहीं.' उंची वस्त्र नीचानें अंगावर घेतलें व समर्थ पुरुष उघडाच बसला

बाह्याकार केला अधीक। परी तो अवघा लोकिक। येथें पाहिजे मुख्य येक। अंतरनिष्ठा ॥ ८ ॥ लोकिक बरा संपादिला। परी अंतरीं सावध नाहीं जाला। मुख्य देवास चुकला। तो आत्मघातकी ॥ ९ ॥ देवास भजतां देवलोक। पित्रांस भजतां पितृलोक। भूतांस भजतां भूतलोक। पाविजेतो ॥ १० ॥ जेणें जयास भजावें। तेणें त्या लोकासी जावें। निर्गुणीं भजतां व्हावें। निर्गुणचि स्वयें ॥ ११ ॥ निर्गुणाचें कैसें भजन। निर्गुणीं असावें अनन्य। अनन्य होतां होईजे धन्य। निश्चयेंसी ॥ १२ ॥ सकळ केलियाचें सार्थक। देव वोळखावा येक। आपण कोण हा विवेक। पाहिला पाहिजे ॥ १३ ॥ देव पाहातां निराकार। आपला तों माईक विचार। सोहं आत्मा हा निर्धार। बाणोन गेला ॥ १४ ॥ आतां अनुमान तो काई। वस्तु आहे वस्तुचा ठाईं। देहभाव कांहींच नाहीं। धांडोळितां ॥ १५ ॥ सिद्धास आणी साधन। हा तों अवघाच अनुमान। मुक्तासी आणी बंधन। हें तों आडळेना ॥ १६ ॥ साधनें जें कांहीं साधावें। तें तों आपणचि स्वभावें। आतां साधकाच्या नांवें। शून्याकार ॥ १७ ॥ कुळाळ पावला राजपदवी। आतां रासभें कासया राखावीं। कुळाळपणाची उठाठेवी। कासया पाहिजे ॥ १८ ॥ तैसा अवघा वृत्तीभाव। नाना साधनांचा उपाव। साध्य जालियां कैंचा ठाव। साधनांसी ॥ १९ ॥ साधनें काय साधावें। नेमें काय फळ घ्यावें। आपण वस्तु भरंगळावें। कासयासी ॥ २० ॥ देह तरी पांचा भूतांचा। जीव तरी अंश ब्रह्मींचा। परमात्मा तरी अनन्याचा। ठाव पाहा ॥ २१ ॥ उगेंचि पाहातां मीपण दिसे। शोध घेतां कांहींच नसे। तत्वें तत्व निरसे। पुढें निखळ आत्मा ॥२२॥ आत्मा आहे आत्मपणें। जिव आहे जीवपणें।

तरी दोघांची साम्यता होणार नाहीं. तात्पर्य, लौकिकांत मोठी पदवी असली, उंच स्थान मिळालें असलें किंवा मतलब किंवा ध्येय साधण्यांत कोणी चतुर असला, पोषाखाचा थाट केला किंवा अभेदभावानें वागण्याचा डौल मांडला तरी मुख्य गोष्ट वेगळीच आहे. ' येथ पाहिजे मुख्य येक । अंतर्निष्ठा. ' लौकिक संपादिला तरी सावध जाला नाहीं व मुख्य देवास चुकला, तो आत्मघातकी होय (१–९). देवाचें भजन केल्यानें देवलोक मिळतो, पितृपूजेनें पितृलोक मिळतो, भूतांची पूजा केल्यानें भूतलोकांची प्राप्ति होते, ज्याचें भजन करावें तदाकारता प्राप्त होते. मुख्य देवाची म्ह. निर्गुण ब्रह्माची उपासना केल्यानें निर्गुणपद मिळतें. निर्गुणाची उपासना म्ह. निर्गुणाशीं अनन्य होणें. तो एक देव ओळखून त्याशीं अनन्य होणें हेंच जन्माचें साफल्य होय. आपला मायिक विचार म्ह. देहबुद्धि सोडून निराकार निर्गुण परब्रह्माशीं ' सोहं आत्मा ' या निर्धारानें एकरस व्हावें (१०–१४). देहच आपण नाहीं मग देहभाव कुठला ? वस्तु ठायींच्या ठायींच आहे. सिद्ध व साधन, मुक्त व बंधन हें सारें अनुमानांत गेलें. साधनांनीं जें साधायचें तें आपणच आहोंत, आतां साधकपण संपलें. कुंभाराला राज्यपदवी मिळाल्यावर तो गाढवें हांकण्याचा धंदा कशाला करील ? सारीं साधनें वृत्तींतलीं आहेत. निवृत्तिपद मिळाल्यावर म्ह. साध्य झाल्यावर साधनांचा पत्ता कोठचा लागणार ? नित्यनेमादि साधनांनीं साधायाचें आतां काय उरलें आहे ? आपण आतां वस्तु साधनांत कां भरंगळावें ? (१५–२०). देह पंचभूतांचा, जीव अंश ब्रह्माचा, हें जाणून परब्रह्मीं अनन्य व्हावें. आत्मा आत्मपणानें, जीव जीवपणानें, माया मायापणानें, आहे व आपणही कोणीएक

माया आहे मायापणें । विस्तारली ॥ २३ ॥ ऐसें हें अवघेंचि आहे । आणी आपणही कोणीयेक आहे । हें सकळ शोधून पाहे । तोचि ज्ञानी ॥ २४ ॥ शोधूं जाणे सकळांसी । परी पाहों नेणे आपणासी । ऐसा ज्ञानी येकदेसी । वृत्तिरूपें ॥ २५ ॥ तें वृत्तिरूप जरी पाहिलें । तरी कांहींच नाहीं राहिलें । प्रकृतिनिरासें अवघेंचि गेलें । विकारवंत ॥ २६ ॥ उरलें तें निखळ निर्गुण । विवंचितां तेंचि आपण । ऐसी हे परमार्थाची खूण । अगाध आहे ॥ २७ ॥ फळ येक आपण येक । ऐसा नाहीं हा विवेक । फळाचें फळ कोणीयेक । स्वयेंचि होईजे ॥ २८ ॥ रंक होता राजा जाला । बरें पाहातां प्रत्यये आला । रंकपणाचा गल्बला । रंकीं करावा ॥ २९ ॥ वेद शास्त्रें पुराणें । नाना साधनें निरूपणें । सिद्ध साधु ज्याकारणें । नाना सायास करिती ॥ ३० ॥ तें ब्रह्मरूप आपणचि आंगें । सारासारविचार-प्रसंगें । करणें न करणें वाउगें । कांहींच नाहीं ॥ ३१ ॥ रंक राजआज्ञेसि भ्यालें । तेंचि पुढें राजा जालें । मग तें भयेंचि उडालें । रंकपणासरिसें ॥ ३२ ॥ वेदें वेदाज्ञेनें चालावें । शास्त्रें शास्त्र अभ्यासावें । तीर्थें तीर्थास जावें । कोण्या प्रकारें ॥ ३३ ॥ अमृतें सेवावें अमृत । अनंतें पाहावा अनंत । भगवंतें लक्षावा भगवंत । कोण्या प्रकारें ॥ ३४ ॥ संतें असंत त्यागावे । निर्गुणें निर्गुणासी भंगावें । स्वरूपें स्वरूपीं रंगावें । कोण्या प्रकारें ॥ ३५ ॥ अंजनें ल्यावें अंजन । धनें साधावें धन । निरंजनें निरंजन । कैसें अनुभवावें ॥ ३६ ॥ साध्य करावें साधनासी । ध्येयें धरावें ध्यानासी । उन्मनें आवरावें मनासी । कोण्या प्रकारें ॥ ३७ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे स्थितिनिरूपणनाम समास दशम ॥ १० ॥

आहे हें सर्व जो शोधून पाहील तोच ज्ञानी होय. सर्वांस शोधतील पण आपणास पाहणार नाहींत, वृत्ति शिल्लक ठेवून म्ह. एकदेशी होऊन ब्रह्म पाहूं जाणारे (दृश्य उडवून द्रष्टेपणानें राहणारे) ज्ञानी पुष्कळ आहेत, पण ही द्रष्टेपणाची म्ह. साक्षित्वाची वृत्तिसुद्धां सोडली पाहिजे. वृत्तीकडे पाहिलें कीं कांहींच उरत नाहीं. ह्याप्रमाणें प्रकृतिनिरास करितां निवळ निर्गुण ब्रह्म उरतें त्याशीं अनन्य व्हावें. ही परमार्थाची गहन खूण आहे. विरळा येथें जातो (२१–२७).आपण वेगळे व फल वेगळें असा दुजाभाव इतर मार्गांत असतो, पण या परमार्थांत आपण फळाचें फळ आहोंत (परमार्थाचें फळ मुक्ति, पण येथें आपण मुक्तीला मुक्तिपद देणारे आहोंत). रंकाचा राजा झाला, आतां तो रंकपणाला बाजार कशाला मांडील ? रंकांनीं रंकपणाचा गलबला करावा, हा सुटला. वेदशास्त्रपुराणें, साधनें, संतसाधु ज्यासाठीं एवढा अट्टाहास करून सांगतात तें ब्रह्मरूप आपणच अंग आहोंत हा येथें प्रत्यय आहे. सारासार विचारप्रसंगानें हा प्रत्यय आला. आतां करणें न करणें कांहींच उरलें नाहीं, रंक राजाच्या आज्ञेला भीत होते, त्यांनाच राज्यपद मिळाल्याबरोबर रंकपण गेला व भयही उडालें. वेदाला वेदाज्ञा कशाला पाहिजे ? ब्रह्मविद्येला ब्रह्मविद्येचा अभ्यास करण्याचें प्रयोजन काय ? आत्मशुद्धीसाठीं तीर्थाला तीर्थयात्रा करायला कशाला हवी ? अमृताला आतां अमृत सेवायला नको, अनंताला अनंत पहायला नको, संताला असंत टाकायला नको, निर्गुणाला निर्गुणपदाची भूक नको, स्वरूपाला आत्मरंगासाठीं स्वरूप व्हायला नको, साध्याला साधन, किंवा ध्येयाला ध्यान, उन्मनाला मनोजय—हें कांहींएक उरलें नाहीं (२८–३७). [द० ९, स० १०]

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ दशक दाहावा जगज्जोतिनाम ॥ १० ॥

॥ श्रीराम ॥ सकळांचें अंतःकरण येक । किंवा येक नव्हे अनेक । ऐसें हें निश्चयात्मक । मज निरोपावें ॥ १ ॥ ऐसें श्रोतयानें पुसिलें । अंतःकरण येक कीं वेगळालें । याचें उत्तर ऐकिलें । पाहिजे श्रोतीं ॥ २ ॥ समस्तांचें अंतःकरण येक । निश्चयो जाणावा नेमक । हा प्रयत्नाचा विवेक । तुज निरोपिला ॥ ३ ॥श्रोता म्हणे वक्तयासी । अंतःकरण येक समस्तांसी । तरी मिळेना येकयेकासी । कायानिमित्य ॥ ४ ॥ येक जेवितां अवघे धाले । येक निवतां अवघे निवाले । येक मरतां अवघे मेले । पाहिजेत कीं ॥ ५ ॥ येक सुखी येक दुःखी । ऐसें वर्ततें लोकिकीं । येका अंतःकरणाची वोळखी । कैसी जाणावी ॥ ६ ॥ जनीं वेगळाली भावना । कोणास कोणीच मिळेना । म्हणोन हें अनुमाना । येत नाहीं ॥ ७ ॥ अंतःकरण येक असतें । तरी येकाचें येकास कळों येतें । कांहीं चोरितांच न येतें । गौप्य गुह्य ॥ ८ ॥ याकारणें अनुमानेना । अंतःकरण येक हें घडेना । विरोध लागला जना । काय निमित्य ॥ ९ ॥ सर्प डसाया येतो । प्राणी भेऊन पळतो । येक अंतःकरण तरी तो । विरोध नसावा ॥ १० ॥ ऐसी श्रोतयांची आशंका । वक्ता म्हणे चळों नका । सावध होऊन ऐका । निरूपण ॥ ११ ॥ अंतःकरण म्हणिजे जाणीव । जाणीव जाणता स्वभाव । देहरक्षणाचा उपाव ।

प्रश्न — सकळांचें मिळून अंतःकरण एक किंवा वेगळालें याचें निश्चयात्मक उत्तर पाहिजे. (१). उत्तर — सकाळांचें अंतःकरण एक हाच निश्चय (२). प्रश्न — सर्वांचें अंतःकरण एक तर मग एकमेकांचें मिळत कां नाहीं ? मतभेद, रुचिभेद इ. भेद कां उत्पन्न होतात ? एक जेवला कीं सगळ्यांचीं पोटें भरावीं, एक तृप्त झाला कीं सगळ्यांनीं तृप्तीचे ढेकर द्यावेत, एक मेला कीं सगळ्यांनीं मरावें, असें होत नाहीं ; व एक सुखी व एक दुःखी दिसतो, व जनांत वेगवेगळ्या भावना दिसतात, यावरून अंतःकरण एक हें पटत नाहीं. तें एक असतें तर एकाचें दुसऱ्याला कळतें, मग कोणालाच कोणाही-पासून कांहीं गुह्य चोरून ठेवतां आलें नसतें, प्राण्यांत परस्पर विरोध दिसला नसता. सर्प डसायला येतो व प्राणी भिऊन पळतो हा विरोध अंतःकरण एक असतें तर दिसला नसता. तात्पर्य, सकळांचें अंतःकरण एक हें मला पटत नाहीं (३–१०). उत्तर — बारे ! अंतःकरण म्हणजे जाणीव, जाणपण, देहरक्षणाचा उपाय सुचविणारी कळा. जाणून सर्प

जाणती कळा ॥ १२ ॥ सर्प जाणोन डंखूं आला । प्राणी जाणोन पळाला । दोहींकडे जाणीवेला । बरें पाहा ॥ १३ ॥ दोन्हींकडे जाणीवेसी पाहिलें । तरी अंतःकरण येकचि जालें । विचारितां प्रत्यया आलें । जाणीवरूपें ॥ १४ ॥ जाणीवरूपें अंतःकरण । सकळांचें येक हें प्रमाण । जीवमात्रांस जाणपण । येकचि असे ॥ १५ ॥ येके दृष्टीचें देखणें । येके जिव्हेचें चाखणें । ऐकणें स्पर्शणें वास घेणें । सर्वत्रांस येक ॥ १६ ॥ पशु पक्षी किडा मुंगी । जीवमात्र निर्माण जगीं । जाणीवकळा सर्वांलागीं । येकचि आहे ॥ १७ ॥ सर्वांस जळ तें सीतळ । सर्वांस अग्नि तेजाळ । सर्वांस अंतःकरण केवळ । जाणती कळा ॥ १८ ॥ आवडे नावडे ऐसें जालें । तरी हें देहस्वभावावरी गेलें । परंतु हें कळों आलें । अंतःकरणयोगें ॥ १९ ॥ सर्वांचें अंतःकरण येक । ऐसा निश्चयो निश्चयात्मक । जाण तयाचें कौतुक । चहुंकडे ॥ २० ॥ इतुकेन फिटली आशंका । आतां अनुमान करूं नका । जाणणें तितुकें येका । अंतःकरणाचें ॥ २१ ॥ जाणोन जीव चारा घेती । जाणोन भिती लपती । जाणोनियां पळोन जाती । प्राणीमात्र ॥ २२ ॥ किडामुंगीपासून ब्रह्मादिक । समस्तांत अंतःकरण येक । ये गोष्टींचें कौतुक । प्रत्ययें जाणावें ॥ २३ ॥ थोर लहान तरी अग्नी । थोडें बहु तरी पाणी । न्यून पूर्ण तरी प्राणी । अंतःकरणें जाणती ॥ २४ ॥ कोठें उणें कोठें अधीक । परंतु जिनसमासला येक । जंगम प्राणी कोणीयेक । जाटिल्याविण नाहीं ॥ २५ ॥ जाणीव म्हणिजे अंतःकरण । अंतःकरण विष्णूचा अंश जाण । विष्णु करितो पाळण । येणें प्रकारें ॥ २६ ॥ नेणतां प्राणी संव्हारतो । नेणीव तमोगुण बोलिजेतो । तमोगुणें रुद्र संहारितो । येणें प्रकारें ॥ २७ ॥ कांहीं जाणीव कांहीं नेणीव । हा रजोगुणाचा स्वभाव । जाणतां नेणतां

डसायला येतो व जाणूनच प्राणी पळतो, यावरून दोहींकडे जाणीव म्ह० अंतःकरण एकच आहे हाच प्रत्यय नाहीं का येत ? जीवमात्रांस जाणीवरूपानें अंतःकरण एकच आहे. डोळ्यांनीं पाहणें, जिव्हेनें स्वाद घेणें, ऐकणें, स्पर्शणें हें सर्व पशुपक्षी, किडामुंगी सर्व निर्माण झालेल्या प्राण्यांस जाणीवरूपानें एकच आहे. सर्वांसच पाणी शीतळ आहे व अग्नि दाहक आहे. आवडनावड देहस्वभावाप्रमाणें भिन्नभिन्न असली तरी पण हें जाणपणामुळेंच सर्व कांहीं कळतें. तात्पर्य, सर्वांचें अंतःकरण म्ह० जाणीव एक हा निश्चितार्थ झाला (११–२०). किडामुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत सर्वांस अंतःकरण एकच आहे. जीव जाणून भक्ष्य खातात, भितात, पळतात. पंचपात्रीभर जरी पाणी व समुद्र तरी पाणीच, ठिणगी तरी अग्नि व प्रळयाग्नी तरी अग्नीच, तसे सर्व प्राणी एका अंतःकरणानेंच जाणतात. कोठें थोडें, कोठें फार, पण जिन्नस मसाला एक, पण जाणपणावांचून प्राणी नाहीं. जाणीव म्ह० अंतःकरण (म्ह० सत्वगुण) व अंतःकरण हा विष्णूचा अंश म्हणून जाणीवरूपानें विष्णु सकलांचें परिपालन करितो. नेणीव म्ह० तमोगुण यामुळें प्राण्याचा नाश होतो व तमोगुणानें रुद्र संहार करितो. जाणीवनेणीवमिश्रित तो रजोगुण, व तो जन्माला कारण होतो म्हणून ब्रह्मा निर्माण करितो असें

जीव । जन्मास येती ॥ २८ ॥ जाणीवेनें होतें सुख । नेणीवेनें होतें दुःख । सुखदुःख अवश्यक । उत्पत्तिगुणें ॥ २९ ॥ जाणण्यानेणण्याची बुद्धी । तेचि देहीं जाणावा विधी । स्थूळ देहीं ब्रह्मा त्रिशुद्धि । उत्पत्तिकर्ता ॥ ३० ॥ ऐसा उत्पत्ति स्थिति संव्हार । प्रसंगें बोलिला विचार । परंतु याचा निर्धार । प्रत्ययें पाहावा ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अंतःकरणयेकनाम समास प्रथम ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥ स्वामीनें विचार दाखविला । येथें विष्णूचा अभाव दिसोन आला । ब्रह्मा विष्णु महेशाला उरी नाहीं ॥ १ ॥ उत्पत्ति स्थिति संव्हार । ब्रह्मा विष्णु महेश्वर । याचा पाहातां विचार । प्रत्ययो नाहीं ॥ २ ॥ ब्रह्मा उत्पत्तिकर्ता चौमुखांचा । येथें प्रत्ययो नाहीं त्याचा । पाळणकर्ता विष्णु चौभुजांचा । तोही ऐकोन जाणों ॥ ३ ॥ महेश संव्हार करितो । हाही प्रत्ययो कैसा येतो । लिंगमहिमा पुराणीं तो । विपरीत बोलिला ॥ ४ ॥ मूळमायेस कोणें केलें । हें तों पाहिजे कळलें । तिहीं देवांचें रूप जालें । ऐलीकडे ॥ ५ ॥ मूळमाया लोकजननी । तयेपासून गुणक्षोभिणी । गुणक्षोभिणीपासून त्रिगुणी । जन्म देवा ॥ ६ ॥ ऐसें बोलती शास्त्रकारक । आणि प्रवृत्तीचेहि लोक । प्रत्ययो पुसतां कित्येक । आकांत करिती ॥ ७ ॥ म्हणोन त्यांस पुसावेना । त्यांचेन प्रत्ययो आणवेना । प्रत्ययेंविण प्रेत्न नाना । ठकाठकी ॥ ८ ॥ प्रचीतीवीण वैद्य म्हणवी । उगीच करी उठाठेवी । तया मूर्खाला गोवी । प्राणीमात्र ॥ ९ ॥ तैसाच हाहि विचार ।

म्हणतात. जाणीवेनें सुख होतें, नेणीवेनें दुःख होतें व कांहीं जाणीव आणि कांहीं नेणीव यामुळें कांहीं सुख व कांहीं दुःख होतें. जाणण्यानेणण्याची जी मिश्रबुद्धि तिलाच आपल्या देहांतला ब्रह्मा म्हणून ओळखावें. स्थूळ देहाचा निर्माता निश्चयानें 'त्रिशुद्धि' ब्रह्माच होय. अंतःकरण म्ह० जाणीव व जाणीव सकळांची एकच हें सांगण्याच्या प्रसंगानें उत्पत्तिस्थितिसंहाराचा ब्रह्माविष्णुमहेशांना आपल्या देहांत ओळखण्याचा उपायही सांगितला गेला. त्याचा ज्याचा त्यानें आपल्याशीं विचार करून प्रत्यय पहावा (२१–३८). [द० १०, स० १]

प्रश्न—आपण वर जो विचार सांगितला त्यावरून विष्णूचा अभाव दिसून येतो व ब्रह्माविष्णुमहेश हे देवच उत्पत्तिस्थितिसंहाररूप ठरल्यानें उडून जातात ! चार मुखांचा ब्रह्मदेव, चतुर्भुज विष्णु, हे आम्ही ऐकून आहोंत. लिंगपुराणांत शंकराचा महिमा उलट सांगितला आहे. मूळमायेपासून गुणमाया झाली व तिच्यापासून त्रिगुणात्मक 'तीन देव' झाले असें शास्त्रकार व परंपरेचे लोक सांगतात; पण मूळमायेलाच कोणीं केलें हें सांगत नाहींत, प्रत्ययाचें तर कोणीच बोलत नाहींत. 'कांहीं प्रत्यय आहे का ?' असें आम्हीं म्हटलें कीं उलट आम्हांवरच ओरडतात. त्यांनाच प्रत्यय नसला तर ते तरी काय करतील बिचारे ! बरें. बिनप्रत्ययाचे ठकपणाचे बोल ऐकून करायचें काय ? औषधाच्या प्रचीतीवांचून एखादा खोटा वैद्य जर नसत्या उठाठेवी करायला लागला तर त्याला पेंचांत धरिल्याशिवाय (गोवी) लोक काय म्हणून राहतील ? तसाच हाही प्रकार आहे. प्रत्ययावांचून गुरु व शिष्य दोघेही अंधारांतच चांचपडतात. इतरांची गोष्ट कशाला

प्रत्ययें करावा निर्धार । प्रत्ययो नस्तां अंधकार । गुरुशिष्यांसी ॥ १० ॥ बरें लोकांस काय म्हणावें । लोक म्हणती तेंचि बरवें । परंतु स्वामीनें सांगावें । विशद करुनी ॥ ११ ॥ म्हणों देवीं माया केली । तरी देवांचीं रूपें मायेंत आलीं । जरी म्हणों मायेंनें माया केली । तरी दुसरी नाहीं ॥ १२ ॥ जरी म्हणों भूतीं केली । तरी ते भूतांचीच वळली । म्हणावें जरी परब्रह्में केली । तरी ब्रह्मीं कर्तृत्व नाहीं ॥ १३ ॥ आणी माया खरी असावी । तरी ब्रह्मीं कर्तृत्वाची गोवी । माया मिथ्या ऐसी जाणावी । तरी कर्तृत्व कैंचें ॥ १४ ॥ आतां हें अवघेंचि उगवे । आणी मनास प्रत्ययो फावे । ऐसें केलें पाहिजे देवें । कृपाळुपणें ॥ १५ ॥ शब्द मातृकावीण नाहीं । मातृका देहावीण नाहीं । देह निर्माण होत नाहीं । देहावीण ॥ १६ ॥ तया देहामध्यें नरदेहो । त्या नरदेहांत ब्राह्मणदेहो । तया ब्राह्मणदेहास पाहो । अधिकार वेदीं ॥ १७ ॥ असो वेद कोठून जाले । देह कासयाचे केले । देह कैसे प्रगटले । कोण्या प्रकारें ॥ १८ ॥ ऐसा बळावला अनुमान । केलें पाहिजे समाधान । वक्ता म्हणे सावधान । होईं आतां ॥ १९ ॥ प्रत्ययो पाहातां सांकडी । अवघी होते विघडाविघडी । अनुमानितां घडीनें घडी । काळ जातो ॥ २० ॥ लोकधाटी शास्त्रनिर्णय । येथें बहुधा निश्चय । म्हणोनियां येक प्रत्यय । येणार नाहीं ॥ २१ ॥ आतां शास्त्राची भीड धरावी । तरी सुटेना हे गथागोवी । गथागोवी हे उगवावी । तरी शास्त्रभेद दिसे ॥ २२ ॥ शास्त्र रक्षून प्रत्यये आणिला । पूर्वपक्ष त्यागून सिद्धांत पाहिला । शाहाणा मूर्ख समजाविला । येका वचनें ॥ २३ ॥ शास्त्रींच पूर्वपक्ष बोलिला । पूर्वपक्ष म्हणावें लटक्याला ।

सांगूं ? पण स्वामी समर्थ आहेत, त्यांनीं तरी माझ्या शंकेचें निरसन करावें (१–११). माया कोणीं केली हा माझा मुख्य प्रश्न आहे. माया देवांनीं केली म्हणावी तर देव मायेनंतरचे ; बरें मायेनें माया केली म्हणावी तर ही दुसरी माया कोठून आली ? माया भूतांनीं केली म्हणावी तर ती भूतांचीच घडली आहे असें म्हणावें लागेल. परब्रह्मानें केली म्हणावें तर ब्रह्माकडे कर्तृत्व नाहीं. शिवाय माया खरी असती तर तिचें कर्तृत्व ब्रह्माकडे जातें कीं नाहीं हा विचार असता, पण ती मुळीं मिथ्या तेव्हां कर्तृत्व कोणाकडे द्यावें ? आतां हें सर्व कोडें समाधानकारक रीतीनें उलगडेल असें स्वामींनीं उत्तर दिलें पाहिजे (१२–१५). तसेंच वेद (शब्द) मातृकांशिवाय (अक्षर) नाहीं, मातृका देहाशिवाय नाहीं, देह देहांपासूनच निर्माण होतो, अशा सर्व देहांत नरदेह मुख्य, त्यांत ब्राह्मण, त्या ब्राह्मणांना वेदांचा अधिकार–हें काय आहे कांहीं उमगत नाहीं. वेद कोठून आले, देह कसे झाले, देव कसे प्रगटले हें कांहींच उलगडत नाहीं (१६–१८). उत्तरः–आतां याचें उत्तर ऐका. लौकिक समजुती व शास्त्रनिर्णय हीं एकाच प्रकारचीं नसल्यामुळें व सत्य प्रत्यय हा नेहमीं एकच असल्यामुळें कोणता निर्णय सांगावा ही पंचाईत पडते. शास्त्राची भीड धरून प्रत्यय (अनुभव) सांगूं नये म्हटलें तर हा गुंता उलगडायचा नाहीं. कारण शास्त्रांतही अनेक मतें आहेत. शास्त्र रक्षून प्रत्यय आणला म्हणजे पूर्वपक्ष त्यागून सिद्धांताकडे लक्ष दिलें कीं मूर्ख व शहाणे यांची एकाच शब्दांनीं समजूत पाडतां येते (मूर्ख शास्त्राचे शब्द तेवढे घेऊन वचनांचा काथ्याकूट करीत बसतो व सुज्ञ मनुष्य प्रत्यय पावून समाधानरूप होऊन राहतो). शास्त्रांत पूर्वपक्ष मांडलेला

विचार पाहातां आम्हांला । शब्द नाहीं ॥ २४ ॥ तथापि बोलों कांहींयेक । शास्त्र रक्षून कौतुक । श्रोतीं सादर विवेक । केला पाहिजे ॥ २५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देहआशंकानाम समास द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ उपाधीविण जें आकाश । तें ब्रह्म निराभास । ते निराभासीं मूळमायेस । जन्म जाला ॥ १ ॥ ते मूळमायेचें लक्षण । वायोस्वरूपचि जाण । पंचभूतें आणि त्रिगुण । वायोआंगीं ॥ २ ॥ आकाशापासून वायो जाला । तो वायोदेव बोलिला । वायोपासून अग्नी जाला । तो अग्निदेव ॥ ३ ॥ अग्नीपासून जालें आप । तें नारायणाचें स्वरूप । आपापासून पृथ्वीचें रूप । तें बीजाकारें ॥ ४ ॥ ते पृथ्वीचे पोटीं पाषाण । बहु देवांचें लक्षण । नाना प्रचीत प्रमाण । पाषाणदेवीं ॥ ५ ॥ नाना वृक्ष काष्ठ मृत्तिका । प्रचित रोकडी विश्वलोकां । समस्त देवांचा थारा येका । वायोमध्यें ॥ ६ ॥ देव यक्षिणी कात्यायणी । चामुंडा जखिणी मानविणी । नाना शक्ति नाना स्थानीं । देशपरत्वें ॥ ७ ॥ पुरुषनामें कित्येक । देव असती अनेक । भूतें देवतें नपुंसक । नामें बोलिजेती ॥ ८ ॥ देव देवता देवतें भूतें । पृथ्वीमध्यें असंख्यातें । परंतु या समस्तांतें । वायोस्वरूप बोलिजे ॥ ९ ॥ वायोस्वरूप सदा असणें । प्रसंगें नाना देह धरणें । गुप्त प्रगट होणें जाणें । समस्तांसी ॥ १० ॥ वायोस्वरूपें विचरती । वायोमध्यें जगज्जोती । जाणीवकळा वासना वृत्ति । नानाभेदें ॥ ११ ॥ आकाशापासून वायो जाला । तो दों प्रकारें विभागला । सावधपणें विचार केला । पाहिजे श्रोतीं ॥ १२ ॥ येक वारा सकळ जाणती । येक वायोमधील जगज्जोती ।

असतो, व पूर्वपक्ष म्ह. अर्थात् लटका – मूर्ख तेथेंच लक्ष लावून बसतो, विचाराचा प्रत्यय पाहणारा विरळा. विचार पाहील तर आम्हांला दोष लावणार नाहीं. असो. शास्त्र रक्षून काय सांगायचें तें आम्हीं आतां सांगतों, विचारानें ध्यावें (१९–२५). [द० १०, स० २]

उपाधिरहित आकाश म्हणजेच निराभास ब्रह्म. तेथें मूळमाया झाली. मूळमाया वायुस्वरूप असून वायूच्या अंगीं त्रिगुण व पंचभूतें आहेत. आकाशापासून वायुदेव, वायूपासून अग्निदेव, अग्नीपासून आपोनारायण, आपापासून नाना बीजाकार पृथ्वी. त्या पृथ्वीच्या पोटीं पाषाण, तेथें बहु देवांची जनांना प्रचीत येते. अनेक वृक्षपाषाणमृत्तिकेच्या अनेक देवांच्या मूर्ति असतात व त्या त्या देवांची त्यांच्या त्यांच्या उपासकांना प्रचीति येत असते. तथापि हे सारे देव आहेत वायुस्वरूप. नाना देव, यक्ष, चामुंडा, कात्यायनी देशस्थलपरत्वें अनेक देवदेवता आहेत. देव पुरुष नामानें उल्लेखितात, भूतें दैवतें नपूंसकनामानें ओळखतात. देव, देवता, भूतें सर्व वायुस्वरूप आहेत, पण प्रसंगविशेषीं नाना देह धरून उपासकांसाठीं गुप्त प्रकट होत असतात (१ –१०). वायूमध्यें जाणीव, वासना, वृत्ति इ. रूपांनीं जगज्जोति ऊर्फ जाणीवकळा आहे. आकाशापासून वायु झाला तो मुख्यतः दोन प्रकारचा – एक वारा वाजतो तो व दुसरा ही ज्योति ह्या जगज्ज्योतींमध्येंच देवदेवतांच्या अनंतमूर्ति आहेत.

जगज्जोतीच्या अनंत मूर्ती । देवदेवतांच्या ॥ १३ ॥ वायो बहुत विकारला । परंतु दों प्रकारें बोलिला । आतां विचार ऐकिला । पाहिजे तेजाचा ॥ १४ ॥ वायोपासून तेज जालें । उष्ण सीतळ प्रकाशलें । द्विविध रूप ऐकिलें । पाहिजे तेजाचें ॥ १५ ॥ उष्णापासून जाला भानु । प्रकाशरूप दैदीप्यमानु । सर्वभक्षक हुताशनु । आणी विद्युल्लता ॥ १६ ॥ सीतळापासून आप अमृत । चंद्र तारा आणी सीत । आतां परिसा सावचित्त । होऊन श्रोते ॥ १७ ॥ तेज बहुत विकारलें । परंतु द्विधाच बोलिलें । आपही द्विधाच निरोपिलें । आप आणि अमृत ॥ १८ ॥ ऐकें पृथ्वीचा विचार । पाषाण मृत्तिका निरंतर । आणीक दुसरा प्रकार । सुवर्ण परीस नाना रत्नें ॥ १९ ॥ बहुरत्ना वसुंधरा । कोण खोटा कोण खरा । अवघें कळे विचारा –। रूढ होतां ॥ २० ॥ मनुष्यें कोठून जालीं । हे मुख्य आशंका राहिली । पुढें वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ २१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देहआशंकाशोधननाम समास तृतीय ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥ आतां पाहों जातां उत्पत्ती । मनुष्यांपासून मनुष्यें होती । पशूंपासून पशु निपजती । प्रत्यक्ष आतां ॥ १ ॥ खेंचरें आणी भूचरें । वनचरें आणी जळचरें । नाना प्रकारींचीं शरीरें । शरीरांपासून होती ॥ २ ॥ प्रत्यक्षास आणी प्रमाण । निश्चयास आणी अनुमान । मार्ग देखोन आडरान । घेऊंचि नये ॥ ३ ॥ विपरीतांपासून विपरीतें होती । परी शरीरेंचि बोलिजेती । शरीरावांचून उत्पत्ती । होणार नाहीं ॥ ४ ॥ तरी उत्पत्ति कैसी जाली । कासयाची कोणें केली । जेणें केली त्याची निर्मिली । काया कोणें ॥ ५ ॥ ऐसें पाहातां उदंड लांबलें । परी मुळीं शरीर कैसें जालें । कासयाचें उभारिलें । कोणें कैसें ॥ ६ ॥ ऐसी हे मागील आशंका । राहात गेली ते ऐका । कदापी

तेजही उष्ण व शीतळ असें दोन प्रकारचें आहे. उष्ण तेजापासून प्रकाशरूप सूर्य, सर्वभक्षक अग्नि व विद्युत् (वीज) असे तीन झालें ; व शीतळ तेजापासून पाणी, अमृत, चंद्र-नक्षत्रें, तारा, बर्फ इ. झालें. आतां पाण्यांतही पाणी आणि अमृत असे दोन प्रकार आहत. पृथ्वींत पाषाण – मृत्तिका हा एक व सुवर्ण, परीस, रत्नें हा दुसरा असे दोन प्रकार आहेत. ' बहुरत्ना वसुंधरा ' आहेच. खरा खोटा कोण हें विचारांनेंच कळतें. आतां माणसें कोठून झालीं तें सांगतों (११–२१). [द. १०, स.३]

प्राण्यांच्या उत्पत्तीचा स्थूळ विचार केला म्हणजे उघडच दिसतें कीं मनुष्यांपासून मनुष्यें, पशूंपासून पशु, त्याच-प्रमाणें खेंचरें (आकाशांत फिरणारे जीवजन्तु), भूचरें (पृथ्वीवर चालणारीं), चळचरें (मत्स्यादि), इ० नाना प्रकारचे प्राणी त्या त्या जातींच्या प्राण्यांपासूनच होतात. हें प्रत्यक्षच आहे, येथें अनुमानाचें काम नाहीं. विपरीत प्रकारें ही उत्पत्ति कोठें कोठें होते, पण शरीरावांचून शरीराची उत्पत्ति होत नाहीं हें निश्चित आहे. आतां ही उत्पत्ति कशी झाली, कशापासून

जाजु घेऊं नका । प्रत्ययो आलियानें ॥ ७ ॥ प्रत्ययोचि आहे प्रमाण । मूर्खास वाटे अप्रमाण । पिंडें प्रचितशब्दें जाण । विश्वासासी ॥ ८ ॥ ब्रह्मीं मूळमाया जाली । तेचि अष्टधा प्रकृति बोलिली । भूतीं त्रिगुणीं कालवली । मूळमाया ॥ ९ ॥ ते मूळमाया वायोस्वरूप । वायोमध्यें जाणीवेचें रूप । तेंचि इच्छा परी आरोप । ब्रह्मीं न घडे ॥ १० ॥ तथापि ब्रह्मीं कल्पिला । तरी तो शब्द वायां गेला । आत्मा निर्गुण संचला । शब्दातीत ॥ ११ ॥ आत्मा निर्गुण वस्तु ब्रह्म । नाममात्र तितुका भ्रम । कल्पून लाविला संभ्रम । तरी तो लागणार नाहीं ॥ १२ ॥ तथापि आग्रहें लाविला । जरी धोंडा मारिला आकाशाला । आकाशावरी कुंथिला । तरी तें तुटेना ॥ १३ ॥ तैसें ब्रह्म निर्विकार । निर्विकारीं लाविती विकार । विकार नासे निर्विकार । जैसें तैसें ॥ १४ ॥ आतां ऐका प्रत्ययो । जाणोनि धरावा निश्चयो । तरीच पाविजे जयो । अनुभवाचा ॥ १५ ॥ माया जाणिजे समीर । तींत जाणता तो ईश्वर । ईश्वर आणी सर्वेश्वर । तयासीच बोलिजे ॥ १६ ॥ तोचि ईश्वर गुणासी आला । त्याचा त्रिगुणभेद जाला । ब्रह्मा विष्णु महेश उपजला । तये ठाईं ॥ १७ ॥ सत्त्व रज आणी तम । हे त्रिगुण उत्तमोत्तम । यांच्या स्वरूपाचा अनुक्रम । मागां निरोपिला ॥ १८ ॥ जाणता विष्णु भगवान । जाणतानेणता चतुरानन । नेणता महेश पंचानन । अत्यंत भोळा ॥ १९ ॥ त्रिगुण त्रिगुणीं कालवले । होती कैसे वेगळाले । परी विशेष न्यून भासले । ते बोलावे लागती ॥ २० ॥ वायोमध्यें विष्णु होता । वायोस्वरूपचि तत्वता । पुढें जाला देहधर्ता । चतुर्भुजु ॥ २२ ॥ तैसाच ब्रह्मा आणी महेश । देह धरिती सावकास । गुप्त प्रगट होतां तयांस । वेळ नाहीं ॥ २२ ॥ आतां

कोणीं केली, ज्यानें केली त्याची काया कोणीं केली असें पाहूं गेल्यास हें फारच लांबत जाईल. मुख्य प्रत्यय पाहिला पाहिजे, पूर्व साधूंचे प्रचीतीचेच शब्द आहेत त्यांवर विश्वास ठेवला पाहिजे (१–८). ब्रह्मीं मूळमाया झाली, तिलाच (सूक्ष्म) अष्टधा प्रकृति म्हणतात; कां कीं मूळमायाच पंचभूतें व त्रिगुण यांनीं कालवली (मिश्रित झाली) आहे. ही वायुस्वरूप आहे, वायूंत जाणीव जी आहे तिलाच इच्छा किंवा संकल्प म्हणतात. पण तिचा संबंध ब्रह्माकडे नाहीं. संबंध आहे असें कोणीं म्हटलेंच तर तो शब्द मात्र व्यर्थ जातो. निर्गुण ब्रह्म शब्दातीत संचलें आहे. नाम मात्र तितुकें भ्रमरूप आहे. आकाशावर कोणीं धोंडा कुंथून मारिला तरी तो आकाशाला लागत नाहीं, तसें निर्विकार ब्रह्माला नामरूपविकार कांहींएक लागत नाहीं. प्रत्यय जाणून निर्धार धरावा तरच अनुभव येईल (९–१५). वायुरूप मायेच्या ठिकाणीं जी जाणीवकळा आहे त्याला ईश्वर, सर्वेश्वर म्हणतात. तो ईश्वर गुणाला आला व त्याचा त्रिगुण भेद झाला व त्या ठिकाणीं ब्रह्मा-विष्णु-महेश उपजले. सत्व रज-तम यांचें स्वरूप पूर्वीं सांगितलेंच आहे. जाणता भगवान् विष्णु, जाणतानेणता ब्रह्मदेव व नेणता म्ह० अत्यंत भोळा तो शंकर. त्रिगुण हे तर मूळांतच एकमेकांत कालवले आहेत. पण विशेष गुण तेवढाच घेऊन हें बोलणें आहे. वायूंत सत्वगुणात्मक विष्णु (जाणपणानें) होता तोच चतुर्भुज श्यामसुंदर देहधारी झाला. असेच ब्रह्मा व महेश. या

रोकडी प्रचिती । मनुष्यें गुप्त प्रगट होती । मां त्या देवांच्याच मूर्ती । सामर्थ्यवंत ॥ २३ ॥ देव देवता भूतें देवतें । चढतें सामर्थ्य आहे तेथें । येणेंचि न्यायें राक्षसांतें । सामर्थ्यकळा ॥ २४ ॥ झोटिंग वायोस्वरूप असती । सवेंच खुळखुळां चालती । खोबरीं खारिका टाकून देती । अकस्मात ॥ २५ ॥ अवघेंचि न्याल अभावें । तरी हें बहुतेकांस आहे ठावें । आपुलाल्या अनुभवें । विश्वलोक जाणती ॥ २६ ॥ मनुष्यें धरिती शरीरवेष । नाना परकायाप्रवेश । मां तो परमात्मा जगदीश । कैसा न धरी ॥ २७ ॥ म्हणोनि वायोस्वरूपें देह धरिले । ब्रह्मा विष्णु महेश जाले । पुढें तेचि विस्तारले । पुत्रपौत्रीं ॥ २८ ॥ अंतरींच स्त्रिया कल्पिल्या । तों त्या कल्पितांच निर्माण जाल्या । परी तयांपासून प्रजा निर्मिल्या । नाहींत कदा ॥ २९ ॥ इच्छून पुत्र कल्पिले । ते ते कल्पितांच निर्माण जाले । येणें प्रकारें वर्तले । हरिहरादिक ॥ ३० ॥ पुढें ब्रह्मयानें सृष्टी कल्पिली । इच्छेसरिसी सृष्टी जाली । जीवसृष्टि निर्माण केली । ब्रह्मदेवें ॥ ३१ ॥ नाना प्रकारींचे प्राणी कल्पिले । इच्छसरिसे निर्माण जाले । अवघे जोडेचि उदेले । अंडजजारजादिक ॥ ३२ ॥ येक जळस्वेदापासून जाले । ते प्राणी स्वेदज बोलिले । येक वायोकरितां जाले । अकस्मात उद्भिज ॥ ३३ ॥ मनुष्यांची गौडविद्या । राक्षसांची वोडंबरीविद्या । ब्रह्मयाची सृष्टिविद्या । येणें प्रकारें ॥ ३४ ॥ कांहींयेक मनुष्यांची । त्याहून विशेष राक्षसांची । त्याहून विशेष ब्रह्मयाची । सृष्टिविद्या ॥ ३५ ॥ जाणते नेणते प्राणी निर्मिले । वेद वदोन मार्ग लाविले । ब्रह्मयानें निर्माण केले । येणें प्रकारें ॥ ३६ ॥ मग शरीरांपासून शरीरें । सृष्टि वाढली विकारें । सकळ शरीरें येणें प्रकारें ।

देवांना गुप्त प्रगट व्हायला वेळ लागत नाहीं. सध्यांही योगीश्वर गुप्त प्रगट होतात हें आपण पाहातच आहोंत, मग ते तर समर्थ देव. देव, भूतें, देवता यांना मनुष्यांपेक्षां सामर्थ्य अधिकच असतें, त्याचप्रमाणें राक्षसांनाही असतें. वायुरूप झोटिंगही खुळखुळा चालतात व चटकन् खारिकखोबरें टाकून जातात. हें सारेंच खोटें मानतां येणार नाहीं, कारण पुष्कळांस हें अनुभवानें माहीत आहे. माणसें नानादेह धारण करितात, परकाया प्रवेशही करितात. मग तो तर जगदात्मा. त्याला हवे ते देह धारण करणें, गुप्तप्रगट होणें, हें काय कठिण आहे? तात्पर्य, ईश्वरानेंच गुणमायेचा अंगीकार करून ब्रह्माविष्णुमहेशांचे देह धारण केले, त्यांनीं अंतरीं स्त्रिया कल्पिल्या, व त्या कल्पितांच (त्यांच्या संकल्पसामर्थ्यानें) निर्माण झाल्या. त्यांच्या संकल्पानेंच त्यांना पुत्रपौत्र झाले. ही झाली हरिहरांची गोष्ट (१६–३०). ब्रह्मदेवानेंही संकल्पमात्रेंकरून सृष्टि निर्माण केली, जारजअंडजादि अनंत जीवजंतु इच्छामात्रें निर्माण केले. घामादि जळापासून झाले ते स्वेदज. वायूपासून झाले ते उद्भिज. मनुष्यांची गौडविद्या व राक्षसांची वोडंबरी विद्या – तिच्यापेक्षां ब्रह्मदेवाची सृष्टि – निर्माण-विद्या अर्थातच श्रेष्ठ प्रतीची आहे. पुढें शरीरापासून शरीरें या न्यायानें अनंत सृष्टि यथान्वयें निर्माण झाली. अशी सृष्टि विस्तारली ती विष्णूनें मूळरूपें (जाणीवेनें) पाळिली व स्थूलरूप धरून म्ह० नाना अवतार वेळोवेळीं घेऊन धर्म स्थापिला. धर्मस्थापनेचे नर दे विष्णुरूप – त्यांचें

निर्माण जालीं ॥ ३७ ॥ येथें आशंका फिटली । सकळ सृष्टि विस्तारली । विचार पाहातां प्रत्यया आली । यथान्वयें ॥ ३८ ॥ ऐसी सृष्टि निर्माण केली । पुढें विष्णूनें कैसी प्रतिपाळिली । हेही विवंचना पाहिली । पाहिजे श्रोतीं ॥ ३९ ॥ सकळ प्राणी निर्माण जाले । ते मूळरूपें जाणोन पाळिले । शरीरें दैत्य निर्दाळिले । नाना प्रकारींचे ॥ ४० ॥ नाना अवतार धरणें । दुष्टांचा संव्हार करणें । धर्म स्थापायाकारणें । विष्णूस जन्म ॥ ४१ ॥ म्हणोन धर्मस्थापनेचे नर । तेही विष्णूचे अवतार । अभक्त दुर्जन रजनीचर । सहजचि जाले ॥ ४२ ॥ आतां प्राणी जे जन्मले । ते नेणोन संव्हारले । मूळरूपें संव्हारिले । येणेंप्रकारें ॥ ४३ ॥ शरीरें रुद्र खवळेल । तैं जीवसृष्टि आहाळेल । अवघें ब्रह्मांडचि जळेल । संव्हारकाळीं ॥ ४४ ॥ एवं उत्पत्ती स्थिती संव्हार । याचा ऐसा आहे विचार । श्रोतीं होऊन तत्पर । अवधान द्यावें ॥ ४५ ॥ कल्पांतीं संव्हार घडेल । तोचि पुढें सांगिजेल । पंचप्रळय वोळखेल । तोचि ज्ञानी ॥ ४६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे बीजलक्षणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ ऐका प्रळयाचें लक्षण । पिंडीं दोनी प्रळय जाण । येक निद्रा येक मरण । देहांतकाळ ॥ १ ॥ देहधारक तिनी मूर्ती । निद्रा जेव्हां संपादिती । तो निद्राप्रळय श्रोतीं । ब्रह्मांडींचा जाणावा ॥ २ ॥ तिनी मूर्तींस होईल अंत । ब्रह्मांडास मांडेल कल्पांत । तेव्हां जाणावा नेमस्त । ब्रह्मप्रळय जाला ॥ ३ ॥ दोनी पिंडीं दोनी ब्रह्मांडीं । च्यारी प्रळय नवखंडीं । पांचवा प्रळय उदंडीं । जाणिजे विवेकाचा ॥ ४ ॥ ऐसे हे पांचहि प्रळये । सांगितले यथान्वयें । आतां हें अनुभवास ये । ऐसें करूं ॥ ५ ॥ निद्रा जेव्हां संचरे । तेव्हां जागृतीव्यापार सरे । सुषुप्ति अथवा स्वप्न भरे । अकस्मात ॥ ६ ॥ या

रक्षण करणें व धर्मविध्वंसक दैत्य त्यांचा संहार करणें व हीं दोन्हीं कार्यें करीत धर्मसंस्थापना करणें हें विष्णूच्या अवतारांचें प्रयोजन होय (३१–४१). जन्मलेले प्राणी रुद्रही मूळरूपें (नेणिवेंन) संहारितात, व स्थूलरूप धरून (शरीरें) खवळले म्हणजे सारें ब्रह्मांड जीवसृष्टीसह जळून खाक होतें. उत्पत्तिस्थितिलयाचा विचार सांगितला. पुढें कल्पांतीं होणाऱ्या प्रळयाची गोष्ट सांगतों. पंचप्रळय ओळखेल तोच ज्ञानी होय (४२–४६). [द० १०, स० ४]

प्रळय एकंदर पांच प्रकारचे आहेत; पिंडांत दोन व ब्रह्मांडांत दोन मिळून चार, आणखी विवेक प्रळय पांचवा. पिंडांत एक निद्राप्रळय व एक मरणप्रळय. ब्रह्मा, विष्णु, महेश हे जेव्हां निद्रित होतात तो ब्रह्मांडींचा निद्राप्रळय. ब्रह्मांडास कल्पांत होऊन तीनही मूर्तींचा अंत होतो तेव्हां त्यास ब्रह्मप्रळय म्हणतात. आतां या पंचप्रळयांचें स्पष्टीकरण करूं (१–५). निद्रा लागली कीं सारे जागृतीचे व्यापार खुंटतात व सुषुप्ति किंवा स्वप्न सुरू होतें. जागृतीचा

नांव निद्राप्रळय । जागृतीचा होये क्षय । आतां ऐका देहांतसमय । म्हणिजे
मृत्यप्रळय ॥ ७ ॥ देहीं रोग बळावती । अथवा कठीण प्रसंग पडती । तेणें
पंचप्राण जाती । स्थळें सांडुनी ॥ ८ ॥ तिकडे गेला मनपवनु । इकडे
राहिली नुस्ती तनु । दुसरा प्रळय अनुमानु । असेचिना ॥ ९ ॥ तिसरा ब्रह्म
निजेला । तों हा मृत्यलोक गोळा जाला । अवघा व्यापार खुंटला । प्राणीमात्रांचा
॥ १० ॥ तेव्हां प्राणीयांचे सूक्ष्मांश । वायोचक्रीं करिती वास । कित्येक
काळ जातां ब्रह्मयास । जागृती घडे ॥ ११ ॥ पुन्हां मागुती सृष्टि रची ।
विसंचिले जीव मागुते संची । सीमा होतां आयुष्याची । ब्रह्मप्रळय मांडे
॥ १२ ॥ शत वरुषें मेघ जाती । तेणें प्राणी मृत्य पावती । असंभाव्य
तडके क्षिती । मर्यादेवेगळी ॥ १३ ॥ सूर्य तपे बाराकळीं । तेणें पृथ्वीची
होय होळी । अग्नी पावतां पाताळीं । शेष विष वमी ॥ १४ ॥ आकाशीं
सूर्याच्या ज्वाळा । पाताळीं शेष विष वमी गरळा । दोन्हींकडून जळतां
भूगोळा । उरी कैंची ॥ १५ ॥ सूर्यास खडतरता चढे । हलकालोळ चहुंकडे ।
कोंसळती मेरूचे कडे । घडघडायमान ॥ १६ ॥ अमरावती सत्यलोक ।
वैकुंठ कैलासादिक । याहिवेगळे नाना लोक । भस्मोन जाती ॥ १७ ॥ मेरु
अवघाचि घसरे । तेथील महिमाच वोसरे । देवसमुदाव वावरे । वायोचक्रीं
॥ १८ ॥ भस्म जालियां धरत्री । पर्जन्य पडे शुंडाधारी । मही विरे जळांतरीं ।
निमिष्यमात्रें ॥ १९ ॥ पुढें नुस्तें उरेल जळ । तयास शोषील अनळ । पुढें
येकवटती ज्वाळ । मर्यादेवेगळे ॥ २० ॥ समुद्रींचा वडवानळ । शिवनेत्रींचा
नेत्रानळ । सप्तकंचुकींचा आवर्णानळ । सूर्य आणि विद्युल्लता ॥ २१ ॥ ऐसे ज्वाळ

क्षय निद्रेंत होतो म्हणून निद्राप्रळय. आतां देहांतसमय हा मृत्युप्रळय. देहांत अनेक रोगांचें प्राबल्य झाल्यानें किंवा कांहीं आकस्मिक प्रसंगानें देहांतून पंचप्राण निघून जातात व मागोमाग मनपवन जातो आणि खालीं नुस्तें शव राहतें यालाच मृत्युप्रळय म्हणतात. आतां ब्रह्मांडींचे प्रळय सांगतों. ब्रह्मदेव निजला कीं या मृत्युलोकाचा गोळा होऊन प्राणिमात्रांचे व्यापार खुंटतात व प्राण्यांचे सूक्ष्मांश वायुचक्रीं संचरतात. असा कांहीं काळ जातो. ब्रह्मदेव पुन्हां जागा झाला कीं पुन्हां सृष्टिरचनेचें काम सुरू होतें, व विखुरलेले सूक्ष्मांश (जीव) पुन्हां संसारीं येऊन सृष्टिचक्र सुरू होतें (६–१२). ब्रह्मदेवाचें आयुष्य संपलें कीं ब्रह्मप्रळयास प्रारंभ होतो. शंभर वर्षें पाऊस नसल्यानें सारी जीवसृष्टि मरण पावते, पृथ्वी अमर्याद फाटून जाते, बारापट सूर्याचें तेज वाढून साऱ्या पृथ्वीची होळी होते, अग्नीचा भडका लागून शेष ओकून मरतो, आकाशांत सूर्याच्या ज्वाळा भडकतात, व खालीं शेष विष ओकूं लागतो आणि या दोहींच्या भडक्यांत सारें ब्रह्मांड जळून जातें. सूर्याच्या खडतर तेजापुढें मेरुमांदार कोसळून इंद्राची अमरावती, ब्रह्मदेवाचा सत्यलोक, वैकुंठ, कैलास वगैरे सर्व लोक भस्म होऊन जातात. मेरु घसरत चालला कीं सारे देव वायुचक्रांत मिसळून जातात. मग हत्तीच्या सोंडेसारखी वृष्टि सुरू होऊन सारी सृष्टि जळांत निमिषार्धांत विरून जाते. नुस्तेंच जळ उरल्यावर (पृथ्वीचा आपांत लय झाल्यावर) त्याला अग्नि खाऊन टाकतो. अग्नीनें पेट घेतल्याबरोबर समुद्रांतला वडवानळ, शंकराच्या नेत्रींचें तेज, सप्तकंचुकांचा आवरणानळ (ब्रह्मांडाला पंचमहाभूतें, अहंकार व महत्तत्त्व या सप्तकंचुकांचा वेढा आहे तो), सूर्य,

एकवटती । तेणें देव देह सोडिती । पूर्वरूपीं मिळोन जाती । प्रभंजनीं ॥ २२ ॥ तो वारा झडपी वैश्वानरा । वन्ही विझेल येकसरा । वायो धांवे सैरावैरा परब्रह्मीं ॥ २३ ॥ धूम्र वितुळे आकाशीं । तैसें होईल समीरासी । बहुतांमध्यें थोडियासी । क्षयो बोलिला ॥ २४ ॥ वायो वितुळतांच जाण । सूक्ष्म भूतें आणि त्रिगुण । ईश्वर सांडी अधिष्ठान । निर्विकल्पीं ॥ २५ ॥ तेथें जाणीव राहिली । आणी जगज्जोती निमाली । शुद्ध सारांश उरली । स्वरूपस्थिती ॥ २६ ॥ जितुकीं कांहीं नामाभिधानें । तये प्रकृतीचेनि गुणें । प्रकृती नसतां बोलणें । कैसें बोलावें ॥ २७ ॥ प्रकृती अस्तांच विवेक कीजे । त्यास विवेकप्रळय बोलिजे । पांचही प्रळय वोजें । तुज निरोपिले ॥ २८ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पंचप्रळयनिरूपणनाम समास पंचम ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥ उत्पत्ती स्थिति संहार । याचा निरोपिला वेव्हार । परमात्मा निर्गुण निराकार । जैसा तैसा ॥ १ ॥ होतें वर्ततें आणि जातें । यांचा संबंध नाहीं त्यातें । आद्य मध्य अवसान तें । संचलेंचि आहे ॥ २ ॥ परब्रह्म असतचि असे । मध्येंचि हा भ्रम भासे । भासे परंतु अवघा नासे । काळांतरीं ॥ ३ ॥ उत्पत्तीस्थितीसंव्हारत । मध्येंहि अखंड होत जात । पुढें सेवटीं कल्पांत । सकळांस आहे ॥ ४ ॥ यामध्यें ज्यास विवेक आहे । तो आधींच जाणताहे । सारासार विचारें पाहे । म्हणोनियां ॥ ५ ॥ बहुत भ्रमिष्ट मिळाले । त्यांत उमजल्याचें काय चाले । सृष्टीमध्यें उमजले । ऐसे थोडे ॥ ६ ॥ त्या उमजल्यांचें लक्षण । कांहीं करूं निरूपण । भ्रमाहून विलक्षण । महापुरुष

विद्युत् साऱ्या ज्वाळा एकवटतात. देवांचे तेजोमय देह त्यांत मिसळतातच व त्यांचें पूर्वरूप जें वायु त्यांत लीन होतात. मग महाप्रभंजन (वायु) सुटून अग्नि विझून जातो व वायु मूळ ब्रह्माकडे धांवत सुटतो. धूर आकाशांत नाहींसा होतो तसा वायुही वितळून लय पावतो. वायुच्या लयांतच सूक्ष्म पंचभूतें व त्रिगुण यांची वळलेली सूक्ष्म अष्टधा प्रकृति व जाणीवरूप पुरुष (ईश्वर) यांचा म्ह० मूळमायेचा लय होऊन शुद्धस्वरूपस्थिति उरते. त्या स्वरूपाबद्दल काय बोलावें ? त्याच्या संकेतार्थ जीं जीं नांवे द्यावी, तीं तीं प्रकृतींतलींच असणार. प्रकृतीच आटली तेथें बोलणें कोठें उरलें ! प्रकृति असतांना विवेक करणें व विवेकानें पंचप्रळय जाणून स्वरूपाकार होणें हा पांचवा मोक्षदायक विवेक प्रळय होय. पंचप्रळय याप्रमाणें सुबोध करून (वोजें) सांगितले आहेत (१३–२८). [द० १०, स० ५]

उत्पत्तिस्थितिसंहाराचा प्रपंच करून दाखविला. निर्गुण परमात्मा या सर्वांहून पर आहे तसा आहे. होतें, राहवें व जातें याचा त्याशीं संबंध नाहीं. आदिमध्यावसानीं तोच तो संचला आहे. ' परब्रह्म असतचि असे ' आणि मध्येंच (त्याची उभारणी व संहारणी करून दाखविली आहे) सारा भ्रमाचा बाजार भासत असतो. अर्थात् जो भासतो तो नासतो हें उघडच आहे. पिंडब्रह्मांडांच्या घडामोडी नित्यशः होत असतात, पण कल्पांतीं सर्वांस नाश आहे. विवेकी पुरुष प्रकृतींत असतांही सारासार विचारानें उमजून स्वस्थ असतात. पण असे उमजलेले पुरुष विरळ असल्यामुळें व सारा भ्रमिष्टांचाच हा लोक असल्यामुळें यांत त्याचें काय चालणार ? उमजलेल्याचें लक्षण थोडक्यांत सांगायचें म्हणजे

॥ ७ ॥ भ्रम हा नसेल जयासी । मनीं वोळखावें तयासी । ऐक आतां भ्रमासी । निरोपिजेल ॥ ८ ॥ येक परब्रह्म संचलें । कदापी नाहीं विकारलें । त्यावेगळें जें भासलें । तें भ्रमरूप ॥ ९ ॥ जयासी बोलिला कल्पांत । त्रिगुण आणी पंचभूत । हे अवघेचि समस्त । भ्रमरूप ॥ १० ॥ मी तूं हा भ्रम । उपासना हाही भ्रम । ईश्वरभाव हाही भ्रम । निश्चयेंसी ॥ ११ ॥

॥ श्लोक ॥ भ्रमेणाहं भ्रमेण त्वं भ्रमेणोपासका जनाः । भ्रमेणेश्वरभावत्वं भ्रममूलमिदं जगत् ॥ १ ॥

याकारणें सृष्टि भासत । परंतु भ्रमचि हा समस्त । यामध्यें जे विचारवंत । तेचि धन्य ॥ १२ ॥ आतां भ्रमाचा विचारु । अत्यंतचि प्रांजळ करूं । दृष्टांतद्वारें विवरूं । श्रोतयांसी ॥ १३ ॥ भ्रमण करितां दुरी देसीं । दिशाभूलि आपणासी । कां वोळखी मोडे जीवलगांसी । या नांव भ्रम ॥ १४ ॥ कां उन्मत्त द्रव्य सेविलें । तेणें अनेक भासों लागलें । नाना व्यथां कां भुतें झडपिलें । या नांव भ्रम ॥ १५ ॥ दशावतारीं वाटती नारी । कां ते मांडली बाजीगरी । उगाच संदेह अंतरीं । या नांव भ्रम ॥ १६ ॥ ठेविला ठाव तो विसरला । कां मार्गीं जातां मार्ग चुकला । पट्टणामध्यें भांबावला । या नांव भ्रम ॥ १७ ॥ वस्तु आपणापासीं असतां । गेली म्हणोनि होय दुश्चिता । आपलें आपण विसरतां । या नांव भ्रम ॥ १८ ॥ कांहीं पदार्थ विसरोन गेला । कां जें सिकला तें विसरला । स्वप्नदुःखें घाबिरा जाला । या नांव भ्रम ॥ १९ ॥ दुश्चिन्हें अथवा अपशकुन । मिथ्या वार्तेनें भंगे मन । वचके पदार्थ देखोन । या नांव भ्रम ॥ २० ॥ वृक्ष काष्ठ देखिलें । मनांत वाटे भूत आलें । कांहींच नसतां हडबडिलें । या नांव भ्रम ॥ २१ ॥ काच म्हणोन उदकांत पडे । कां सभा देखोन दर्पणीं पवाडे । द्वार चुकोन भलतीकडे । जाणें या नांव भ्रम ॥ २२ ॥ येक अस्तां

तो भ्रमांत नसतो ! जो सकलभ्रमांवेगळा तो महापुरुष जाणावा (१–८). आतां भ्रम कोणता तें दाखवूं. निर्विकार परब्रह्म जें सर्वत्र संचलें आहे त्यावेगळें बाकी सर्व भ्रमरूप आहे. कल्पांतीं नाहींशी होणारी अष्टधाप्रकृति भ्रमरूप आहे. मी तूं हा भ्रम, उपासना भ्रम, ईश्वरभाव हाही भ्रमच. भासमान सकळ सृष्टि भ्रमरूप असून यांत विवेकानें वेगळा होईल तेवढाच धन्य होय (९–१२). आतां भ्रमाचा विचार दृष्टांतरूपानें स्पष्ट करून दाखवूं. परदेशांत भ्रमण करितांना दिशाभूल होणें, जिवलगांची ओळख विसरणें, भूतानें पछाडणें, मद्यादिसेवनानें उन्मत्त होऊन एकाचें अनेक दिसणें, संशयाच्या भोंवऱ्यांत फिरणें, ललित व नाटकें यांतील स्त्रीपात्रें खरीं वाटणें, मार्ग चुकून नगरींत भटकत राहणें, पुरलेल्या निधानाची जागा चुकणें, वस्तु आपली आपल्याजवळ असतांना ती हरवली आहे असें वाटून दुश्चित होणें, शिकलेलें विसरणें, स्वप्नदुःखानें घाबरणें, दुश्चिन्ह किंवा अपशकून झालासें वाटून भयभीत होणें, खोट्या वार्तेनें उदास होणें, झाड किंवा खांब पाहून भूतसें वाटणें, जरा कांहीं खडबडलें कीं दचकणें, कांच म्हणून पाण्यांत पडणें, दर्पणांत सभा पाहून सभाप्रवेश

येक वाटे। येक सांगतां येक निवटे। येक दिसतां येक उठे। या नांव भ्रम ॥ २३ ॥ आतां जें जें देइजेतें। तें तें पुढें पाविजेतें। मेलें माणुस भोजना येतें। या नांव भ्रम ॥ २४ ॥ ये जन्मीचें पुढिलिये जन्मीं। कांहीं येक पावेन मी। प्रीती गुंतली मनुष्याचे नामीं। या नांव भ्रम ॥ २५ ॥ मेलें मनुष्य स्वप्ना आलें। तेणें कांहीं मागितलें। मनीं अखंड बैसलें। या नांव भ्रम ॥ २६ ॥ अवघें मिथ्या म्हणोन बोले। आणी सामर्थ्यावरी मन चाले। ज्ञाते वैभवें दपटले। या नांव भ्रम ॥ २७ ॥ कर्मठपणें ज्ञान विटे। कां ज्ञातेपणें बळें भ्रष्टे। कोणीयेक सीमा फिटे। या नांव भ्रम ॥ २८ ॥ देहाभिमान कर्माभिमान। जात्याभिमान कुळाभिमान। ज्ञानाभिमान मोक्षाभिमान। या नांव भ्रम ॥ २९ ॥ कैसा न्याय तो न कळे। केला अन्याय तो नाडळे। उगाच अभिमानें खवळे। या नांव भ्रम ॥ ३० ॥ मागील कांहीं आठवेना। पुढील विचार सुचेना। अखंड आरूढ अनुमाना। या नांव भ्रम ॥ ३१ ॥ प्रचीतीविण औषध घेणें। प्रचीत नस्तां पथ्य करणें। प्रचीतीवीण ज्ञान सांगणें। या नांव भ्रम ॥ ३२ ॥ फळश्रुतीवीण प्रयोग। ज्ञानेंवीण नुस्ता योग। उगाच शरीरें भोगिजे भोग। या नांव भ्रम ॥ ३३ ॥ ब्रह्मा लिहितो अदृष्टीं। आणी वाचून जाते सटी। ऐशा प्रकारींच्या गोष्टी। या नांव भ्रम ॥ ३४ ॥ उदंड भ्रम विस्तारला। अज्ञानजनीं पैसावला। अल्प संकेतें बोलिला। कळावयाकारणें ॥ ३५ ॥ भ्रमरूप विश्व स्वभावें। तेथें काय म्हणोन सांगावें। निर्गुण ब्रह्मावेगळें आघवें। भ्रमरूप ॥ ३६ ॥ ज्ञात्यास नाहीं संसार। ऐसें बोलती अपार। गत ज्ञात्यांचे चमत्कार। या नांव भ्रम

करणं, मुख्य द्वार चुकून भलतीकडे भटकणें, एक असतां एक वाटणें, एक सांगतां एक ऐकणें, हीं सारीं भ्रमाचीं लक्षणें होत (१३–२३). आतां जें द्यावें त्याचें फळ पुढें मिळतें, मेलेलें मनुष्य जेवावयाला येतें, एखाद्याच्या नांवाचें प्रेम वाटतें, हा सारा भ्रमाचा प्रकार. मृत मनुष्य स्वप्नांत आलं, त्यानें कांहीं मागितलं व त्याचेंच चिंतन करीत बसणें हा भ्रमिष्टपणा (२४–२६). शहाण्यांतही भ्रम कसा असतो पहा. सर्व मिथ्या म्हणून तोंडानें सांगतो व आपली बडेजावी किंवा महती कशी वाढेल याची चिंता करितो, जाणता असून बाह्य वैभवाला भुलतो, कर्मठपणाच्या तोऱ्यांत ज्ञानाला तुच्छ गणतो, नाहीं तर मी ज्ञाता-ब्रह्मरूप म्हणून अनाचार करितो – याप्रमाणें कोणत्याही मार्गाचा अतिशय करितो तो भ्रमिष्टच होय. देहाभिमान, कर्माभिमान, जात्यभिमान, कुळाभिमान, ज्ञानाभिमान, मोक्षाभिमान इ. सर्व प्रकारचे अभिमान भ्रमरूपच होत. न्याय कळत नाहीं; अन्याय करीत असून समजत नाहीं, मागचें कांहीं आठवत नाहीं व पुढचें कांहीं सुचत नाहीं, अभिमानानें उगाच फुगतो किंवा अनुमानें बांधीत बसतो तो भ्रमरूपच जाणावा. प्रचीतीवीण औषध घेणें किंवा उगाच पथ्य करणें, अनुभव नसतां ज्ञान सांगणें, फलश्रुतीवीण प्रयोग करणें, ज्ञानविरहित योग करणें, शरीरभोगावर मन ठेवणें, हे सारे भ्रम होत. ब्रह्मदेव कपाळावर लिहून ठेवतो तें सटवी वाचून जाते अशा गोष्टी भ्रमांतल्याच. अज्ञानजनांत अनेक लोकभ्रम माजलेले आढळतात. थोडक्यांत सुचविलें आहे (२७–३५). सारें विश्वच ब्रह्मरूप आहे तेथें भ्रमांना काय कमी आहे ?

॥ ३७ ॥ येथें आशंका उठिली । ज्ञात्याची समाधी पूजिली । तेथें कांहीं साक्ष आली । किंवा नाहीं ॥ ३८ ॥ तैसेचि अवतार संपले । त्यांचेंही सामर्थ्य उदंड चाले । तरी ते काय गुंतले । वासना धरूनी ॥ ३९ ॥ ऐसी आशंका उद्भवली । समर्थें पाहिजे निरसिली । इतुकेन हे समाप्त जाली । कथा भ्रमाची ॥ ४० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे भ्रमनिरूपणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ अवतारादिक ज्ञानी संत । सारासारविचारें मुक्त । त्यांचें सामर्थ्य चालत । कोण्या प्रकारें ॥ १ ॥ हे श्रोतयांची आशंका । पाहतां प्रश्न केला निका । सावध होऊन ऐका । म्हणे वक्ता ॥ २ ॥ ज्ञानी मुक्त होऊन गेले । मागें त्यांचें सामर्थ्य चाले । परंतु ते नाहीं आले । वासना धरूनी ॥ ३ ॥ लोकांस होतो चमत्कार । लोक मानिती साचार । परंतु याचा विचार । पाहिला पाहिजे ॥ ४ ॥ जीत अस्तां नेणों किती । जनामध्यें चमत्कार होती । ऐसियाची सद्यप्रचिती । रोकडी पाहावी ॥ ५ ॥ तो तरी आपण नाहीं गेला । लोकीं प्रत्यक्ष देखिला । ऐसा हा चमत्कार जाला । यास काय म्हणावें ॥ ६ ॥ तरी हा लोकांचा भावार्थ । भाविकां देव यथार्थ । अन्यत्र कल्पना व्यर्थ । कुतर्कांची ॥ ७ ॥ आवडे तें स्वप्नीं देखिलें । तरी काय तेथून आलें । म्हणाल तेणें आठविलें । तरी द्रव्य कां दिसे ॥ ८ ॥ एवं आपुली कल्पना । स्वप्नीं येती पदार्थ नाना । परी ते पदार्थ चालतीना । अथवा आठऊ नाहीं ॥ ९ ॥ येथें तुटली आशंका । ज्ञात्यास जन्म कल्पूं

निर्गुण ब्रह्मावेगळें अवघें भ्रमरूप होय. ज्ञात्यांचे चमत्कार हाही भ्रमच. यावर कोणी शंका घेईल कीं सत्पुरुषांच्या समाधीची पूजा करण्यानें प्रचीत येते ती खरी कीं भ्रमरूप ? तसेंच अवतार पुरुषांचें सामर्थ्य त्यांच्या पश्चात् चालतें तेव्हां ते काय वासनेंत गुंतले आहेत कीं काय ? याचें उत्तर पुढें देऊं (३६–४०). [द० १०, स० ६]

प्रश्न—देवाचे अवतार, किंवा सारासारविचारानें मुक्त झालेले ज्ञानी संत यांचें सामर्थ्य त्यांच्या पश्चात् कसें चालतें ? त्यांची वासना बाकी राहिलेली असते काय ? (१–२). उत्तर—अशा अवतारी महापुरुषांचें सामर्थ्य त्यांच्या मागें चालतें ; पण ते वासना धरून येतात म्हणून मात्र नव्हे. भाविकांना त्यांचे चमत्कार खरे वाटतात, जिवंत असतांनाही संतांचे किती चमत्कार जनांत पसरतात, पण या गोष्टींचा नीट विचार केला पाहिजे. सत्पुरुष वासना धरून येत नाहींत ; पण लोकांना ते प्रत्यक्ष दिसतात – भेटतात, याला काय म्हणावें ? तर हा भाविक लोकांच्या विश्वासाचा भाग आहे, त्यांना देव खराच आहे, त्याबद्दल व्यर्थ कुतर्क काढीत बसण्यांत अर्थ नाहीं. आपल्या आवडीच्या वस्तु स्वप्नांत दिसतात म्हणून काय त्या देव तेथें पाठवितो ? मनुष्याला त्या स्मरणाभ्यासानें प्रत्यक्षासारख्या दिसतात, इतकेंच. तात्पर्य, हे सारे कल्पनेचे खेळ आहेत, कल्पनेमुळेंच स्वप्नांत अनेक पदार्थ दिसतात, पण ते पदार्थ कोठून चालून येत नाहींत किंवा त्यांची आठवण असतेच असेंही नाहीं. तात्पर्य, संत जन्म घेऊन येतात अशी कल्पना करूं नका. हें एकदम लक्षांत न आल्यास चांगला

नका । उमजेना तरी विवेका । बरें पाहा ॥ १० ॥ ज्ञानी मुक्त होऊन गेले । त्यांचें सामर्थ्य उगेंचि चाले । कां जे पुण्यमार्गें चालिले । म्हणोनियां ॥ ११ ॥ याकारणें पुण्यमार्गें चालावें । भजन देवाचें वाढवावें । न्याय सांडून न जावें । अन्यायपंथें ॥ १२ ॥ नाना पुरश्चरणें करावीं । नाना तीर्थाटणें फिरावीं । नाना सामर्थ्यें वाढवावीं । वैराग्यबळें ॥ १३ ॥ निश्चयो बैसे वस्तूकडे । तरी ज्ञानमार्गेंहि सामर्थ्य चढे । कोणीयेक येकांत मोडे । ऐसें न करावें ॥ १४ ॥ येक गुरु येक देव । कोठें तरी असावा भाव । भावार्थ नस्तां वाव । सर्व कांहीं ॥ १५ ॥ निर्गुणीं ज्ञान जालें । म्हणोनी सगुण अलक्ष केलें । तरी तें ज्ञातें नागवलें । दोहींकडे ॥ १६ ॥ नाहीं भक्ति नाहीं ज्ञान । मध्येंच पैसावला अभिमान । म्हणोनियां जपध्यान । सांडूंच नये ॥ १७ ॥ सांडील सगुणभजनासी । तो ज्ञाता परी अपेसी । म्हणोनियां सगुणासी । सांडूंचि नये ॥ १८ ॥ निःकाम बुद्धीचिया भजना । त्रैलोकीं नाहीं तुळणा । समर्थेंविण घडेना । निःकाम भजन ॥ १९ ॥ कामनेनें फळ घडे । निःकाम भजनें भगवंत जोडे । फळ भगवंता कोणीकडे । महदंतर ॥ २० ॥ नाना फळें देवापासी । आणी फळ अंतरी भगवंतासी । याकारणें परमेश्वरासी । निःकाम भजावें ॥ २१ ॥ निःकाम भजनाचें फळ आगळें । सामर्थ्य चढे मर्यादेवेगळें । तेथें बापुडीं फळें । कोणीकडे ॥ २२ ॥ भक्तें जें मनीं धरावें । तें देवें आपणचि करावें । तेथें वेगळें भावावें । नलगे कदा ॥ २३ ॥ दोनी सामर्थ्यें एक होतां । काळास नाटोपे सर्वथा । तेथें इतरांची कोण कथा ।

विचार करून पहा (३–१०). ज्ञाते मुक्त होऊन गेल्यावर त्यांचे मागें सामर्थ्य चालतें तें ते पुण्यमार्गानें गेलेले असतात म्हणून. हें लक्षांत ठेवून त्यांच्याप्रमाणें आपणही पुण्यमार्गानें चालावें, देवाची भक्ति वाढवावी, न्यायनीतीनें चालावें व अन्यायानें वागूं नये. पुरश्चरणें व तीर्थाटणें यांचा मार्ग धरावा, वैराग्यबळानें आपलेंही सामर्थ्य वाढवावें. स्वस्वरूपीं स्थिरता प्राप्त झाली तर ज्ञानमार्गानेंही सामर्थ्य वाढतें, अशासाठीं एकांत भंग पावेल असें कांहींहीं करूं नये. एक गुरु व एक उपास्य निश्चित करून तेथें अचल विश्वास ठेवावा, विश्वासावांचून सर्व निष्फळ होय (११–१५). निर्गुण ज्ञान झालें म्हणून सगुणाची कोणीं हेळसांड करील तर तो ज्ञाता असला तरी दोहींला मुकेल. धड ज्ञान नाहीं व धड भक्ति नाहीं, असें होऊन हा अनुमानाच्या गोत्यांत सांपडतो, यासाठीं जपध्यानाचा अभ्यास सोडूं नये. सगुणोपासना सोडील तर ज्ञाता असूनही अपयश पावेल म्हणून सगुण केव्हांही सोडूं नये. निष्काम भक्तीला तोड नाहीं, पण ती फार मोठी योग्यता (पुण्याई)असल्यावांचून घडत नाहीं. सकाम भक्तीनें कामना पूर्ण होतात पण निष्काम भक्तीनें परमात्मा जोडतो, कामपूर्तता व भगवत्प्राप्ति या दोहोंत अंतर केवढें आहे ! फळदाता तरी भगवानच आहे. पण फळाकडे नजर ठेवली कीं भगवान् अंतरतात ; म्हणून निष्काम भक्तीनें देवाला वश करावें. निष्काम भजनाचें फळ अतिशय मोठें आहे ; त्यामुळें अमर्याद सामर्थ्य अंगीं चढतें. त्या सामर्थ्यापुढें सकाम भक्तीनें प्राप्त होणारीं फळें केवळ तुच्छ होत. निष्काम भक्ताच्या मनांत जें जें येतें तें तें देव तात्काळ आपण होऊन पुरें करितो. असा भक्त व देव एकच असतात, त्यांच्यांत दुजेपण नसतें.

कीटकन्यायें ॥ २४ ॥ म्हणोन निःकाम भजन । वरी विशेष ब्रह्मज्ञान । तयास तुळितां त्रिभुवन । उणें वाटे ॥ २५ ॥ येथें बुद्धीचा प्रकाश । आणीक न चढे विशेष । प्रताप कीर्ती आणी यश । निरंतर ॥ २६ ॥ निरूपणाचा विचार । आणी हरिकथेचा गजर । तेथें होती तत्पर । प्राणीमात्र ॥ २७ ॥ जेथें भ्रष्टाकार घडेना । तो परमार्थही दडेना । समाधान विघडेना । निश्चयाचें ॥ २८ ॥ सारासारविचार करणें । न्याय अन्याय अखंड पाहाणें । बुद्धि भगवंताचें देणें । पालटेना ॥ २९ ॥ भक्त भगवंतीं अनन्य । त्यासी बुद्धि देतो आपण । यदर्थीं भगवद्वचन । सावध ऐका ॥ ३० ॥

॥ श्लोकार्ध ॥ ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते ॥ ६ ॥

म्हणोनी सगुणभजन । वरी विशेष ब्रह्मज्ञान । प्रत्ययाचें समाधान । दुर्लभ जगीं ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सगुणभजननिरूपणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ ऐका प्रचीतीचीं लक्षणें । प्रचित पाहतील ते शहाणे । येर वेडे दैन्यवाणे । प्रचीतीविण ॥ १ ॥ नाना रत्नें नाना नाणीं । परीक्षून न घेतां हानी । प्रचीत येतां निरूपणीं । बैसोंच नये ॥ २ ॥ तुरंग शस्त्र दमून पाहिलें । बरें पाहतां प्रचीतीस आलें । तरी मग पाहिजे घेतलें । जाणतें पुरुषीं ॥ ३ ॥ बीज उगवेलसें पाहावें । तरी मग द्रव्य घालून घ्यावें । प्रचीत आलिया ऐकावें । निरूपण ॥ ४ ॥ देहीं आरोग्यता जाली । ऐसी जना प्रचीत आली । तरी मग अगत्य घेतली । पाहिजे मात्रा ॥ ५ ॥ प्रचीतीविण औषध घेणें । तरी मग

याप्रमाणें भक्ताचें सामर्थ्य व देवाचें सामर्थ्य हीं दोन्हीं सामर्थ्यें एकच झालीं कीं त्यापुढें कळिकाळाची मात्रा चालत नाहीं, मग इतरांचा कीटकन्यायानें काय पाड ? म्हणून निष्काम भक्ति व विमल ब्रह्मज्ञान हीं दोन्हीं जेथें एकवटतात त्यापुढें त्रैलोक्य हीण होय. त्यापुढें अचाट बुद्धीच्या पुरुषाचेंही तेज फिकें पडतें. यश कीर्ति व प्रताप तेथें निरंतर वास्तव्य करितात. जेथें ज्ञानाचें निरूपण व हरिकीर्तनाचा गजर म्ह. ज्ञानभक्ति एक होतात तेथें प्राणिमात्र वश होतें. जेथें भ्रष्टाकार नाहीं तेथल्या परमार्थाचें तेज फांकतें व विवेकसमाधान खंड पावत नाहीं. असो. सारासार विवेक व न्यायनीति दोन्ही जाज्वल्य आहेत अशी बुद्धि भगवंतानेंच द्यावी लागते. भगवान् अनन्यभक्ताला अशी बुद्धि देतात. 'ददामि बुद्धियोगं तं'' असें त्यांनींच गीतेंत म्हटलें आहे. तात्पर्य, निष्काम सगुण भक्ति व मुरलेलें ब्रह्मज्ञान या दोन्ही गोष्टी जेथें एकत्र असतात तेथेंच अनुभाविक ज्ञान मिळतें व तें अत्यंत दुर्लभ होय (१६–३१). [द. १०, स. ७].

आतां प्रचीतीचीं लक्षणें सांगतों तीं ऐका. प्रचीत पाहील तो शहाणा; प्रचीत नाहीं तर जिणें दैन्यवाणें होय. रत्नांची व नाण्यांची पारख न करितां घेतल्यास हानि होते, घोडा व शस्त्र परीक्षूनच घेतलें पाहिजे. उगवेलसें वाटलें तरच पैसा खर्चून पेरणीचें बीं घ्यावें, प्रचीत आली तरच निरूपण ऐकावें. मात्रेचा दुसऱ्यांस गुण येऊन आरोग्य झालें असें ऐकल्यावरच मात्रा घ्यावी. प्रचीतीवांचून औषध घेतल्यास प्रकृति धड असलेली बिघडण्याचा संभव. अनुमानानें कांहींही कार्य करणें मूर्खत्वच होय. प्रचीत पाहिल्यावांचून सोनें घेऊन दागिने घडविले

घडचि विघडणें। अनुमानें जें कार्य करणें। तेंचि मूर्खपण ॥ ६ ॥ प्रचीतीसि नाहीं आलें। आणी सुवर्ण करविलें। तरी मग जाणावें ठकिलें। देखतदेखतां ॥ ७ ॥ शोधून पाहिल्याविण। कांहींतरी येक कारण। होणार नाहीं निर्वाण। प्राणास घडे ॥ ८ ॥ म्हणोनी अनुमानाचें कार्य। भल्यांनीं कदापि करूं नये। उपाय पाहातां अपाय। नेमस्त घडे ॥ ९ ॥ पाण्यांतील म्हैसीची साटी। करणें हे बुद्धीच खोटी। शोधिल्याविण हिंपुटी। होणें घडे ॥ १० ॥ विश्वासें घर घेतलें। ऐसें कितीं नाहीं ऐकिलें। मैंदें मैंदावें केलें। परी तें शोधिलें पाहिजे ॥ ११ ॥ शोधिल्याविण अन्नवस्त्र घेणें। तेणें प्राणास मुकणें। लटिक्याचा विश्वास धरणें। हें मूर्खपण ॥ १२ ॥ संगती चोराची धरितां। घात होईल तत्वतां। ठकु सिंतरु शोधितां। ठाईं पडे ॥ १३ ॥ गैरसाळ तामगिरी। कोणी नवी मुद्रा करी। नाना कपट परोपरी। शोधून पाहावें ॥ १४ ॥ दिवाळखोरांचा मांड। पाहातां वैभव दिसे उदंड। परी तें अवघें थोतांड। भंड पुढें ॥ १५ ॥ तैसें प्रचीतीवीण ज्ञान। तेथें नाहीं समाधान। करून बहुतांचा अनुमान। अनहित जालें ॥ १६ ॥ मंत्र यंत्र उपदेसिले। नेणते प्राणी ते गोंविले। तैसें झांकून मारिलें। दुखणाईत ॥ १७ ॥ वैद्य पाहिला परी कच्चा। तरी प्राण गेला पोराचा। येथें उपाय दुसऱ्याचा। काय चाले ॥ १८ ॥ दुःखें अंतरीं झिजे। आणी वैद्य पुसतां लाजे। तरी मग त्यासी साजे। आत्महत्यारेपण ॥ १९ ॥ जाणत्यावरी गर्व केला। तरी नेणत्याकारितां बुडाला। येथें कोणाचा घात जाला। बरें पाहा ॥ २० ॥ पापाची खंडणा जाली। जन्मयातना चुकली। ऐसी स्वयें प्रचीत आली। म्हणजे बरें ॥ २१ ॥ परमेश्वरास

तर ती फसवण्याचीच जागा होय. शोधिल्यावांचून कांहींही काम केल्यास प्राणांत व्हायचा प्रसंग! म्हणून अनुमानानें चालूं नये, चालल्यास उपाय केले तर अपायच होतात (१–९). पाण्यांत बसलेल्या म्हशीची खरेदी (साटी) केल्यास तें कष्टदायक होतें. 'अमक्या तमक्यानें विश्वासानें घर घेतलें' ही भाषा कोणीं ऐकली नाहीं? लबाडाच्या लबाड्या शोधून पाहाव्यात. शोधिल्यावांचून अन्नवस्त्र घेणें म्हणजे प्राणांसच मुकणें होय. लटिक्याचा विश्वास धरणें मूर्खपणाचें होय. चोराची संगत धरली कीं आपला घात व्हायचा हें ठरलेलेंच. लबाड, फसव्या मनुष्य बारकाईनें पाहिला म्हणजे समजून येतो. गैरवर्तनी किंवा तामसी लोक, व नवनवे वेषधारी भामटे यांचा बारीक तलास घेऊन हे परीक्षून ठेवावे. दिवाळखोरांचा बाह्य पसारा पाहातांच भोळा माणूस त्या खोट्या वैभवानें दिपून जातो, पुढें उघडकीस येऊन फजीतवाडा होतोच. त्याप्रमाणें प्रचीतीवांचून ज्ञान फोल होय, त्यानें समाधान होत नाहीं. बहुतांना व्यर्थ नादीं लावल्यानें शेवटीं याचें अनहितच होतें (१०–१६). मंत्रतंत्रांचा नेणत्यांना उपदेश करून गोवणें म्ह. दुखणाईत झांकून मारल्यासारखेंच पापावह आहे. कच्चा वैद्य पाहिला कीं शेवटीं पोराचा प्राण जायचा हें ठरलेलेंच. दुःखानें अंतर्यामीं कासावीस झालेला मनुष्य वैद्यापुढेंही लाजेनें खरें सांगणार नाहीं तर तो आत्मघातकीच होय. स्वतः नेणता म्हणून समजत नाहीं व जाणत्याशीं अढ्यतेनें वागायचें यांत घात कोणाचा होईल? (१७–२०) सकल पातकांचें खंडण होऊन आपण जन्ममरणापासून सुटलों

बोळखिलें। आपण कोणसें कळलें। आत्मनिवेदन जालें। म्हणिजे बरें ॥२२॥ ब्रह्मांड कोणें केलें। कासयाचें उभारलें। मुख्य कर्त्यास वोळखिलें। म्हणजे बरें ॥ २३ ॥ येथें अनुमान राहिला। तरी परमार्थ केला तो वायां गेला। प्राणी संशईं बुडाला। प्रचीतीविण ॥ २४ ॥ हें परमार्थाचें वर्म। लटिकें बोले तो अधम। लटिकें मानी तो अधमाधम। यथार्थ जाणावा ॥ २५ ॥ येथें बोलण्याची जाली सीमा। नेणतां न कळे परमात्मा। असत्य नाहीं सर्वोत्तमा। तूं जाणसी ॥ २६ ॥ माझे उपासनेचा बडिवार। ज्ञान सांगावें साचार। मिथ्या बोलतां उत्तर। प्रभूस लागे ॥ २७ ॥ म्हणोनि सत्यचि बोलिलें। कर्त्यास पाहिजे वोळखिलें। मायोद्भवाचें शोधिलें। पाहिजे मूळ ॥ २८ ॥ तेंचि पुढें निरूपण। बोलिलेंचि बोलिलें प्रमाण। श्रोतीं सावध अंतःकरण। घातलेंचि घालावें ॥ २९ ॥ सूक्ष्म निरूपण लागलें। तेथें बोलिलेंचि मागुतें बोलिलें। श्रोत्यांस पाहिजे उमजलें। म्हणोनियां ॥ ३० ॥ प्रचित पाहातां निकट। उडोन जाती परिपाठ। म्हणोनि हे खटपट। करणें लागे ॥ ३१ ॥ परिपाठेंचि जरि बोलिलें। तरी प्रचीतसमाधान बुडालें। प्रचीतसमाधान राखिलें। तरी परिपाठ उडे ॥ ३२ ॥ ऐसी सांकडी दोहींकडे। म्हणोन बोलिलेंचि बोलणें घडे। दोनी राखोनियां कोडें। उकलून दावूं ॥ ३३ ॥ परिपाठ आणी प्रचीत प्रमाण। दोन्ही राखोन निरूपण। श्रोते परम विचक्षण। विवरोत पुढें ॥ ३४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रचीतनिरूपणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

अशी स्वतःस प्रचीति आली म्हणजे बरें. परमेश्वरास ओळखावें, आपण कोण हें समजून घ्यावें व आत्मनिवेदनानें मोकळें व्हावें म्हणजे जन्मसाफल्य झालें. ब्रह्मांडाचा कर्ता कोण तें कशाचें झालें आहे, मुख्य कर्ता कोण हें सर्व उमजावें. याविषयीं जर निःसंदेहपणा आला नाहीं तर परमार्थाविषयीं सर्व खटपटी व्यर्थ होत. ती प्रचीति नसल्यामुळें संशयांत बुडाला असें समजावें. परमार्थाचें वर्म हें आहे यांत खोटें असेल तर बोलणारा अधम व हें खोटें मानील तो अधमाधम होय (२१–२२) बोलण्याची सीमा झाली. परमात्म्याला ओळखलें नाहीं तर त्याशीं ऐक्यता होत नाहीं. यांत असत्य लेशमात्र नाहीं. श्रीरामा! तूंच यथार्थ जाणतोस. खरें ज्ञान सांगावें हीच माझ्या उपासनेची महती आहे. मिथ्या सांगितल्यास त्याचा शब्द प्रभु रामरायास लागेल. तो लागूं नये म्हणून खरेंच सांगितलें आहे. कर्ता कोण तो ओळखावा म्हणजे मायोद्भवाचें मूळ शोधावें. हेंच काय तें खरें ज्ञान होय (२३–२८). श्रोत्यांनीं सावधपणें ऐकावें म्हणून सांगितलेलें पुन्हां सांगतों. हा सूक्ष्माचा विषय श्रोत्यांनीं उमजावा म्हणून पुनः पुन्हां सांगावा लागतो. प्रचीतसमाधान राखायला जावें तर लोकपरिपाठाला (लौकिक समजुतीला) सोडून बोलावें लागतें. बरें परिपाठाप्रमाणें (जनरूढीप्रमाणें) बोलावें तर प्रचीतीचें समाधान लाभत नाहीं. आम्हांला दोन्ही संभाळायचीं असल्यामुळें तेंच तें पुनः पुन्हां सांगावें लागतें (२९–३४). [द. १०, स. ८]

॥ श्रीराम ॥ आकाशीं वायो जाला निर्माण । तैसी ब्रह्मीं मूळमाया जाण । त्या वायोमध्यें त्रिगुण । आणी पंचभूतें ॥ १ ॥ वटबीजीं असे वाड । फोडून पाहातां न दिसे झाड । नाना वृक्षांचें जुंबाड । बीजापासून होती ॥ २ ॥ तैसी बीजारूप मूळमाया । विस्तार जाला तेथूनियां । तिचें स्वरूप शोधूनियां । बरें पाहावें ॥ ३ ॥ तेथें दोनी भेद दिसती । विवेकें पाहावी प्रचिती । निश्चळीं जे चंचळ स्थिती । तोचि वायो ॥ ४ ॥ तयामध्यें जाणीवकळा । जगज्जोतीचा जिव्हाळा । वायो जाणीव मिळोन मेळा । मूळमाया बोलिजे ॥ ५ ॥ सरिता म्हणतां बायको भासे । तेथें पाहातां पाणीच असे । विवेकी हो समजा तैसें । मूळमायेसी ॥ ६ ॥ वायो जाणीव जगज्जोती । तयास मूळमाया म्हणती । पुरुष आणी प्रकृती । याचेंच नांव ॥ ७ ॥ वायोस म्हणती प्रकृती । आणि पुरुष म्हणती जगज्जोती । पुरुषप्रकृती शिवशक्ती । याचेंच नांव ॥ ८ ॥ वायोमध्यें जाणीव विशेष । तोचि प्रकृतीमध्यें पुरुष । ये गोष्टीचा विश्वास । धरिला पाहिजे ॥ ९ ॥ वायो शक्ति जाणीव ईश्वर । अर्धनारी नटेश्वर । लोक म्हणती निरंतर । येणें प्रकारें ॥ १० ॥ वायोमध्यें जाणीव गुण । तेंचि ईश्वराचें लक्षण । तयापासून त्रिगुण । पुढें जाले ॥ ११ ॥ त्या गुणांमध्यें सत्वगुण । निखळ जाणीवलक्षण । त्याचा देहधारी आपण । विष्णु जाला ॥ १२ ॥ त्याच्या अंशें जग चाले । ऐसें भगवद्गीता बोले । गुंतले तेचि उगवले । विचार पाहातां ॥ १३ ॥ येक जाणीव वांटली । प्राणीमात्रांस विभागली । जाणजाणों वांचविली । सर्वत्र काया ॥ १४ ॥ तयेचें नांव जगज्जोती । प्राणीमात्र तिचेन जिती । याची रोकडी प्रचीती । प्रत्यक्ष पाहावी ॥ १५ ॥ पक्षी

आकाशापासून जसा वायु निर्माण झाला तशी ब्रह्मीं मूळमाया झाली. वायुस्वरूप मूळमायेंत त्रिगुणपंचभूतात्मक अष्टधा प्रकृति अतिसूक्ष्म अशी होती. वटबीज फोडून पाहिलें तर त्यांत कांहीं वटवृक्षाचा प्रचंड विस्तार सांपडायचा नाहीं पण तो बीजांत असतो. मुळांत असतें तेंच व्यक्त दशेला येतें. ज्या बीजभूत मूळमायेपासूनच हा सृष्टिरचनेचा अवडंबर निर्माण झाला तिचें स्वरूप शोधून पहावें (१–३). मूळमायेंत दोन भेद दिसतात; त्याची प्रचीति विवेकानें पाहावी. निश्चळीं जी चंचल स्थिति तीच वायु. त्यांतील जी जाणीव तोच जगज्योतीचा मूळ झरा होय. प्राणी व वायु मिळून मूळमाया. मूळमाया शब्द स्त्रीलिंगी आहे म्हणजे मूळमाया स्त्री आहे असें नव्हे. नदी हा शब्द स्त्रीलिंगी म्हणजे नदी कांहीं स्त्री नव्हे तसेंच हें समजावें. जाणीव व वायु यांनाच पुरुषप्रकृति किंवा शिवशक्ति अशीं नांवें आहेत. वायुस्वरूप मूळमायेंतील जाणीव तोच पुरुष. वायु ही शक्ति व जाणीव हा शिव (ईश्वर). हीं उभयतां एकरूप असल्यामुळें मूळमायेला अर्धनारीनटेश्वर म्हणतात (४–१०). वायूंतील जाणीव तो ईश्वर, त्यापासूनच त्रिगुण झाले. त्या त्रिगुणांत सत्वगुण म्ह. शुद्ध जाणीव त्याचा देहधारी विष्णु. त्याच्या अंशानें जग चालतें. असें गीताच बोलत आहे. असा मूळापर्यंत जे विचार करितील ते मायेंत गुंतले असले तरी मुक्त होतील. एकच जाणीव सर्व प्राण्यांत खेळत असून त्यांचें रक्षण करीत असते. तिला जगज्योती म्हणतात, पशुपक्ष्यादि प्राणिमात्र तिच्या आधारानेंच जगतात. जाणूनच ते देह वांचवितात, जाणीव आहे म्हणून

श्वापद किडा मुंगी । कोणीयेक प्राणी जगीं । जाणीव खेळे त्याचा आंगीं । निरंतर ॥ १६ ॥ जाणोनी काया पळविती । तेणें गुणें वांचती । दडती आणि लपती । जाणजाणों ॥ १७ ॥ अवघ्या जगास वांचविती । म्हणोनि नामें जगज्जोती । ते गेलियां प्राणी मरती । जेथील तेथें ॥ १८ ॥ मुळींचे जाणीवेचा पदर । पुढें जाला विस्तार । जैसे उदकाचे तुषार । अनंत रेणु ॥ १९ ॥ तैसे देव देवता देवतें भूतें । मिथ्या म्हणों नये त्यांतें । आपुलाल्या सामर्थ्यें ते । सृष्टीमध्यें फिरती ॥ २० ॥ सदा विचरती वायोस्वरूपें । स्वइच्छा पालटिती रूपें । अज्ञान प्राणी भ्रमें संकल्पें । त्यास बाधिती ॥ २१ ॥ ज्ञात्यांस संकल्पचि असेना । म्हणोन त्यांचेन बाधवेना । याकारणें आत्मज्ञाना । अभ्यासावें ॥ २२ ॥ अभ्यासिलीयां आत्मज्ञान । सर्व कर्मास होय खंडण । हे रोकडी प्रचीत प्रमाण । संदेह नाहीं ॥ २३ ॥ ज्ञानेविण कर्म विघडे । हें तों कदापि न घडे । सद्गुरुवीण ज्ञान जोडे । हेंहि अघटीत ॥ २४ ॥ म्हणोन सद्गुरु करावा । सत्संग शोधून धरावा । तत्वविचार विवरावा । अंतर्यामीं ॥ २५ ॥ तत्वें तत्व निरसोन जातां । आपला आपणचि तत्वता । अनन्यभावें सार्थकता । सहजचि जाली ॥ २६ ॥ विचार न करितां जें जें केलें । तें तें वाउगें व्यर्थ गेलें । म्हणोनि विचारीं प्रवर्तलें । पाहिजे आधीं ॥ २७ ॥ विचार पाहेल तो पुरुषु । विचार न पाहे तो पशु । ऐसीं वचनें सर्वेशु । ठाईं ठाईं बोलिला ॥ २८ ॥ सिद्धांत साधायाकारणें । पूर्वपक्ष लागे उडवणें । परंतु साधकां निरूपणें । साक्षात्कार ॥ २९ ॥ श्रवण मनन निजध्यास । प्रचीतीनें बाणतां विश्वास । रोकडा साक्षात्कार सायास । करणेंचि नलगे ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रचीतनाम समास नवम ॥ ९ ॥

म्हणून दडतात, लपतात. अवघ्या जगाला वांचविणारी म्हणून तिला जगज्योति म्हणतात, ती गेली कीं प्राणी मरतात. उदकाच्या तुषारांतून अनंत रेणु पसरतात, त्याप्रमाणे मूळमायेंतील या जाणीवेचा विस्तार ब्रह्मांडभर झाला आहे (११–१९). त्याचप्रमाणें अनेक देव, देवता, भूतें, दैवतें आपल्या सामर्थ्येंकरून सृष्टींत फिरत असतात, तीं नाहींत असें म्हणूं नये, तीं वायुरूप असतात व स्वेच्छेनें रूपें पालटतात. अज्ञान प्राणी आपापल्या वासनांमुळें भ्रम पावतात, त्यांना त्यांची बाधा होते, ज्ञात्यास वासना किंवा संकल्प कांहींच नसतो म्हणून त्याला त्यांचा उपद्रव होत नाहीं. म्हणून आत्मज्ञान अभ्यासावें (२०–२२). आत्मज्ञानानें सर्व कर्मांचें खंडण होतें हें प्रत्यक्ष आहे. ज्ञानावांचून कर्मपाश सुटत नाहींत व ज्ञान सद्गुरुवांचून होत नाहीं हें वर्म आहे म्हणून संतसद्गुरुसमागम करावा व अंतर्यामीं तत्त्वांचा झाडा करावा. म्ह. तत्त्वें तत्त्वांत मिसळून आपले आपणच राहतों. या स्वरूपाशीं अनन्यता हेंच सर्वांचें साध्य होय. विचारावांचून सर्व व्यर्थ आहे म्हणून विचाराची चाळणा निरंतर ठेवावी. विचार पाहील तो पुरुष, न पाहील तो पशु असें परमात्माच ठिकठिकाणीं बोलले आहेत. सिद्धान्त साधण्यासाठीं पूर्वपक्ष उडवावा लागतो. पण साधकांना तर त्यांच्या अचळ श्रद्धेमुळें, निरूपणांतच साक्षात्कार होत असतो. श्रवण-मनन-निदिध्यासाच्या अभ्यासानें, विश्वासानें प्रचीती होत होत रोकडा साक्षात्कार होतो, त्यासाठीं वेगळे उपाय धुंडायला नकोत (२३–३०) [द० १०, स० ९].

॥ श्रीराम ॥ गगनासारिखें पोकळ । उदंड उंच अंतराळ । निर्गुण निर्मळ निश्चळ । सदोदित ॥ १ ॥ त्यास परमात्मा म्हणती । आणीक नामें नेणों किती । परी तें जाणिजे आदिअंतीं । जैसें तैसें ॥ २ ॥ विस्तीर्ण पसरला व्योम । भोंवता दाटला अवकाश । भासचि नाहीं निराभास । आकाश जैसें ॥ ३ ॥ चहुंकडे पाताळतळीं । अंतचि नाहीं अंतराळीं । कल्पांतकाळीं सर्वकाळीं । संचलेंचि असे ॥ ४ ॥ ऐसें कांहींयेक अचंचळ । ते अचंचळीं भासे चंचळ । त्यास नामेंहि पुष्कळ । त्रिविधा प्रकारें ॥ ५ ॥ न दिसतां नांव ठेवणें । न देखतां खूण सांगणें । असो हें जाणायाकारणें । नामाभिधानें ॥ ६ ॥ मूळमाया मूळप्रकृति । मूळपुरुष ऐसें म्हणती । शिवशक्ति नामें किती । नानाप्रकारें ॥ ७ ॥ परी जें नाम ठेविलें जया । आधीं वोळखावें तया । प्रचीतीवीण कासया । वलगना करावी ॥ ८ ॥ रूपाची न धरितां सोय । नामासरिसें भरंगळों नये । प्रत्ययाविण गळंगा होय । अनुमानज्ञानें ॥ ९ ॥ निश्चळ गगनीं चंचळ वारा । वाजों लागला भरारां । परी त्या गगना आणि समीरा । भेद आहे ॥ १० ॥ तैसें निश्चळ परब्रह्म । चंचळ माया भासला भ्रम । त्या भ्रमाचाच संभ्रम । करून दावूं ॥ ११ ॥ जैसा गगनीं चालिला पवन । तैसें निश्चळीं जालें चळण । इच्छा स्फूर्तिलक्षण । स्फुरणरूप ॥ १२ ॥ अहंपणें जाणीव जाली । तेचि मूळप्रकृति बोलिली । महाकारणकाया रचली । ब्रह्मांडीची ॥ १३ ॥ महामाया मूळप्रकृती । कारण ते अव्याकृती । सूक्ष्म हिरण्यगर्भ म्हणती । विराट ते स्थूळ ॥ १४ ॥ ऐसें पंचीकरण शास्त्रप्रमेय । ईश्वरतनुचतुष्टय । म्हणोन हें बोलणें होय । जाणीव मूळमाया

ब्रह्म आकाशासारखें पोकळ, व्यापक (उदंड), उंच (सर्वांपलीकडे), निर्मळ, निश्चळ, सदोदित असें आहे. तें आदिअंतीं आहे तसें आहे. त्याला परमात्मा म्हणतात व त्याची आणखींहि नांवें आहेत, आकाशासारखें तें सर्वव्यापी, निराभास, पाताळीं व अंतराळीं पसरलेलें, कल्पांतींही सर्वत्र संचलेलें आहे. (१–४). असें तें कांहीं एक (अनिर्वाच्य) व निश्चळ आहे. त्या निश्चळीं चंचळ भासलें; त्या चंचळालाही पुष्कळ नांवें आहेत. तें दिसत नसून त्याला नांव देणें किंवा खूण सांगणें प्राप्त आहे. ओळख पटण्यासाठीं हें करावें लागतें. मूळमाया, मूळपुरुष, मूळप्रकृति हीं नांवें त्या चंचळालाच आहेत. पण ज्याला जें नांव दिलें त्याला आधीं ओळखलें पाहिजे. प्रचीतीवीण वडबड काय कामाची ? रूप ध्यानांत न येतां नुसत्या नांवाबरोबर वाहवणें योग्य नाहीं. प्रत्यय नसतां अनुमानानें नुसता गोंधळ मात्र माजतो. निश्चळ गगनांत चंचळ वारा वाहूं लागला पण गगन व वारा यांत भेद आहे, तसा निश्चळ परब्रह्माच्या ठिकाणीं चंचळ मायारूप भ्रम उभा राहिला, तथापि ब्रह्म व भ्रम यांत फरक आहे. आतां त्या मायाभ्रमाचें विवरण करूं (५–११). आकाशांत वायु चालावा तसें निश्चळीं चळण–एकः अहं बहु स्याम् (मी एक आहें तें बहु व्हावें) इच्छा, आदिस्फूर्ति, मूळप्रकृति, मूळमाया हीं नांवें जिला देतात ती अहं-स्फुरणरूप जाणीव हीच ब्रह्मांडाची महाकारण काया होय. पिंडाचे जसे स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण असे चार देह आहेत, तसे ब्रह्मांडाचे विराट, हिरण्यगर्भ, अव्याकृत व मूळमाया हे चार देह आहेत. यांना ईश्वरतनुचतुष्टय किंवा ईश्वराचे

॥ १५ ॥ परमात्मा परमेश्वरु । परेश ज्ञानघन ईश्वरु । जगदीश जगदात्मा जगदेश्वरु । पुरुषनामें ॥ १६ ॥ सत्तारूप ज्ञानस्वरूप । प्रकाशरूप ज्योतिरूप । कारणरूप चिद्रूप । शुद्ध सूक्ष्म अलिप्त ॥ १७ ॥ आत्मा अंतरात्मा विश्वात्मा । द्रष्टा साक्षी सर्वात्मा । क्षेत्रज्ञ जीवात्मा शिवात्मा । देही कूटस्थ बोलिजे ॥ १८ ॥ इंद्रात्मा ब्रह्मात्मा हरिहरात्मा । यमात्मा धर्मात्मा नैऋत्यात्मा । वरुणवायोकुबेरात्मा । ऋषीदेवमुनिधर्ता ॥ १९ ॥ गणगंधर्वविद्याधर । यक्षकिन्नरनारदतुंबर । सर्व लोकांचें अंतर । तो सर्वांतरात्मा बोलिजे ॥ २० ॥ चंद्रसूर्य तारामंडळें । भूमंडळें मेघमंडळें । येकवीस स्वर्गें सप्त पाताळें । अंतरात्माच वर्तवी ॥ २१ ॥ गुप्त वल्ली पाल्हाळली । तिचीं पुरुषनामें घेतलीं । आतां स्त्रीनामें ऐकिलीं । पाहिजे श्रोतीं ॥ २२ ॥ मूळमाया जगदीश्वरी । परमविद्या परमेश्वरी । विश्ववंद्या विश्वेश्वरी । त्रैलोक्यजननी ॥ २३ ॥ अंतर्हेतु अंतर्कळा । मौन्यगर्भ जाणीवकळा । चपळ जगज्जोती जीवनकळा । परा पश्यंती मध्यमा ॥ २४ ॥ युक्ति बुद्धि मति धारणा । सावधानता नाना चाळणा । भूत भविष्य वर्तमाना । उकलून दावी ॥ २५ ॥ जागृति स्वप्न सुषुप्ती जाणे । तुर्या ताटस्थ्य अवस्था जाणे । सुख दुःख सकळ जाणे । मानापमान ॥ २६ ॥ ते परम कठीण कृपाळु । ते परम कोमळ स्नेहाळु । ते परम क्रोधी लोभाळु । मर्यादेवेगळी ॥ २७ ॥ शांती क्षमा विरक्ती भक्ती । अध्यात्मविद्या सायुज्यमुक्ति । विचारणा सहजस्थिति । जयेचेनी ॥ २८ ॥ पूर्वीं पुरुषनामें बोलिलीं । उपरी स्त्रीनामें

चार देह म्हणतात. पिंडाचे चार व ब्रह्मांडाचे चार मिळून आठ देह. या अष्टदेहांचा विचार व त्याचा निरसनाचा प्रकार पंचीकरणांत सांगितला असतो. या अष्टदेहांपैकीं आठवा देह जो मूळमाया तीच वर सांगितलेली अहंस्फुरणरूप जाणीव होय. जाणीव तीच मूळमाया (१२–१५). आदिस्फुरण (अहं) तीच मूळमाया. मूळमायेला परमेश्वरवाचक अनंत नांवें आहेत. नामरूपलिंगभेद नसल्यामुळें तिला कांहीं पुरुषवाचक, कांहीं स्त्रीवाचक व कांहीं नपुंसक अशीं सर्व प्रकारचीं नांवें केवळ संकेतासाठीं ठेवलेलीं आहेत. परमात्मा, परमेश्वर, परेश, ज्ञानघन, ईश्वर, जगदीश, सत्तारूप, ज्ञानस्वरूप, प्रकाशरूप, ज्योतिरूप, कारणरूप, चिद्रूप, आत्मा, अंतरात्मा, द्रष्टा, साक्षी, जीवात्मा, शिवात्मा, देही, कूटस्थ, हरिहरब्रह्मात्मा, इ० पुरुषनामें या जाणीवरूप मूळमायेलाच दिलीं जातात. इंद्र, चंद्र, वरुणादि नाना देव, ऋषि, मुनि, गणगंधर्व, विद्याधर, यक्षकिन्नर, नारद, तुंबर इ० सर्व लोकांचें तो अंतर आहे म्ह० सर्वांचें ध्येय उपास्य आहे म्हणून मूळमायेलाच सर्वांतरात्मा म्हणतात. हा अंतरात्माच चंद्र, सूर्य, तारामंडळें, स्वर्ग, मृत्यु, पाताळ, सर्व ब्रह्मांडें चाळविणारा आहे. (१६–२१). मूळमायाच गुणमाया होऊन सत्वरजतमरूप हरिहरब्रह्मादि उत्पन्न करून सकळ ब्रह्मांडरचनेला कारण होते म्हणून ‘ गुणमाया पाल्हाळली ’ असें म्हटलें आहे. आतां मूळमायेचीं स्त्रीनामें ऐका. जगदीश्वरी, परमेश्वरी, त्रैलोक्यजननी, अंतर्कळा, जाणीवकळा, चंचळा, जगज्योती, जीवनकळा, परा पश्यंती मध्यमारूप शारदा, मति, धृति, धारणा, मूळप्रकृति, शक्ति, जागृत्यादि अवस्था जाणणारी, सुखदुःखादि जाणणारी, दीनवत्सला, कृपाळा, कोमळा, शांति. क्षमा, दया, अध्यात्मविद्या, सायुज्यता, इ० स्त्रीनामें मूळमायेलाच ओळखीसाठीं दिलीं जातात (२२–२८). आतां या चंचळाचीं (मूळमायेचीं) नपुंसकलिंगी नामें सांगतों.

निरोपिलीं । आतां नपुंसकनामें ऐकिलीं । पाहिजें चंचळाचीं ॥ २९ ॥ जाणणें अंतःकरण चित्त । श्रवण मनन चैतन्य जीवित । येतें जातें सुचित्त । होऊन पाहा ॥ ३० ॥ मीपण तूंपण जाणपण । ज्ञातेपण सर्वज्ञपण । जीवपण शिवपण ईश्वरपण । अलिप्तपण बोलिजे ॥ ३१ ॥ऐसीं नामें उदंड असती । परी ते येकचि जगज्जोती । विचारवंत ते जाणती । सर्वांतरात्मा ॥ ३२ ॥ आत्मा जगज्योती सर्वज्ञपण । तीनी मिळोन येकचि जाण । अंतर्कळाचि प्रमाण । ज्ञप्ति मात्र ॥३३॥ ढीग जाले पदार्थांचे । पुरुषस्त्रीनपुंसकनामांचे । परंतु सृष्टिरचनेचे । किती म्हणोन सांगावे ॥ ३४ ॥ सकळ चाळिता येक । अंतरात्मा वर्तवी अनेक । मुंगीपासून ब्रह्मादिक । तेणेंचि चालती ॥ ३५ ॥ तो अंतरात्मा आहे कैसा । प्रस्तुत वोळखा आमासा । नाना प्रकारींचा तमासा । येथेंचि आहे ॥ ३६ ॥ तो कळतो परी दिसेना । प्रचीत येते परी भासेना । शरीरीं असे परी वसेना । येके ठाईं ॥३७॥ तीक्ष्णपणें गगनीं भरे । सरोवर देखतांच पसरे । पदार्थ लक्षून उरे । चहूंकडे ॥ ३८ ॥ जैसा पदार्थ दृष्टीस पडतो । तो त्यासारिखाच होतो । वायोहूनि विशेष तो । चंचळविषईं ॥ ३९ ॥ कितीयेक दृष्टीनें देखे । कितीयेक रसनेनें चाखे । कितीयेक ते वोळखे । मनेंकरूनि ॥ ४० ॥ श्रोत्रीं बैसोन शब्द ऐकतो । घ्राणेंद्रियें वास घेतो । त्वचेइंद्रियें जाणतो । शीतोष्णादिक ॥ ४१ ॥ ऐशा जाणे अंतर्कळा । सकळांमध्यें परी निराळा । पाहातां त्याची अगाध लीळा । तोची जाणे ॥ ४२ ॥ तो पुरुष ना सुंदरी । बाळ तारुण्य ना कुमारी । नपुंसकाचा देहधारी । परी नपुंसक नव्हे ॥ ४३ ॥ तो चालवी सकळ देहासी । करून अकर्ता म्हणे त्यासी । तो क्षेत्रज्ञ क्षेत्रवासी । देही कूटस्थ बोलिजे ॥ ४४ ॥

॥ श्लोक ॥ द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च । क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोक्षर उच्यते ॥ ६ ॥

जाणणें, अंतःकरण, जीवित, चैतन्य, मीपण, तूंपण, जाणपण, सर्वज्ञपण, जीवपण, शिवपण, ईश्वरपण, अलिप्तपण, इ० (२९–३१). अशीं नांवें आणखींही अनंत देतां येतील. आत्मा (पु.), जगज्योती (स्त्री.), सर्वज्ञपण (न.)—तीनही नांवें एकाचींच आहेत. गुणाचा म्ह० सृष्टिरचनेचा आश्रय करून आणखीं अनंत नामें सांगितलीं तरी सकळ चाळिता अंतरात्मा एक आहे. किडामुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत सर्व त्याच्यावरच वर्ततात. तो थोडासा ओळखावा. सृष्टिरचनेचा तमाशा (बाजार) तेथून पहावा. तो कळतो पण दिसत नाहीं. प्रत्ययाचा आहे पण भासत नाहीं, शरीरीं आहे पण एका ठिकाणीं सांपडत नाहीं. सूक्ष्म इतका कीं आकाश सूक्ष्म पण त्यांत लपून राहतो स्थूळ इतका सरितासागरासारखा अपरंपार सर्व पदार्थांत पसरला आहे. तो वायूपेक्षां चंचळ असून जो जो पदार्थ पहावा त्यासारखाच होऊन जातो. अनंत दृष्टीनें पाहतो, अनंत रसनांनीं चाखतो, अनंत रूपांनीं ओळखतो, कानांत बसून शब्द ऐकतो, घ्राणांत बसून वास घेतो, त्वचेंत बसून शीतोष्णादि स्पर्श जाणतो, असा तो सकळांची अंतर्कळा असून सकळांहून निराळा आहे. त्याची अगाध लीला तोच जाणे ! तो पुरुष ना स्त्री ना नपुंसक. बाल्यतारुण्यादि अवस्था त्याला नाहींत. सर्वदेहचालक असून अकर्ता. सर्व भूतें म्ह. क्षर-

दोनी पुरुष लोकीं असती । क्षराक्षर बोलिजेती । सर्व भूतें क्षर म्हणती । अक्षर कूटस्थ बोलिजे ॥ ४५ ॥ उत्तम पुरुष तो आणीक । निष्प्रपंच निष्कळंक । निरंजन परमात्मा येक । निर्विकारी ॥ ४६ ॥ च्यारी देह निरसावे । साधकें देहातीत व्हावें । देहातीत होतां जाणावें । अनन्य भक्त ॥ ४७ ॥ देहमात्र निरसुनी गेला । तेथें अंतरात्मा कैसा उरला । निर्विकारीं विकाराला । ठाव नाहीं ॥ ४८ ॥ निश्चळ परब्रह्म येक । चंचळ जाणावें माईक । ऐसा प्रत्ययो निश्चयात्मक । विवेकें पाहावा ॥४९॥ येथें बहुत नलगे खळखळ । येक चंचळ येक निश्चळ । शाश्वत कोणतें केवळ । ज्ञाते वोळखती ॥ ५० ॥ असार त्यागून घेईजे सार । म्हणोन सारासारविचार । नित्यानित्य निरंतर । पाहाती ज्ञानी ॥ ५१ ॥ जेथें ज्ञानचि होतें विज्ञान । जेथें मनचि होतें उन्मन । तेथें कैचें चंचळपण । आत्मयासी ॥ ५२ ॥ सांगणोवांगणीचें काम नव्हे । आपुल्या अनुभवें जाणावें । प्रत्ययेविण जें सिणावें । तेंचि पाप ॥ ५३ ॥ सत्यायेवढें सुकृत नाहीं । असत्यायेवढें पाप नाहीं । प्रचीतीविण कोठेंचि नाहीं । समाधान ॥ ५४ ॥ सत्य म्हणिजे स्वरूप जाण । असत्य माया हें प्रमाण । येथें निरोपिलें पापपुण्य । रूपेंसहित ॥ ५५ ॥ दृश्य पाप वोसरलें । पुण्य परब्रह्म उरलें । अनन्य होतांच जालें । नामातीत ॥ ५६ ॥ आपण वस्तु स्वतःसिद्ध । तेथें नाहीं देहसमंध । पापरासी होती दग्ध । येणें प्रकारें ॥ ५७ ॥ येरवीं ब्रह्मज्ञानेंवीण । जें जें साधन तो तो सीण । नाना दोषांचें क्षाळण । होईल कैसें ॥ ५८ ॥ पापाचें वळलें शरीर । पापचि घडे तदनंतर । अंतरीं रोग वरीवरी उपचार । काय करिती ॥ ५९ ॥ नाना क्षेत्रीं हें मुंडिलें ।

नाशिवंत व कूटस्थ म्ह. अक्षर तर तो देही कूटस्थ आहे (३२–४५). येथवर हें सर्व चंचळाचें, मूळमायेचें, अंतरात्म्याचें वर्णन झालें. निश्चळ परब्रह्म या पलीकडे आहे. ' उत्तमः पुरुषस्त्वन्यः ' तो निष्प्रपंच, निष्कळंक, निरंजन, निर्विकार मुख्य परमात्मा एकीएक आहे. चारी देहांचें निरसन करून म्ह. देहातीत होऊन त्याशीं अनन्य व्हावें त्यालाच भक्त म्हणतात. अष्टदेहांचें निरसन झाल्यावर चंचळ अंतरात्मा कोठें उरला ? निर्विकारीं विकार कसचा ? निश्चळ परब्रह्म एक व चंचळ मायिक (नाशवंत) असा निश्चयाचा प्रत्यय घ्यावा. ज्ञानविवेकानें ओळखण्याचें वर्म थोडें आहे. चंचळ नाशवंत जाणून निश्चळ शाश्वत जाणावें. असार, अनित्य टाकून सार, नित्य असें निश्चळ परब्रह्म घ्यावें म्ह. तद्रूप होऊन जावें. ज्ञान विरून विज्ञान होतें, मनाचें मनपण जाऊन उन्मन होतें, निश्चळ आत्मा–तेथें चंचळाचा स्पर्श कोठला ? (४६–५२). हें सांगोवांगीचें काम नाहीं. अनुभव घेऊन पहावा, त्यावांचून समाधान नाहीं. सत्याएवढें पुण्य नाहीं व असत्याएवढें पाप नाहीं. सत्य म्ह० निश्चळ ब्रह्म, स्वरूप ; व असत्य म्ह० चंचळ, माया, दृश्य पाप वोसरल्यावर निश्चळ पुण्य उरलें व त्याशीं अनन्य होतां नामातीत झालें. आपण स्वतःसिद्ध वस्तु आहोंत ' देहसंबंध आपणास नाहीं ' हा प्रत्यय आला कीं पापाचे डोंगर निमिषार्धांत जळून खाक झाले. नाना दोषांचें क्षालन करणारें ब्रह्मज्ञानच, इतर साधनें तो शीण होय (५३–५८). शरीर मुळीं पापाचें वळलें आहे व नंतरही दृश्य सत्य घेऊन जीव चालतो म्हणून पापच घडत जातें. रोग आंत तेथें बाह्योपचार काय कामाचे ?

नाना तीर्थी हें दंडिलें। नाना निग्रहीं खंडिलें। ठाईं ठाईं ॥ ६०॥ नाना मृत्तिकेनें घांसिलें। अथवा तप्तमुद्रेनें लासिलें। जरी हें वरीवरी तासिलें। तरी शुद्ध नव्हे ॥ ६१॥ सेणाचे गोळे गिळिले। गोमुत्राचे मोघे घेतले। माळा रुद्राक्ष घातले। काष्ठमणी ॥ ६२॥ वेष वरिवरी केला। परी अंतरीं दोष भरला। त्या दोषाच्या दहनाला। आत्मज्ञान पाहिजे ॥ ६३॥ नानाव्रतें नानादानें। नानायोग तीर्थाटणें। सर्वांहुनी कोटीगुणें। महिमा आत्मज्ञानाचा ॥ ६४॥ आत्मज्ञान पाहे सदा। त्याच्या पुण्यास नाहीं मर्यादा। दुष्ट पातकाची बाधा। निरसोन गेली ॥ ६५॥ वेदशास्त्रीं सत्यस्वरूप। तेंचि ज्ञानियांचें रूप। पुण्य जालें अमूप। सुकृतें सीमा सांडिली ॥ ६६॥ या प्रचीतीच्या गोष्टी। प्रचीत पाहावी आत्मदृष्टी। प्रचीतीवेगळें कष्टी। होऊंच नये ॥ ६७॥ अगा ये प्रचीतीचे लोक हो। प्रचित नस्तां अवघा शोक हो। रघुनाथ कृपेनें राहो। प्रत्ययो निश्चयाचा ॥ ६८॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चळाचळनिरूपणनाम समास दशम ॥ १० ॥

अनेक क्षेत्रांत मुंडण केलें, तीर्थांत बुचकळ्या मारिल्या, ठिकठिकाणीं ह्या देहाला निग्रहांनीं पीडिलें, मातीनें घांसलें, नाहींतर तप्तमुद्रांचे याला डाग दिले, गोमुत्रांचीं गाडगीं (मोघे) प्याले किंवा शेणाचे गोळे गिळिले, किंवा माळामुद्रांचीं वा रुद्राक्षांचीं भूषणें घातलीं—याप्रमाणें वरवर वाटेल तितके वेष घातले तरी आंतलें पाप दूर करण्यास आत्मज्ञानच पाहिजे. अनेक व्रतें, दानें, योगयाग, तीर्थाटणें, इ० सर्व साधनांपेक्षां आत्मज्ञानाचा महिमा कोटपट श्रेष्ठ आहे. आत्मज्ञानानें ज्याची बैठक बसली त्याच्या पुण्यास सीमा नाहीं. त्याचीं सकळ पातकें भस्म झालीं. वेदशास्त्रांनीं सत्यस्वरूपाचाच निर्णय सांगितला आहे व ज्ञान्याचें तेंच स्वरूप आहे (ज्ञानी आत्मरूपच असतात), म्हणून त्यांची पुण्यसंपत्ति अमर्याद असते, या प्रचीतीच्या गोष्टी आहेत. प्रचीतीवांचून वृथा कष्ट आहेत. आत्मदर्शनप्रत्यय घ्यावा. प्रचीत नसतां दुःखशोक जात नाहींत. रघुरायाच्या कृपेनें निश्चय प्रत्यय राहो (५९–६८). [द० १०, स० १०]

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ भीमदशक अकरावा ॥ ११ ॥

॥ श्रीराम ॥ आकाशापासून वायो होतो। हा तों प्रत्यये येतो। वायोपासून अग्नी जो तो। सावध ऐका ॥ १ ॥ वायोची कठिण घिसणी। तेथें निर्माण जाला वन्ही। मंद वायो सीतळ पाणी। तेथुनि जालें ॥ २ ॥ आपापासून जाली पृथ्वी। ते नाना बीजरूप जाणावी। बीजापासून उत्पत्ति व्हावी। हा स्वभावचि आहे ॥ ३ ॥ मुळीं सृष्टी कल्पनेची। कल्पना आहे मुळींची। जयेपासून देवत्रयाची। काया जाली ॥ ४ ॥ निश्चळामध्यें चंचळ। तेचि कल्पना केवळ। अष्टधा प्रकृतीचें मूळ। कल्पनारूप ॥ ५ ॥ कल्पना तेचि अष्टधा प्रकृति। अष्टधा तेचि कल्पनामूर्ती। मूळाग्रापासून उत्पत्ति। अष्टधा जाणावी ॥ ६ ॥ पांच भूतें तीन गुण। आठ जालीं दोनी मिळोन। म्हणोनि अष्टधा प्रकृति जाण। बोलिजेते ॥ ७ ॥ मुळीं कल्पनारूप जाली। पुढें तेचि फोपावली। केवळ जडत्वास आली। सृष्टिरूपें ॥ ८ ॥ मुळीं जाली ते मूळमाया। त्रिगुण जाले ते गुणमाया। जडत्व पावली ते अविद्या माया। सृष्टिरूपें ॥ ९ ॥ पुढें च्यारी खाणी जाल्या। च्यारी वाणी विस्तारल्या। नाना योनी प्रगटल्या। नाना व्यक्ती ॥ १० ॥ ऐसी जाली उभारणी। आतां ऐका संव्हारणी। मागील दशकीं विशद करूनि। बोलिलें असे ॥ ११ ॥

आकाशापासून वायु होतो हा तर सर्वांचा अनुभवच आहे, आतां वायूपासून अग्नि कसा होतो तें नीट ऐका (१). वायूच्या घर्षणानें अग्नि होतो. वायूच्या उष्ण व शीतळ अशा दोन झुळका असून शीतळ झुळकेपासून शीतळ तेज व त्या शीतळ तेजापासून शीतळ पाणी निर्माण झालें. पाण्यापासून बीजरूप पृथ्वी व अनंत बीजांपासून सृष्टि सहजच झाली. मूळ मायेच्या ठिकाणची कल्पनाच सृष्टिरूप झाली आहे. ती पहिली कल्पना (आदिसंकल्प) म्ह० मूळमाया. तिच्यापासून त्रिगुणात्मक गुणमाया झाली. निश्चळ ब्रह्माच्या ठिकाणची ही मूळमाया म्ह. चंचळ कल्पना हीच त्रिगुणपंचभूतात्मक अष्टधाप्रकृतीचें मूळ होय. (२–५). अष्टधाप्रकृति ही कल्पनेचेंच रूप होय. मूळमायेंत प्रथमपासूनच अष्टधाप्रकृति आहे. सत्व, रज व तम हे तीन गुण आणि पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश हीं पंचभूतें मिळून अष्टधाप्रकृति होय. मूळमायेंत ती कल्पनारूप होती. त्याच बीजाची वाढ होत होत सूक्ष्मांतून स्थूळांत येत येत ती जड सृष्टींत परिणाम पावली आहे (६–८). मूळांत कल्पनारूप (संकल्प) झाली ती मूळमाया, त्रिगुणरूप झाली ती गुणमाया, व जडसृष्टिरूपास आली ती अविद्यामाया. तिच्याच पुढें चार खाणी (जारज, अंडज, स्वेदज व उद्भिज) व चार वाणी (परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी) हा विस्तार होऊन अनंत योनी व त्यांत अनंत जीव प्रकट झाले. सृष्टीच्या उभारणीचा क्रम सांगितला. आतां

परंतु आतां संकळित । बोलिजेल संव्हारसंकेत । श्रोते वक्ते कथेसी चित्त । देऊन ऐका ॥ १२ ॥ शत वरुषें अनावृष्टि । तेथें आटेल जीवसृष्टि । ऐशा कल्पांताच्या गोष्टी । शास्त्रीं निरोपिल्या ॥ १३ ॥ बाराकळीं तपे सूर्य । तेणें पृथ्वीची रक्षा होय । मग ते रक्षा विरोन जाय । जळांतरीं ॥ १४ ॥ तें जळ शोषी वैश्वानरु । वन्ही झडपी समीरु । समीर वितुळे निराकारु । जैसें तैसें ॥ १५ ॥ ऐसी सृष्टिसंव्हारणी जाली । मागां विस्तारें बोलिली । मायानिरासें उरली । स्वरूपास्थिति ॥ १६ ॥ तेथें जीवशिव पिंडब्रह्मांड । आटोन गेलें थोतांड । मायेअविद्येचें बंड । वितळोन गेलें ॥ १७ ॥ विवेकेंचि बोलिला क्षय । म्हणोनि विवेकप्रळय । विवेकी जाणती काय । मूर्खास कळे ॥ १८ ॥ सृष्टि शोधितां सकळ । येक चंचळ येक निश्चळ । चंचळास कर्ता चंचळ । चंचळरूपी ॥ १९ ॥ जो सकळ शरीरीं वर्ते । सकळ कर्तृत्वास प्रवर्ते । करून अकर्ता हा वर्ते । शब्द जया ॥ २० ॥ राव रंक ब्रह्मादिक । सकळांमध्यें वर्ते येक । नाना शरीरें चाळक । इंद्रियद्वारें ॥ २१ ॥ त्यास परमात्मा बोलती । सकळ कर्ता ऐसें जाणती । परी तो नासेल प्रचीती । विवेकें पाहावी ॥ २२ ॥ जो श्वानांमध्यें गुरगुरतो । जो सूकरांमध्यें कुरकुरतो । गाढवीं भरोन भुंकतो । अट्टाहास्यें ॥ २३ ॥ लोक नाना देह देखती । विवेकें देहान्त पाहाती । पंडित समदर्शनें घेती । येणें प्रकारें ॥ २४ ॥

॥ श्लोक ॥ विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि । शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ।

देह पाहतां वेगळाले । परंतु अंतर येकचि जालें । प्राणीमात्रीं देखिलें ।

संहारणीचा क्रम ऐका. मागील दशकांत प्रळयाच्या वर्णनांत हा सविस्तर सांगितला आहेच, पण पुन्हां संक्षेपरूपानें सांगतों (२–१२). शंभर वर्षें पाऊस न पडल्यामुळें सारी जीवसृष्टि आटून जाईल. तो कल्पांतसमय शास्त्रांत सांगितला आहे. पुढें सूर्य बारा कलांनीं युक्त होऊन सृष्टीची रक्षा होऊन ती जळांत विरून जाईल. जल अग्नींत, अग्नी वायूंत, वायु निराकार आकाशांत याप्रमाणें सर्व सृष्टीचा लय (संहारणी) होईल, व याप्रमाणें मायेचा निरास होऊन स्वरूपच उरेल. जीवशिव, पिंडब्रह्मांड, मायाअविद्या हीं मूळमायेपासून उभारलेलीं सर्व थोतांडें आटून जाऊन स्वरूपच राहील. हा प्रळय विवेकानें ध्यानास येतो म्हणून याला विवेकप्रळय म्हणतात. हें सर्व विवेकी जाणतो, मूर्खाला कसें समजावें? (१३–१८). सारी सृष्टि शोधतां एक चंचळ (माया) व एक निश्चळ (ब्रह्म) असे दोन प्रकार दिसतात. चंचळ-सृष्टीचा कर्ता चंचळरूपी चंचळ म्ह० मूळमाया (अंतरात्मा) हाच होय [निश्चळ ब्रह्माशीं चंचळ सृष्टीचा संबंध नाहीं]. हा कर्ता सर्व शरिरांत वागतो, सर्व कर्तृत्व याचें आहे, इंद्रियांच्या द्वारें हा अनंत देह चालवितो. पण तो करून अकर्ता आहे. रावरंकब्रह्मादि सर्व देहांचा चालक हाच आहे. याला परमात्मा, सर्वकर्ता असें म्हणतात, पण विवेक प्रळयांत हाही उरत नाहीं. श्वानसूकरादि योनींत हाच चालक आहे. सामान्यजन देह पाहतात पण विवेकी पुरुष देहवर्तविणारा देहांतील अंतरात्मा पाहतात. तो सर्वदेहांत एकच असल्यामुळें विवेकी पंडित समदर्शन सहजच असतात. विद्या विनयसंपन्न ब्राह्मण, गाय, हत्ती, श्वान, चांडाळ या सर्वांचे देह वेगवेगळे असले तरी सर्वांचा अंतरात्मा एकच आहे. ज्ञानी पुरुष प्राणीमात्रांच्या ठायीं एक अंतरात्मा पाहतात. अनंत प्राण्यांना जाणीवरूप हा अंतरात्माच वर्तविता, म्हणून याला जगज्योति म्हणतात.

येकांतरें ॥ २५ ॥ अनेक प्राणी निर्माण होती । परी येकचि कळा वर्तती । तये नांव जगज्योती । जाणतीकळा ॥ २६ ॥ श्रोत्रीं नाना शब्द जाणे । त्वचेमध्यें शीतोष्ण जाणे । चक्षुमध्यें पाहों जाणे । नाना पदार्थ ॥ २७ ॥ रसनेमध्यें रस जाणे । घ्राणामध्यें वास तो जाणे । कर्मइंद्रियामध्यें जाणे । नाना विषयस्वाद ॥ २८ ॥ सूक्ष्म रूपें स्थूळ रक्षी । नाना सुखदुःखें परीक्षी । त्यास म्हणती अंतरसाक्षी । अंतरात्मा ॥ २९ ॥ आत्मा अंतरात्मा विश्वात्मा । चैतन्य सर्वात्मा सूक्ष्मात्मा । जीवात्मा शिवात्मा परमात्मा । द्रष्टा साक्षी सत्तारूप ॥ ३० ॥ विकारामधील विकारी । अखंड नाना विकार करी । तयास वस्तु म्हणती भिकारी । परम हीन ॥ ३१ ॥ सर्व येकचि देखती । अवघा येकंकार करिती । ते अवघी माईक स्थिति । चंचळामध्यें ॥ ३२ ॥ चंचळ माया ते माईक । निश्चळ परब्रह्म येक । नित्यानित्यविवेक । याकारणें ॥ ३३ ॥ जाणता जीव तो प्राण । नेणे जीव तो अज्ञान । जन्मतो जीव तो जाण । वासनात्मक ॥ ३४ ॥ ऐक्य जीव तो ब्रह्मांश । जेथें पिंडब्रह्मांडनिरास । येथें सांगितलें विशेष । चत्वार जीव ॥ ३५ ॥ असो हें अवघें चंचळ । चंचळ जाईल सकळ । निश्चळ तें निश्चळ । आदिअंतीं ॥ ३६ ॥ आदी मध्य अवसान । जे वस्तु समसमान । निर्विकारी निर्गुण निरंजन । निःसंग निष्प्रपंच ॥ ३७ ॥ उपाधीनिरासें तत्वता । जीवशिवांस ऐक्यता । विवंचून पाहों जातां । उपाधि कैंची ॥ ३८ ॥ असो जाणणें तितुकें ज्ञान । परंतु होतसे विज्ञान । मनें वोळखावें उन्मन । कोण्या प्रकारें ॥ ३९ ॥ वृत्तिस न कळे निवृत्ति । गुणास कैंची निर्गुण प्राप्ती । गुणातीत साधक संतीं । विवेकें केलें ॥ ४० ॥

कानांनीं नाद ऐकणें, त्वचेनें थंड उष्ण जाणणें, डोळ्यांनीं नाना पदार्थ पाहणें, रसनेनें रसस्वाद घेणें, नाकानें वास घेणें, कर्मेंद्रियांच्या द्वारें विविधविषयस्वाद घेणें हें सर्व हा चंचळकर्ता (अंतरात्मा) करितो. हा अत्यंत सूक्ष्म असून स्थूल देहांचें रक्षण करितो, सुखदुःखें जाणतो, त्याला अंतरसाक्षी अंतरात्मा म्हणतात. आत्मा, अंतरात्मा, विश्वात्मा, चैतन्य, सर्वात्मा, सूक्ष्मात्मा, जीव, शिव, परमात्मा, द्रष्टा, साक्षी, सत्तारूप हीं सारीं, याचींच नांवें आहेत. विकारात्मक देहांतील विकार करणारा हा—यालाच मूढजन परमात्मवस्तु म्हणतात (१९–३१). वेगळे असून एकच वाटणें हा एकंकार चंचळांतला आहे म्ह. मायिक आहे. चंचळ माया ही मायिक व विविध आहे व निश्चळ परब्रह्म सत्य व एक आहे. हा नित्यानित्य विवेक होय. जीव चार प्रकारचे म्हटले आहेतः–जाणणारा जीव तो प्राण, नेणता जीव तो अज्ञान, जन्मणारा जीव तो वासनात्मक व ब्रह्माशीं ऐक्य पावलेला जीव तो ब्रह्मांश असे हे चार जीव चंचळांतले म्हणून नाशवंत आहेत, निश्चळ परब्रह्म मात्र आदिअंतीं निश्चळच म्ह. शाश्वत, सत्य आहे. परब्रह्मवस्तु आदिमध्यावसानीं (चंचळापूर्वी चंचळ असतांना व चंचळाचा लय झाल्यावर) सारखी, निर्विकार, निर्गुण, निरंजन व निष्प्रपंच आहे. चंचळाची उपाधि विवेकानें दूर सारतांच जीवशिवांचें ऐक्य आहे (असें शास्त्रें सांगतात पण), उपाधिच मुळीं नाहीं मग तिचा निरास कशाचा ? (३२–३८) असो. जाणणें हें ज्ञान व तेंही हारपतें हें विज्ञान. मनाला उन्मन उमगायचें नाहीं तसें ज्ञानाला विज्ञान म्ह. स्वरूपानुभव आकळत नाहीं. वृत्तीला निवृत्ति म्ह. वृत्तिशून्यता कळत नाहीं तसें गुणाला (चंचळाला) निर्गुण ब्रह्म

श्रावणापरीस मनन थोर । मननें कळे सारासार । निजध्यासें साक्षात्कार । निःसंग वस्तु ॥ ४१ ॥ निर्गुणीं जे अनन्यता । तेचि मुक्ति सायुज्यता । लक्ष्यांश वाच्यांश आतां । पुरे जाला ॥ ४२ ॥ अलक्षीं राहिलें लक्ष । सिद्धांतीं कैंचा पूर्वपक्ष । अप्रत्यक्षास कैंचें प्रत्यक्ष । असोन नाहीं ॥ ४३ ॥ असोन माईक उपाधी । तेचि सहजसमाधी । श्रवणें वळावी बुद्धी । निश्चयाची ॥ ४४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सिद्धांतनिरूपणनाम समास प्रथम ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥ येक निश्चळ येक चंचळ । चंचळीं गुंतलें सकळ । निश्चळीं ते निश्चळ । जैसें तैसें ॥ १ ॥ पाहे निश्चळाचा विवेक । ऐसा लक्षांमध्यें येक । निश्चळाऐसा निश्चयात्मक । निश्चळचि तो ॥ २ ॥ या निश्चळाच्या गोष्टी सांगती । पुन्हां चंचळाकडे धांवती । चंचळचक्रीं निघोन जाती । ऐसे थोडे ॥ ३ ॥ चंचळीं चंचळ जन्मलें । चंचळाचिमध्यें वाढलें । अवघें चंचळचि बिंबलें । जन्मवरी ॥ ४ ॥ पृथ्वी अवघी चंचळाकडे । करणें तितुकें चंचळीं घडे । चंचळ सांडून निश्चळीं पवाडे । ऐसा कैंचा ॥ ५ ॥ चंचळ कांहीं निश्चळेना । निश्चळ कदापी चळेना । नित्यानित्यविवेकें जना । उमजे कांहीं ॥ ६ ॥ कांहीं उमजलें तरी नुमजे । कांहीं समजलें तरी न समजे । कांहीं बुजे तरी निर्बुजे । किंचित मात्र ॥ ७ ॥ संदेह अनुमान आणि भ्रम । अवघा चंचळामध्यें श्रम । निश्चळीं कदा नाहीं वर्म । समजलें

आकळत नाहीं, म्हणून गुणातीत परब्रह्म विवेकें ओळखावें असें संत सांगतात (३९–४०). श्रवणाहून मनन श्रेष्ठ, कां कीं मननानें सार (ब्रह्म) व असार (चंचळ) हा विवेक होतो, व सार जें ब्रह्म त्याच्या निदिध्यासानें संगरहित वस्तूंचा साक्षात्कार (प्रचीति) होतो. निर्गुणाशीं अनन्यता म्हणजेच सायुज्यमुक्ति. लक्ष्यांश (वस्तु) व् वाच्यांश (चंचळ) हा विचारही येथें सरला. अलक्ष्य वस्तूच्या ठिकाणीं लक्ष्य विरालें, सिद्धांतापाशीं पूर्वपक्ष संपला. मग बुद्धिअगोचर (अप्रत्यक्ष) असे जें परब्रह्म त्याशीं प्रत्यक्षता (नेत्रादिइंद्रियगोचरता) कोठून येणार? व म्ह. अनुभवरूप होऊन अनुभवाची द्वैत भाषा तेथें खुंटली (असोनि नाहीं). मायिक उपाधि (चंचळ) जेथल्या तेथें असून स्वरूपाकारता पावणें हीच सहजसमाधि होय, श्रवणाभ्यासानें हा निश्चय स्थिर होतो (४१–४४). [द० ११, स० १]

एक (ब्रह्म) निश्चळ व एक (माया) चंचळ आहे. सारे लोक चंचळांत गुंतले आहेत. निश्चळ हें सर्व निश्चळच आहे. लक्षावधि लोकांत निश्चळ ब्रह्मीं निश्चयपूर्वक स्थिरावलेला व म्हणून ब्रह्मस्वरूप झालेला एखादाच सापडतो. बहुत लोक ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगतात, पण चंचळांत वासना गुंतून राहतात, चंचळ मायेच्या जाळ्यांतून निसटून जाणारे विरळाच. चंचळ मूळमायेपासूनच त्रिगुणपंचभूतात्मक जग व त्यांतच अनंत जीव जन्मले, चंचळ मायेंतच वाढले, म्हणून जीवांच्या सर्व वासना मायेंतल्याच असतात. पृथ्वीवरचे सारे जीव चंचळ मायेंतले असल्यामुळें त्यांचीं कर्मेंही मायिकच असतात, चंचळाच्या विवेकबळानें त्याग करून निश्चळ ब्रह्मीं प्रवेश करणारा महापुरुष दुर्मिळ आहे. चंचळ निश्चळ होत नाहीं व निश्चळ (ब्रह्म) चळणांत (मायेंत) सांपडत नाहीं. चंचळनिश्चळाचा विवेक नित्य जागृत ठेवला तर कांहीं तरी उमगतें. कांहीं थोडें समजल्यासारखें वाटतें, किंचित् उमजतेंही; पण संदेह, अनुभव व

पाहिजे ॥ ८ ॥ चंचळाकार तितुकी माया । माईक जाय विलया । लहान थोर म्हणावया । कार्य नाहीं ॥ ९ ॥ सगट माया विस्तारली । अष्टधा प्रकृति फोंपावली । चित्रविचित्र विकारली । नाना रूपें ॥ १० ॥ नाना उत्पत्ती नाना विकार । नाना प्राणी लहान थोर । नाना पदार्थ मकार । नाना रूपें ॥ ११ ॥ विकारवंत विकारलें । सूक्ष्म जडत्वास आलें । अमर्याद दिसों लागलें । कांहींच्याबाहीं ॥ १२ ॥ मग नाना शरीरें निर्माण जालीं । नाना नामाभिधानें ठेविलीं । भाषापरत्वें कळों आलीं । कांहीं कांहीं ॥ १३ ॥ मग नाना रीति नाना दंडक । आचार येकाहून येक । वर्तों लागले सकळ लोक । लोकाचारें ॥ १४ ॥ अष्टधा प्रकृतीचीं शरीरें । निर्माण जालीं लहानथोरें । पुढें आपुल्याला प्रकारें । वर्तों लागती ॥ १५ ॥ नाना मतें निर्माण जालीं । नाना पाषांडें वाढलीं । नाना प्रकारींचीं उठिलीं । नाना बंडें ॥ १६ ॥ जैसा प्रवाहो पडिला । तैसाच लोक चालिला । कोण वारील कोणाला । येक नाहीं ॥ १७ ॥ पृथ्वीचा जाला गळांटा । येकाहून येक मोठा । कोण खरा कोण खोटा । कोण जाणे ॥ १८ ॥ आचार बहुकचिंत पडिला । कित्येक पोटासाठीं बुडाला । अवघा वरपंगचि जाला । साभिमानें ॥ १९ ॥ देव जाले उदंड । देवांचें मांडलें भंड । भूतदेवतांचें थोतांड । येकचि जालें ॥ २० ॥ मुख्य देव तो कळेना । काशास कांहींच मिळेना । येकास येक वळेना । अनावर ॥ २१ ॥ ऐसा नासला विचार । कोण पाहातो सारासार । कैंचा लहान कैंचा थोर । कळेचिना ॥ २२ ॥ शास्त्रांचा बाजार भरला । देवांचा गलबला जाला । लोक कामनेच्या व्रताला ।

भ्रम हे चंचळाचे धर्म मनावर पगडा बसवून भ्रम मात्र होतात. निश्चळीं हें कांहीं नाहीं पण हें कळणें कठिण आहे (१–८). सगुण साकार सारें नाशवंत आहे, त्यांत लहान मोठें काय निवडावें ? सारा मायेचाच विस्तार आहे, हें ब्रह्मांड हा अष्टधा· प्रकृतीचा विस्तार असून चित्रविचित्र अनंतरूपांनीं तीच विकार पावली आहे. अनंत विकार पावून तिच्यांत नानाविध चमत्कृतिजनक लहान थोर प्राणी निर्माण झाले आहेत. मूळमायाच विकारवंत आहे, ती मूळांत सूक्ष्म असली तरी कांहीं नसून कांहींच्याबाही अफाट जगडंबररूप होऊन स्थूळजडापर्यंत विस्तारली आहे (९–१२). मनुष्ययोनींतही अनंत शरीरें झालीं व भाषापरत्वें त्यांना अनंत नामें मिळालीं. मग त्यांत अनेक प्रकारच्या रीतिभाती, अनेक कल्पनाप्रकार, अनेक आचार उत्पन्न झाले, लोक आपापल्या तऱ्हेनें वागूं लागले. अष्टधा प्रकृतींतूनच सर्व लोक जन्मास आले पण त्याचे वर्तनप्रकार हजारों झाले. अनेक मतें, अनेक पाखांडें (वेदविरुद्ध मतें) व अनेक बंडें (स्वच्छंदी मतें) माजलीं. जसा प्रवाह पडत चालला तसतसे लोक त्या त्या प्रवाहाबरोबर चालले, सर्वांत एकरूपता नसल्यामुळें कोणीं कोणाला वारावें अशी बेबंदशाही झाली. पृथ्वीवर नाना मतांचा गोंधळ उडाला. एकापेक्षां एक मोठे असे अनेक अग्रेसर सरसावले, आता त्यांत खऱ्याखोट्याची निवड तरी कोणी कशी करावी ? आचार वेगवेगळे पडले, त्यांतच कित्येक पोटबाबू निघाले, आपल्या पक्षाचे अभिमानी असे सोंगाडे उभे राहिले, अनेक देव व त्या देवांचे नानाविध पूजामार्ग निघून देव व भूतें यांच्या उपासना एकमेकांत मिसळल्या. मुख्य देव कोणासच कळेनासा झाला. कोणाचीं मतें कोणास मिळेनाशीं होऊन कोणी कोणास आवरेनासा झाला, सारासार विचार कोणी पाहीना, लहान थोर कळेना, याप्रमाणें खरा विचार पार लोपून गेला·

गोंबोन पडती ॥ २३ ॥ ऐसें अवघें नासलें । सत्यासत्य हारपलें । अवघें अनावेक जालें । चहूंकडे ॥ २४ ॥ मतामतांचा गल्बला । कोणी पुसेना कोणाला । जो जे मतीं सांपडला । तयास तेंचि थोर ॥ २५ ॥ असत्याचा अभिमान । तेणें पाविजे पतन । म्हणोनियां ज्ञाते जन । सत्य शोधिती ॥ २६ ॥ लोक वर्तती सकळ । तें ज्ञात्यास करतळामळ । आतां ऐका केवळ । विवेकी हो ॥ २७ ॥ लोक कोण्या पंथें जाती । आणि कोण्या देवास भजती । ऐसी हे रोकडी प्रचिती । सावध ऐका ॥ २८ ॥ मृत्तिका धातु पाषाणादिक । ऐसिया प्रतिमा अनेक । बहुतेक लोकांचा दंडक । प्रतिमादेवीं ॥ २९ ॥ नाना देवांचे अवतार । चरित्रें ऐकती येक नर । जप ध्यान निरंतर । करिती पूजा ॥ ३० ॥ येक सकळांचा अंतरात्मा । विश्वीं वर्ते जो विश्वात्मा । द्रष्टा साक्षी ज्ञानात्मा । मानिती येक ॥ ३१ ॥ येक ते निर्मळ निश्चळ । कदापी नव्हेति चंचळ । अनन्यभावें केवळ । वस्तुच ते ॥ ३२ ॥ येक नाना प्रतिमा । दुसरा अवतारमहिमा । तिसरा तो अंतरात्मा । चौथा निर्विकारी ॥ ३३ ॥ ऐसे हे चत्वार देव । सृष्टीमधील स्वभाव । यावेगळा अंतर्भाव । कोठेंचि नाहीं ॥ ३४ ॥ अवघें येकचि मानिती । ते साक्ष देव जाणती । परंतु अष्टधा प्रकृति । वोळखिली पाहिजे ॥ ३५ ॥ प्रकृतीमधील देव । तो प्रकृतीचा स्वभाव । भावातीत महानुभाव । विवेकें जाणावा ॥ ३६ ॥ जो निर्मळास ध्याईल । तो निर्मळचि होईल । जो जयास भजेल । तो तद्रूप जाणावा

अनेक देव व अनेक शास्त्रें यांचा बाजार भरला, लोक कामनिक व्रतें तेवढींच करूं लागले. याप्रमाणें खऱ्याखोट्याचा निर्णय होईनासा होऊन सारा समाज नासून गेला. समाज ‘ अनायक ’ (नायक किंवा नियंता नाहीं असा) किंवा ‘ अनाविक ’ (ज्याला नाविक किंवा कर्णधार, प्रमुख नावाडी नाहीं असा) झाला. नानामतांचा गोंधळ होऊन कोणी कोणाला विचारीनासा झाला, जो ज्या मताच्या प्रवाहांत सांपडला तेंच मत श्रेष्ठ असें त्याला वाटूं लागलें, असत्याचा अभिमान धरल्यानें समाजाचा नाश होतो म्हणून जाणते पुरुष सत्य शोधीत असतात (१३--२६). लोकांच्या वर्तणुकींतले सर्व प्रकार जाणत्याला तळहातावरच्या आंवळ्यासारखे स्पष्ट दिसत असतात. लोक कोण्या देवास भजतात, कोणत्या मार्गानें जातात हें सावध ऐका. धातुपाषाणमृत्तिकेच्या अनेक मूर्ति करून हाच देव या भावनेनें त्यांची पूजाअर्चा करावी हा बहुजनसमाजाचा मार्ग आहे. कांहीं लोक रामकृष्णादि देवांचीं अवतारचरित्रें ऐकून त्या त्या अवतारांची जपध्यान पूजा करितात. आणखी कांहीं लोक सकळांचा अंतरात्मा व सर्वसाक्षी ज्ञानघन असा देव मानतात. कित्येक निर्मळ व नित्यनिश्चळ अशा परब्रह्मवस्तूचें--वस्तु होऊन--अनन्यचिंतन करितात. तात्पर्य, १ प्रतिमापूजा २ अवतारोपासना ३ अंतरात्मभजन व ४ निश्चळब्रह्मोपासना अशा चार प्रकारांनीं लोक देवाची पूजा करितात. सृष्टींतल्या भिन्नभिन्न स्वभावांच्या सर्व लोकांचा या चार वर्गांत अन्तर्भाव होतो (२७--३४). हे सारे लोक पुन्हां आम्ही एकाच देवाची पूजा करितों असें म्हणतात, व याची परीक्षा त्या देवालाच ठाऊक, पण अष्टधा प्रकृति ओळखून प्रकृतिपर परमात्मा जाणला पाहिजे. प्रकृतींतले देव म्ह. प्रकृतीचा स्वभावच होय. प्रकृतीपलीकडील पदार्थाहून वेगळा (भावातीत) असा परमात्मा भावातीत महात्मेच जाणतात व त्यांची ओळखही विवेकानेंच होत असते. जो ज्याला भजतो तो तद्रूप असतो. निर्मळ निश्चळास जो भजेल तो निर्मळ निश्चळच होईल. दूध व पाणी वेगळे करणारे जसे पक्ष्यांत एक राजहंसच होत, त्याप्रमाणें सार (निश्चळ ब्रह्म) व असार

॥ ३७ ॥ क्षीर नीर निवडिती । ते राजहंस बोलिजेती । सारासार जाणती । ते महानभाव ॥३८॥ अरे जो चंचळासी ध्याईल । तो सहजचि चळेल । जो निश्चळासी भजेल । तो निश्चळचि ॥ ३९ ॥ प्रकृतीसारिखें चालावें । परी अंतरीं शाश्वत वोळखावें । सत्य होऊन वर्तावें । लोकांऐसें ॥ ४० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चत्वारदेवनिरूपणनाम समास द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ बहुतां जन्मांचा सेवट । नरदेह सांपडे अवचट । येथें वर्तावें चोखट । नीतिन्यायें ॥ १ ॥ प्रपंच करावा नेमक । पाहावा परमार्थविवेक । जेणेंकरितां उभय लोक । संतुष्ट होती ॥ २ ॥ शत वरुषें वय नेमिलें । त्यांत बाळपण नेणतां गेलें । तारुण्य अवघें वेचलें । विषयांकडे ॥ ३ ॥ वृद्धपणीं नाना रोग । भोगणें लागे कर्मभोग । आतां भगवंताचा योग । कोणे वेळे ॥ ४ ॥ राजिक देविक उदेग चिंता । अन्न वस्त्र देहममता । नानाप्रसंगें अवचिता । जन्म गेला ॥ ५ ॥ लोक मरमरों जाती । वडिलें गेलीं हे प्रचिती । जाणत जाणत निश्चिती । काय मानिली ॥ ६ ॥ अग्न गृहासी लागला । आणि सावकास निजेला । तो कैसा म्हणावा भला । आत्महत्यारा ॥ ७ ॥ पुण्यमार्ग अवघा बुडाला । पापसंग्रह उदंड जाला । यमयातनेचा झोला । कठीण आहे ॥ ८ ॥ तरी आतां ऐसें न करावें । बहुत विवेकें वर्तावें । इहलोक परत्र साधावें । दोहींकडे ॥ ९ ॥ आळसाचें फळ रोकडें । जांभया देऊन निद्रा पडे । सुख म्हणोन आवडे । आळस लोकां ॥ १० ॥ साक्षेप करितां कष्टती । परंतु पुढें सुरवाडती । खाती

(चंचल प्रकृति) यांचें तारतम्य विवेकराजहंसच जाणतात. चंचळास ध्याईल तो चळेल व निश्चळास भजेल तो निश्चळ होईल. लोकांसारखेंच ज्ञात्याला वागलें पाहिजे, पण त्यानें अंतरीं निश्चळ वोळखलें पाहिजे. शाश्वत ब्रह्मवस्तु होऊन लोकांसारखेंच लोकांत वागावें (३५–४०). [द० ११, स० २]

बहुत जन्मांच्या शेवटीं अकस्मात् नरदेह मिळतो. येथें न्यायनीतीनें चांगलें वागावें. प्रपंच शिस्तीनें करावा व परमार्थाचा विवेक पहावा म्हणजे इहपर दोनी उत्तम साधतात. शंभर वर्षांपैकीं बाळपण अज्ञानांत, तारुण्य विषयभोगांत व वृद्धत्व कर्मानुसार उद्भवणाऱ्या रोगांच्या शुश्रूषेंत गेलें, आतां देवाची जोड करायला वेळ कोणता? राजकीय परिस्थितीमुळें किंवा दैवबळामुळें अनेक चिंताक्लेश भोगावे लागतात, अन्नवस्त्र मिळविण्याच्या खटपटी, देहाचे चोज पुरविणें इत्यादिकांत आयुष्य सरून जातें. एकामागें एक असे लोक मरतात, आपले वाडवडिल गेले—हें जाणत असून कशी निश्चिंती वाटते? घराला अग्नि लागला असतांना स्वस्थ घोरत पडणाऱ्या आत्मघातक्याला शहाणा कसें म्हणावें? पुण्यमार्ग सुटला, पाप वाढत गेलें—पुढें यमाच्या जाचणीचा धक्का कठिण आहे. विवेकानें वागून इहपर साधावें (१–९). मुख्य शत्रु आळस. आळसाचें फळ प्रत्यक्षच मिळतें. आळशी माणूस सदाचा जांभया देऊन लोळत पडतो: लोकांना आळस हेंच सुख वाटतें आवडे). उद्योगाचे (साक्षेप) कष्ट करणाऱ्यांना पुढें सुख होतें, प्रयत्न करून ते अन्नवस्त्रादि सुखानें भोगतात. आळसानें

जेविती सुखी होती । यत्नेंकरूनी ॥ ११ ॥ आळस उदास नागवणा । आळस प्रत्नबुडवणा । आळसें करंटपणाच्या खुणा । प्रगट होती ॥१२॥ म्हणोन आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा । अरत्रीं परत्रीं जीवा । समाधान ॥ १३ ॥ प्रत्न करावा तो कोण । हेंचि ऐका निरूपण । सावध करून अंतःकरण । निमिष येक ॥ १४ ॥ प्रातःकाळीं उठावें । कांहीं पाठांतर करावें । यथानुशक्ति आठवावें । सर्वोत्तमासी ॥ १५ ॥ मग दिशेकडे जावें । जे कोणासिच नव्हे ठावें । शौच्य आचमन करावें । निर्मळ जळें ॥१६॥ मुखमार्जन प्रातःस्नान । संध्यातर्पण देवतार्चन । पुढें वैश्वदेवउपासन । यथासांग ॥ १७ ॥ कांहीं फळाहार घ्यावा । मग संसारधंदा करावा । सुशब्दें राजी राखावा । सकळ लोक ॥ १८ ॥ ज्याचा ज्याचा जो व्यापार । तेथें असावें खबर्दार । दुश्चितपणें तरी पोर । वेढा लावी ॥ १९ ॥ चुके ठके विसरे सांडी । आठवण जालियां चर्फडी । दुश्चीत आळसाची रोकडी । प्रचीत पाहा ॥ २०॥ याकारणें सावधान । सदा येकाग्र असावें मन । तरी मग जेवितां भोजन । गोड वाटे ॥ २१ ॥ पुढें भोजन जालियांवरी । कांहीं वाची चर्चा करी । येकांतीं जाऊन विवरी । नाना ग्रंथ ॥ २२ ॥ तरीच प्राणी शहाणा होतो । नाहीं तरी मूर्खचि राहातो । लोक खाती आपण पाहातो । दैन्यवाणा ॥ २३ ॥ ऐक सदैवपणाचें लक्षण । रिकामा जाऊं नेदी येक क्षण । प्रपंचव्यवसायाचें ज्ञान । बरें पाहे ॥ २४ ॥ कांहीं मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी । शरीर कारणीं लावी । कांहीं तरी ॥ २५ ॥ कांहीं धर्मचर्चा पुराण । हरिकथा निरूपण । वायां जाऊं नेदी क्षण । दोहींकडे ॥ २६ ॥ ऐसा जो सर्वसावध । त्यास कैंचा असेल खेद ।

मनुष्य निरुत्साही होतो, तो सर्वत्र नागवला जातो. आळसानें प्रयत्न, उद्यम नाहींसा होतो. आळशी मनुष्याच्या तोंडावरच करंटेपणाचीं चिन्हें दिसतात. म्हणून आळस नसावा. तरच वैभव प्राप्त होतें व इहपरलोकींचें समाधान मिळतें (१०-१३). प्रयत्न कोणता करावा तें सावध ऐका. प्रातःकाळीं उठावें, नेमानें पाठांतर करावें, यथाशक्त्या भगवंताचें ध्यान करावें, मग दूर एकांतांत शौचाचमनादि कर्म निर्मळ जळानें करावें, स्नानसंध्या, पूजा, वैश्वदेव यथासांग करावा, कांहीं फळाहार घ्यावा व नंतर संसारधंद्यास लागावें. मधुर भाषणानें सर्वांस संतुष्ट ठेवावें. प्रत्येकानें आपला व्यवसाय सावधगिरीनें करावा, गैरसावधपणा केल्यास एकादें पोरही ठकवून जातें. मनुष्य गैरसावध (दुश्चित) व आळशी राहिला तर चुकणें, फसणें, विसरणें हलगर्जीपणा करणें हे दोष त्याच्या हातून सहज घडतात व तो सावध होतो तेव्हां आपला आपल्यावरच कातावतो. म्हणून मनुष्यानें सावध व अव्यग्र असावें व याप्रमाणें दक्षतेनें व्यवसाय करणारा जेवायला बसला म्हणजे त्याला जेवणही गोड लागतें (१४-२१). भोजनोत्तर कांहीं ग्रंथावलोकन करावें, जाणत्यांबरोबर चर्चा करावी, एकांतांत अनेक ग्रंथ वाचून त्यांचें मनन करावें. असें वागेल तरच प्राणी शाहणा होईल नाहींतर मूर्खच राहील. सुज्ञ लोक नाना उपभोग भोगीत असतांना हा दीनवाणीनें त्यांच्या तोंडाकडे पाहत राहील ! एक क्षणही व्यर्थ न दवडणें हें भाग्यवंताचें लक्षण आहे (२२-२३). म्हणून आपल्या उद्योगांत निमग्न असावें. स्वकष्टानें आधी धनधान्य मिळवून मग जेवणें, बद्धांना मोकळें करणें, शरीराचें कांहींतरी सार्थक करणें, धर्मचर्चा निरूपणांत वेळ घालवणें, एवंच प्रपंच व परमार्थ या दोहोंविषयीं

विविकें तुटला समंध। देहबुद्धीचा ॥ २७ ॥ आहे तितुकें देवाचें। ऐसें वर्तणें निश्चयाचें। मूळ तुटे उद्वेगाचें। येणें रीति ॥ २८ ॥ प्रपंचीं पाहिजे सुवर्ण। परमार्थीं पंचीकरण। महावाक्यांचें विवरण। करितां सुटे ॥ २९ ॥ कर्म उपासना आणि ज्ञान। येणें राहे समाधान। परमार्थाचें जें साधन। तेंचि ऐकत जावें ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सिकवणनिरूपणनाम समास तृतीय ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥ ब्रह्म म्हणिजे निराकार। गगनासारिखा विचार। विकार नाहीं निर्विकार। तेंचि ब्रह्म ॥ १ ॥ ब्रह्म म्हणिजे निश्चळ। अंतरात्मा तो चंचळ। द्रष्टा साक्षी केवळ। बोलिजे तया ॥ २ ॥ तो अंतरात्मा म्हणिजे देव। त्याचा चंचळ स्वभाव। पाळिताहे सकळ जीव। अंतरीं वसोनी ॥ ३ ॥ त्यावेगळे जड पदार्थ। तेणेंवीण देह व्यर्थ। तेणेंचि कळे परमार्थ। सकळ कांहीं ॥ ४ ॥ कर्ममार्ग उपासनामार्ग। ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग। प्रवृत्ति निवृत्ती नानामार्ग। देवचि चालवी ॥ ५ ॥ चंचळेविण निश्चळ कळेना। चंचळ तरी स्थिरावेना। ऐसे हे विचार नाना। बरे पाहा ॥ ६ ॥ चंचळनिश्चळाची संधी। तेथें भांबावते बुद्धि। कर्ममार्गाची जे विधी। मग ऐलीकडे ॥ ७ ॥ देव या सकळांचें मूळ। देवास मूळ ना डाळ। परब्रह्म तें निश्चळ। निर्विकारी ॥ ८ ॥ निर्विकारी आणि विकारी। येक म्हणेल तो भिकारी। विचाराची होते वारी। देखतदेखतां ॥ ९ ॥ सकळ परमार्थास मूळ। पंचीकरण माहावाक्य केवळ।

निरलस असणें हेंच भाग्यवंताचें लक्षण होय. असा जो सर्वसावध (प्रपंचपरमार्थीं दक्ष) आहे त्याची विवेकबळानें देहबुद्धि गलित होत असल्यामुळें त्याच्या चित्ताला खेद टाऊक नसतो. आहे हें सारें देवाचें आहे या निश्चयाचें त्याचें वागणें असल्यामुळें त्याचा उद्वेग निःशेष नाहींसा होतो. प्रपंचांत सुवर्ण व परमार्थांत पंचीकरण दोन्हीं महत्त्वाचीं व अवश्य आहेत; हीं दोन्हीं साधून 'तत्त्वमस्यादि' महावाक्याचें मनन करीत असल्यानें प्राणी बंधांतून मुक्त होतो. कर्म, उपासना, व ज्ञान या तीनही अंगानीं पूर्ण असलेला मनुष्य परम समाधान पावतो, म्हणून परमार्थपोषक असेंच श्रवण करीत असावें (२४–३०). [द० ११, स० ३]

गगनासारखाच ब्रह्माचा विचार आहे, तें तसें हें निराकार व निर्विकार आहे. ब्रह्म निश्चळ व अंतरात्मा चंचळ. द्रष्टा, साक्षी इ. तो अंतरात्माच आहे. तोच देव, त्याचा स्वभाव चंचळ आहे. तो सर्व जीवांच्या अंतरीं राहून त्यांचें पालन करितो. तो चंचळ व त्याव्यतिरिक्त सर्व जड. त्यांवाचून देह व्यर्थ होय. त्याच्या योगानेंच परमार्थ कळतो. कर्म, उपासना, ज्ञान, हे मार्ग तोच चालवितो, प्रवृत्तिनिवृत्ति त्यामुळेंच. चंचळावांचून निश्चळ कळत नाहीं व चंचळ निश्चळ होत नाहीं-हें सारें विचारानें कळों येतें (१–६). चंचळ व निश्चळ यांच्या संधींत म्ह. चंचळ येथें संपतें व निश्चळ सुरू होतें, त्या ठिकाणीं बुद्धि भांबावते, कर्ममार्गविधि अलीकडचा म्ह. चंचळांतला (मायेंतला) आहे. कर्मादिकांचें मूळ देव आहे. पण देवाला ना मूळ ना डाळ (शेंडा ना बुडूख). या देवाहून (चंचळ अंतरात्म्याहून) निश्चळ ब्रह्म वेगळें आहे. पहिला विकारी व दुसरा निर्विकारी–दोन्ही एकच आहेत हें म्हणणें बुद्धिजाड्याचें लक्षण आहे. दोहोंचा विचार पाहतां विचाराचीच वारी (निवारण /

तेंचि करावें प्रांजळ। पुनः पुन्हां ॥ १० ॥ पहिला देह स्थूळकाया। आठवा देह मूळमाया। अष्ट देह निरसलियां। विकार कैंचा ॥ ११ ॥ याकारणें विकारी। मायाऐसी बाजीगरी। येक समजे येक खरी। मानिताहे ॥ १२ ॥ उत्पत्ति स्थिती संव्हार। यावेगळा निर्विकार। कळायासाठीं सारासार। विचार केला ॥ १३ ॥ सार असार दोनी येक। तेथें कैंचा उरला विवेक। परीक्षा नेणती रंक। पापी करंटे ॥ १४ ॥ जो येकचि विस्तारला। तो अंतरात्मा बोलिला। नाना विकारीं विकारला। निर्विकारी नव्हे ॥ १५ ॥ ऐसें प्रगटचि आहे। आपुल्या प्रत्ययें पाहें। काय राहे काय न राहे। हेंही कळेना ॥ १६ ॥ जें अखंड होत जातें। जें सर्वदा संव्हारतें। रोकडें प्रचितीस येतें। जनामध्यें ॥ १७ ॥ येक रडे येक चर्फडी। येक येकाची धरी नरडी। येकमेकां झोंबती बराडी। दुकळले जैसे ॥ १८ ॥ नाहीं न्याय नाहीं नीति। ऐसे लोक वर्तती। आणि अवघेंच सार म्हणती। विवेकहीन ॥ १९ ॥ धोंडे सांडून सोनें घ्यावें। माती सांडून अन्न खावें। आणि आवघेंचि सार म्हणावें। बाष्कळपणें ॥ २० ॥ म्हणोनी हा विचार करावा। सत्यमार्ग तोचि धरावा। लाभ जाणोनी घ्यावा। विवेकाचा ॥ २१ ॥ सार गार येकचि सरी। तेथें परीक्षेस कैंची उरी। याकारणें चतुरीं। परीक्षा करावी ॥ २२ ॥ जेथें परीक्षेचा अभाव। तेथें दे घाव घे घाव। सगट सारिखा स्वभाव। लौंदपणाचा ॥ २३ ॥ घेव ये तेंचि घ्यावें। घेव न ये तें सांडावें। उंच नीच वोळखावें। या नांव ज्ञान ॥ २४ ॥

होतें म्ह. विचार मावळतो (७–९). पंचीकरणासह महावाक्याचा पुनः पुन्हा विचार करावा. हेंच परमार्थाचें मूळ आहे. पहिला देह स्थूळ (स्थूळ, सूक्ष्म, कारण व महाकारण हे पिंडाचे चार देह) व आठवा देह म्ह. ब्रह्मांडाच्या चार देहांपैकीं (विराट, हिरण्यगर्भ, महत्तत्त्व व मूळमाया) जो मूळमाया–या आठही देहांचें निराकरण झाल्यावर विकार कोठून राहाणार ? पण विकारी चंचळ हा भास (बाजीगिरी) सत्यासारखाच वाटत असल्यामुळें त्याचें मिथ्यात्व एक समजतो व एक तेंच खरें घेऊन चालतो. उत्पत्तिस्थितिलय हे विकार चंचळाला आहेत, निश्चळाला नाहींत. हा सारासारविचार कळला पाहिजे. सार असार एकच असा गोंधळ केल्यावर विवेक कोठें उरला ? हा विचारबुद्धिदारिद्र्य असलेल्या पाप्यांना कळत नाहीं, जो एक असून बहु झाला, सृष्टिरूपें विस्तारला तो विकारी अंतरात्मा कांहीं निश्चळ परब्रह्म नव्हे. हें अगदीं स्पष्ट आहे. विचारी आपल्या प्रत्ययानें घेतो, अज्ञाला शाश्वत काय अशाश्वत काय हें कांहींच कळत नाहीं (१०–१६). उत्पत्ति, स्थिति व लय हीं सर्व अशाश्वताच्या मागें लागलीं आहेत हें सर्वांच्या अनुभवाचें आहे. एक सुखी एक दुःखी ; एक दुसऱ्याला आशाळभूत दुष्काळांतून ओढून काढल्यासारखा (जसें मांजर उंदराला) झडप टाकून खातो ; न्यायनीति सोडणारीं माणसेंही अशींच वागतात. असा प्रकार असतांना सर्वच सार म्ह. ब्रह्म आहे असें अविचारी म्ह. सर्व ब्रह्मवादी वगैरे म्हणत असतात ! पण या म्हणण्यांत काय अर्थ आहे ? दगड टाकून सोनें घ्यावें, माती सांडून अन्न खावें असा वागण्यांत भेद दाखवीत असूनही सर्वच ब्रह्म म्हणावें हा बाष्कळपणा नाहीं तर काय आहे ? म्हणून विवेकानें असार टाकून सार म्ह. शाश्वत ब्रह्म तेवढें घ्यावें. रत्नें व गारा एकच म्हटल्यावर रत्नपारख कशी होईल ? म्हणून चतुरानें परीक्षा करून असार टाकून सार घ्यावें. परीक्षा नाहीं तेथें ' दे घाव घे घाव ' असा एकच लट्ठंभारतीपणा असतो. घ्यावयास उचित तेंच घ्यावें, घेणें अनुचित तें त्यागावें, उंच नीच ओळखावें याचें नांव ज्ञान. संसाराच्या बाजारपेठेस येऊन कांहीं (विवेकी) शाश्वत

संसारसांतेसी आले । येक लाभें अमर जाले । येक ते करंटे ठकले । मुद्दल गेलें ॥ २५ ॥ जाणत्यांनीं ऐसें न करावें । सार तेंचि शोधून घ्यावें । असार तें जाणोन त्यागावें । वमन जैसें ॥ २६ ॥ तें वमन करी प्राशन । तरी तें श्वानाचें लक्षण । तेथें शुचिष्मंत ब्राह्मण । काय करी ॥ २७ ॥ जेंही जैसें संचित केलें । तयास तैसेंचि घडलें । जें अभ्यासीं पडोन जडलें । तें तों सुटेना ॥ २८ ॥ येक दिव्यान्नें भक्षिती । येक विष्ठा सावडिती । आपल्या वडिलांचा घेती । साभिमान ॥ २९ ॥ असो विवेकेंविण । बोलणें तितुका सीण । कोणीयेकें श्रवणमनन । केलेंचि करावें ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विवेकनिरूपणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ कर्म केलेंचि करावें । ध्यान धरिलेंचि धरावें । विवरलेंचि विवरावें । पुन्हां निरूपणीं ॥ १ ॥ तैसें आम्हांस घडलें । बोलिलेंचि बोलणें पडिलें । कां जें विघडलेंचि घडलें । पाहिजे समाधान ॥ २ ॥ अनन्य राहे समुदाव । इतर जनांस उपजे भाव । ऐसा आहे अभिप्राव । उपायाचा ॥ ३ ॥ मुख्य हरिकथानिरूपण । दुसरें तें राजकारण । तिसरें तें सावधपण । सर्वविषईं ॥ ४ ॥ चौथा अत्यंत साक्षेप । फेडावे नाना आक्षेप । अन्याय थोर अथवा अल्प । क्षमा करीत जावे ॥ ५ ॥ जाणावें पराचें अंतर । उदासीनता निरंतर । नीतिन्यायासी अंतर । पडोंचि नेदावें ॥ ६ ॥ संकेतें लोक वेधावा । येकूनयेक बोधावा । प्रपंचही सांवरावा । यथानुशक्त्या ॥ ७ ॥ प्रपंचसमयो

लाभ जोडून अमरपद पावतात व कांहीं (सारासारहीन मूढ) अभागी लोक मुद्दल म्ह. निजधन गमावून बसतात. जाणत्यानें असें करूं नये. वमनासारखें असार तें जाणून टाकावें व सार तें शोधून (पारखून) घ्यावें. ओकलेलें खाणें हें श्वानाचें लक्षण आहे, पवित्र ब्राह्मण त्या वमनाकडे ढुंकूनही पाहत नाहीं; तसें असारच सार समजून घेणें हें पतिताचें लक्षण आहे, विवेकी असार सेवन कधींही करीत नाहींत. असो. संचिताप्रमाणें होत असतें, जें अभ्यासानें पचनीं पडलें तें सुटतां सुटत नाहीं. कोणी दिव्य अन्नें जेवतात, कोणी विष्टा सावडतात, व दोघेही आपले वडील थोर म्हणून अभिमान वाहतात. असो, विवेकावांचून बोलणें तो वृथा शीण होय. विवेकजागृतीसाठीं नित्य श्रवणमनन करीत असावें. (१७–३०) [द० ११ स० ४]

रोजच्या रोज तेंच तें स्वधर्मकर्म करीत असावें, आपलें उपास्यध्यान धरीत असावें, व निरूपणीं पुनः पुन्हा मनन करीत असावें. आमचेंही असेंच झालें आहे. सांगितलेल्याच गोष्टी आम्हांस पुनः पुन्हा सांगाव्या लागतात, कां कीं श्रोत्यांचें चंचळ मन जागेवरून ढळलें कीं आम्हांला तें पुन्हां स्वस्थ करावें लागतें. आपला समुदाय (सांप्रदायिक) अनन्य राहावा व बाहेरील लोकांचा सद्भाव वाढावा असा लोकहिताचा दंडक आहे. हरिकथानिरूपण हें मुख्य आहे, दुसरें राजकारण, तिसरें सर्वत्र सावधानता व चौथा निरलस उद्योग. ह्या चार गुणांशिवाय लोककल्याणाचा मार्ग (उपाय) नाहीं (१–५). लोकहितेच्छूनें आणखीही गुण संपादिले पाहिजेत. त्यानें दुसऱ्यांचे लहानमोठे अपराध क्षमा करायला शिकलें पाहिजे. दुसऱ्यांचें मनोगत जाणावें, स्वतः उदासवृत्तीनें रहावें, नीतिन्याय सोडूं नये. संकेतानें लोकांचीं मनें आकर्षावींत, सर्वांस बोध द्यावा, यथाशक्त्या प्रपंचही नीट करावा. प्रपंचांतील अनेक प्रसंग ओळखून धैर्यानें वागावें, अतिलगट कोणा-

वोळखावा । धीर बहुत असावा । संबंध पडों नेदावा । अतिपरिचयाचा ॥ ८ ॥ उपाधीस विस्तरावें । उपाधींत न सांपडावें । नीचत्व पहिलेंच घ्यावें । आणि मूर्खपण ॥ ९ ॥ दोष देखोनी झांकावे । अवगुण अखंड न बोलावे । दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करूनी ॥ १० ॥ तऱ्हे भरोंच नये । सुचावे नाना उपाये । नव्हे तेंचि करावें कार्ये । दीर्घ प्रेत्नें ॥ ११ ॥ फड नासोंचि नेदावा । पडिला प्रसंग सांवरावा । अतिवाद न करावा । कोणीयेकासी ॥ १२ ॥ दुसऱ्याचें अभीष्ट जाणावें । बहुतांचें बहुत सोसावें । न सोसे तरी जावें । दिगंतराप्रती ॥ १३ ॥ दुःख दुसऱ्याचें जाणावें । ऐकून तरी वांटून घ्यावें । बरें वाईट सोसावें । समुदायाचें ॥ १४ ॥ अपार असावें पाठांतर । सन्निधचि असावा विचार । सदा सर्वदा तत्पर । परोपकारासी ॥ १५ ॥ शांती करून करवावी । तऱ्हे सांडून सांडवावी । क्रिया करून करवावी । बहुतांकरवीं ॥ १६ ॥ करणें असेल अपाय । तरी बोलोन दाखवूं नये । परस्परेंचि प्रत्ययो । प्रचीतीस आणावा ॥ १७ ॥ जो बहुतांचें सोसीना । त्यास बहुत लोक मिळेना । अवघेंचि सोसितां उरेना । महत्व आपुलें ॥ १८ ॥ राजकारण बहुत करावें । परंतु कळोंच नेदावें । परपीडेवरी नसावें । अंतःकरण ॥ १९ ॥ लोक पारखून सांडावे । राजकारणें अभिमान झाडावे । पुन्हां मेळवून घ्यावें । दुरिल्या दोरें ॥ २० ॥ हिरवटासी दुरी धरावें । कचरटासीं न बोलावें । संबंध पडतां सोडून जावें । येकीकडे ॥ २१ ॥ ऐसें असो राजकारण । सांगतां तें असाधारण । सुचित अस्तां अंतःकरण । राजकारण जाणे ॥ २२ ॥ वृक्षीं

शींही करूं नये. उपाधी (व्याप) खूप वाढवावी पण अंतर्यामीं निरुपाधिक असावें. वादप्रसंग आल्यास आधींच आपल्याकडे लघुत्व व मूर्खत्व घ्यावें म्हणजे वाद मिटतो. दोष दिसले तरी उघड करूं नयेत, प्रसंगानें बोलावें लागल्यास नित्य बोलूं नयेत. दुर्जनांवरही उपकार करून त्यांस सोडून द्यावें. एककल्लीपणा (तऱ्हे भरणें) करूं नये. बिकट प्रसंगांतून पार पडण्याचे अनेक उपाय शोधावेत. अशक्य वाटणारें महत्कार्य दीर्घ प्रयत्नानें करून दाखवावें. सभा किंवा समारंभ आपल्या मनास्माठीं मोडूं देऊं नये, कसलाही प्रसंग येऊन कोसळला तरी त्यांतून पार पडून जावें. कोणाशींही अतिवाद करूं नये. दुसऱ्याचें कल्याणच चिंतावें, पुष्कळांचें पुष्कळ सोसावें, सोसवेनासें वाटलें तर दूर निघून जावें. परदुःख जाणावें व ऐकून घ्यावें म्हणजे दुसऱ्याचें दुःख हलकें होतें. पाठांतर अतिशय असावें, आत्मज्ञानाचा विचार जागृत असावा, परोपकारास नेहमीं तत्पर असावें. स्वतःला शांत म्ह. समचित्त राखावें व दुसऱ्याचे अंगीं शांति भिनवावी; तऱ्हेवाईकपणा स्वतः करूं नये व दुसऱ्याला करूं देऊं नये. सत्कर्माचरण स्वतः करावें व करवावें. कोणाला अपाय करायचा असलाच तर तोंडानें बोलून दाखवूं नये, कांट्यानें कांटा काढावा. दुसऱ्यांचें दुःख सोसल्यावांचून लोकसंग्रह होत नाहीं व सर्वच सोसूं म्हटलें तर आपलें महत्त्व उरत नाहीं. राजकारण बहुत करावें पण कळूं देऊं नये, पराला दुःख देण्याची बुद्धि धरूं नये. लोकांची पारख करून ठेवावी. राजकारण करून कोणाचा अभिमान राहूं देऊं नये. आणि कांहींबाहीं करून युक्तीनें मिळवून घ्यावें; तात्पर्य मनुष्य तोडूं नये. हिरवट (चटकन बदलीवर येणारे, तामसी) लोक दूर ठेवावे, कचरट (क्षुद्र) माणसाशीं तर बोलूंही नये आणि अशांचा संबंध पडलाच तर उठून दूर एकांतांत जावें. असो. अशा राजकारणाच्या गोष्टी बहुत आहेत त्या कोठवर सांगाव्या. चित्त सुचित असलें म्हणजे राजकारण सुचतें. जे कोणी वर चढत असतील त्यांना टेका

रूढासी उचलावें । युध्यकर्त्यास ढकलावें । कारबाराचें सांगावें । आंग कैसें ॥ २३ ॥ पाहातां तरी सांपडेना । कीर्ति करूं तरी राहेना । आलें वैभव अभिळासीना । कांहीं केल्या ॥ २४ ॥ येकाची पाठी राखणें । येकास देखों न सकणें । ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । चातुर्याचीं ॥ २५ ॥ न्याय बोलतांहि मानेना । हित तेंचि न ये मना । येथें कांहींच चालेना । त्यागेंविण ॥ २६ ॥ श्रोतीं कळोन आक्षेपिलें । म्हणोन बोलिलेंचि बोलिलें । न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ॥ २७ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे राजकारणनिरूपणनाम समास पंचम ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥ शुद्ध नेटकें ल्याहावें । लेहोन शुद्ध शोधावें । शोधून शुद्ध वाचावें । चुकों नये ॥ १ ॥ विस्कळित मातृका नेमस्त कराव्या । धाट्या जाणोन सदृढ धराव्या । रंग राखोन भराव्या । नाना कथा ॥ २ ॥ जाणायाचें सांगतां नये । सांगायाचें नेमस्त नये । समजल्यावीण कांहींच नये । कोणीयेक ॥ ३ ॥ हरिकथानिरूपण । नेमस्तपणें राजकारण । वर्तायाचें लक्षण । तेंही असावें ॥ ४ ॥ पुसों जाणे सांगों जाणे । अर्थांतर करूं जाणे । सकळिकांचें राखों जाणे । समाधान ॥ ५ ॥ दीर्घ सूचना आधीं कळे । सावधपणें तर्क प्रबळे । जाणजाणोंचि निवळे । यथायोग्य ॥ ६ ॥ ऐसा जाणे जो समस्त । तोचि महंत बुद्धिवंत । यावेगळें अंतवंत । सकळ कांहीं ॥ ७ ॥ ताळवेळ तानमानें । प्रबंद कविता जाडवचनें । मज्यालसीं नाना चिन्हें । सुचती जया

देऊन चढवावें, जे कलह किंवा विरोध करतील त्यांना खालीं पाडावें–कारभाराचें अंग कसें काय सांगावें ? पाहूं जावें तों सांपडत नाहीं, कीर्ति होऊं लागतांच तेथून निघून जातो, वैभव पायाशीं आलें तरी अभिलाष नाहीं. एकाला पाठीशीं घालावें, एकाची दुष्मानगिरी करावी हें अकलेचें काम नाहीं. न्याय सांगितला तरी ऐकत नाहीं, हिताची गोष्ट मनावर घेत नाहीं, अशाची गांठ पडल्यास त्याचा त्यागच करावा. श्रोत्यांना हें माहीतच आहे पण शंकासमाधानार्थ बोलण्याबद्दल क्षमा करावी (६–२७). [द० ११ स० ५]

आधीं लिहितांनाच जपून शुद्ध नीटनेटकें लिहावें, लिहिल्यानंतर शुद्ध तपासावें व नीट तपासल्यानंतर शुद्ध वाचावें; लिहिण्यांत, नंतर शोधण्यांत व नंतर वाचण्यांत तीनही प्रकारांत बिनचूकपणा असावा (१). अक्षरें व कानेमात्रा वांकड्या तिकड्या गेल्या असल्या तर सरळ कराव्यात, लिहिण्याची ढब (धाटी) चांगली असावी व नाना कथा लिहितांना जागोजाग चतुराईनें विविध रंग भरावे. जें जाणून करायचें असतें तें तोंडानें सांगतां येत नाहीं, जें सांगायचें असतें त्याचे नियम वगैरे देतां येत नाहींत व समजल्यावांचून कांहींच करितां येत नाहीं. परमार्थविवरण, सावधपणाचें राजकारण व चोख वर्तन हीं सर्व महंतापाशीं असलीं पाहिजेत. दुसऱ्यांस विचारावें, स्वतः सांगावें, सूक्ष्मबुद्धीनें त्यानें वेगवेगळे अर्थ काढावे. व सर्वांना समाधानसुख द्यावें. पुढें होणाऱ्या गोष्टी आगाऊ कळाव्यात, सावधपणानें तर्कानें तर्क बांधावेत, पुनः पुन्हा नीट समजून विमल ज्ञान व्हावें असा सर्व जाणता बुद्धिवंत पुरुष तोच महंतपणाला योग्य होय, व अशा श्रेष्ठ महंताशिवाय बाकी सारें नश्वर होय (२–७). तालसूर, तानमान, कवित्वरचना, गंभीर व अढळ सिद्धांतांचें प्रतिपादन, जाणत्यांच्या

॥ ८ ॥ जो येकांतास तत्पर । आधीं करी पाठांतर । अथवा शोधीं अर्थांतर । ग्रंथगर्भीचें ॥ ९ ॥ आधींच सिकोन जो सिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी । गुंतल्या लोकांस उगवी । विवेकबळें ॥ १० ॥ अक्षर सुंदर वाचणें सुंदर । बोलणें सुंदर चालणें सुंदर । भक्ति ज्ञान वैराग्य सुंदर । करून दावी ॥ ११ ॥ जयास यत्नचि आवडे । नाना प्रसंगीं पवाडे । धीटपणें प्रगटे दडे । ऐसा नव्हे ॥ १२ ॥ सांकडीमध्यें वर्तों जाणे । उपाधीमध्यें मिळों जाणे । अलिप्तपणें राखों जाणें । आपणांसी ॥ १३ ॥ आहे तरी सर्वां ठाईं । पाहों जातां कोठेंचि नाहीं । जैसा अंतरात्मा ठाईंचा ठाईं । गुप्त जाला ॥ १४ ॥ त्यावेगळें कांहींच नसे । पाहों जातां तो न दिसे । न दिसोन वर्तवीतसे । प्राणिमात्रांसी ॥ १५ ॥ तैसाच हाही नानापरी । बहुत जनास शाहाणे करी । नाना विद्या त्या विवरी । स्थूळ सूक्ष्म ॥ १६ ॥ आपणांकरितां शाहाणे होती । ते सहजचि सोय धरिती । जाणतेपणाची महंती । ऐसी असे ॥ १७ ॥ राखों जाणे नीतिन्याय । न करी न करवी अन्याय । कठीण प्रसंगीं उपाय । करूं जाणे ॥ १८ ॥ ऐसा पुरुष धारणेचा । तोचि आधार बहुतांचा । दास म्हणे रघुनाथाचा । गुण घ्यावा ॥ १९ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे महंतलक्षणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ चंचळ नदी गुप्त गंगा । स्मरणें पावन करी जगा । प्रचीत रोकडी पाहा गा । अन्यथा नव्हे ॥ १ ॥ केवळ अचंचळीं निर्माण जाली ।

सभांवर हरएक प्रकारें छाप पाडण्याची शक्ति, एकांताची प्रीति, पाठशक्ति, ग्रंथाचें रहस्य शोधपूर्वक उकलण्याची ताकद हे सर्व गुण महंताच्या अंगीं पाहिजेत (८–९). स्वतः आधीं शिकून मग जनास शिकवतो, पेंचांत अगर बंधनांत पडलेल्यांची सांकडीं वारतो, ज्याचें अक्षर, वाचणें, भाषण, भक्ति, ज्ञान, वैराग्य सर्व कांहीं उत्कृष्ट आहे, जो प्रयत्नशील होता, अनेक प्रसंगांत जो दडून न बसतां धैर्यानें शिरतो, ज्याला संकटांतून यशस्वीपणानें निभावून जातां येतें, भिन्न भिन्न उपाधींत वेगवेगळीं कार्यें करून ज्याला पुन्हा असंगपणा राखतां येतो, अंतरात्मा देहांतील सर्व कार्यें करीत असून जसा कोठें लिंपत नाहीं त्याप्रमाणें जो सर्व सर्वत्र कार्यें करीत असून कोठेंच सांपडत नाहीं, त्याच्यावांचून कोणतेंच कार्य होत नाहीं उलट सर्व प्राण्यांना प्रेरक तोच आहे असें असून जो कोठेंही दिसत नाहीं, अनेक सुलभ किंवा सूक्ष्म विद्या बहुत जनांस सांगून जो शाहणे करतो, व याप्रमाणें याच्यापासून शहाणपण शिकून अनेक लोक स्वतंत्र कार्यप्रवर्तक होतात असा जो सर्वज्ञ व सर्वकर्ता पुरुष तोच महंतपणाला योग्य होय (१४–१७). तो नीतिन्यायांचें पालन करितो, अन्याय स्वतः करीत नाहीं व इतरांस करवूं देत नाहीं, कठिण प्रसंगांतून पार पाडण्याचे उपाय शोधून काढतो, असा असामान्य धारणेचा पुरुष तोच बहुतांचा आधार होतो. हे सर्व गुण रामरायाच्या चरित्रापासून शिकावे (१८–१९). [द० ११ स० ६]

मायानदी ही चंचळ असून गुप्त आहे. ती सर्व खटाटोप करीत असून दिसत नाहीं, सर्व कार्य करीत असून कोठेंच आढळत नाहीं. मूळमायेचें स्मरण चित्तशुद्धि करणारें आहे, कल्पना माघारी नेत नेत मूळमायेपर्यंत म्ह० उगमापर्यंत नेली कीं परम पावनता प्राप्त होते याचा अनुभव कोणालाही येणारा आहे, हें बोलणें अगदीं सत्य आहे (१). माया नदी ही निश्चळ

अधोमुखें बळें चालिली । अखंड पाहे परी देखिली । नाहींच कोणी ॥ २ ॥
वळणें वांकाणें भोवरे । उकळ्या तरंग झरे । लादा लाटा कातरे । ठाईं ठाईं
॥ ३ ॥ शुष्क जळाचे चळाळ । धारा धबाबे खळाळ । चिपळ्या चळक्या
भळाळ । चपळ पाणी ॥ ४ ॥ फेण फुगे हेलावे । सैरावैरा उदक धांवे । थेंब
फुई मोजावे । अणुरेणु किती ॥ ५ ॥ वोसाणें वाहाती उदंड । झोतावे
दर्कुटे दगड । खडकें बेटें आड । वळसा उठे ॥ ६ ॥ मृद् भूमी तुटोन गेल्या ।
कठीण तैशाचि राहिल्या । ठाईं ठाईं उदंड पाहिल्या । सृष्टीमध्यें ॥ ७ ॥ येक
ते वाहातचि गेले । येक वळशामध्यें पडिले । येक सांकडींत आडकले ।
अधोमुख ॥ ८ ॥ येक आपटआपटोंचि गेलीं । येक चिरडचिडोंचि मेलीं ।
कितीयेक तें फुगलीं । पाणी भरलें ॥ ९ ॥ येक बळाचे निवडले ।
ते पोहतचि उगमास गेले । उगमदर्शनें पवित्र जाले । तीर्थरूप
॥ १० ॥ तेथें ब्रह्मादिकांचीं भुवनें । ब्रह्मांडदेवतांचीं स्थानें । उफराटी
गंगा पाहातां मिळणें । सकळांस तेथें ॥ ११ ॥ त्या जळाऐसें नाहीं
निर्मळ । त्या जळाऐसें नाहीं चंचळ । आपोनारायण केवळ । बोलिजे
त्यासी ॥ १२ ॥ महानदी परी अंतराळीं । प्रत्यक्ष वाहे सर्वकाळीं ।
स्वर्गमृत्युपाताळीं । पसरली पाहा ॥ १३ ॥ अधोर्ध अष्टही दिशा । तिचें
उदक करी वळसा । जाणते जाणती जगदीशा । सारिखीच ते ॥ १४ ॥

ब्रह्मपर्वतावरून निघाली ती खालीं खालीं म्ह० शुद्धांतून शबलाकडे, सूक्ष्मांतून स्थूलाकडे अशी वाहत चालली आहे. हा क्रम सतत चालला असून ही नदी कोणींच पाहिली नाहीं. हिच्यांत अनेक वळणें, वांकणें, भोंवरे, लाटा, झरे असून खडकावर आपटंत व पाणी जागोजाग कांपीत अशा प्रकारें ती अधोमुख वाहत आहे. शुष्क फेंस, खळबळ, चुळक्या, झरझर वाहणें, फुगारे, स्वच्छंद वाहणें, अनेक तुषार (फुई), पुराबरोबर केरकचरा घेऊन जाणें, (वोसाणें) धबधबे (झोतावे), लहान मोठे दगड, खडक, बेटें, वळसे वगैरे सर्व प्रकार मायानदींतही आहेत (अनंत प्रकारच्या वृत्तींत लहरी उठत असतात) (२–६). या प्रवाहांत मृदभूमि फाटून कठिण भूमि तशाच राहतात म्ह० सात्त्विक सूक्ष्म लहरी टिकत नाहींत व तामस स्थूल तेवढ्या टिकून राहतात किंवा सूक्ष्मांतून स्थूळाकडे जाणें असा हा प्रवाह आहे (७). मायानदीच्या प्रवाहाबरोबर कित्येक जीव वाहत जातात, कित्येक वळशांत (प्रपंचफेऱ्यांत) पडून खालीं वर होतात, कित्येक अधोगतीला लागून कामक्रोधादिकांच्या कचाट्यांत, सांपडतात, आपटतात, चिरडतात, अहंकारानें फुगून वर येतात (८–९). कांहीं पुण्यवंत जीव (शास्त्र, बुद्धि, भाव इ.) बळानें उलट पोहत म्ह० अंतर्मुख होऊन उगमास जातात व त्यामुळें उद्धरून जातात. उगमापाशीं म्ह० मूळमायेच्या ठिकाणीं ब्रह्मादिक देव व ब्रह्मांडांतल्या देवता यांचीं मूळस्थानें आहेत म्ह. सर्व देवदेवता आपल्या मूळ स्वरूपांत तेथें आहेत. मायानदी उलट क्रमानें पोहत उगमापाशीं गेल्यावर तेथें सर्वांची भेट होते, कां कीं सर्वांचें तें विश्रांतिस्थान आहे. त्या उगमाचें जळ (चैतन्य) अत्यंत शुद्ध व चंचळ आहे. त्याला आपोनारायण म्हणतात (१०–१२). स्वर्ग, मृत्यु, पाताळ अशा तीनही लोकीं पसरलेली ही महानदी पण तिचें मूळ अंतराळांत (आकाशांत) आहे, व सर्वकाळ सर्वत्र ती सारखी वाहत आहे (मायेनें त्रैलोक्य व्यापलें आहे पण तिचें मूळ अत्यंत सूक्ष्म आहे). तिच्या प्रवाहाचे मोठमोठे फाटे खालीं व वर (खालीं पशुपक्षीकीटकादि योनी, मध्यस्थ मनुष्ययोनि व वर देवदेवता) एकसारखे पसरलेले असून तिचें बळ सवावर सारखेंच चालतें. हें सर्व ज्ञाते पुरुष जाणतात. जगदीशाबरोबरीची

अनंत पात्रीं उदक भरलें। कोठें पाझपाझरोंच गेलें। कितीयेक तें वेचलें। संसारासी ॥ १५ ॥ येक्यासंगें तें कडवट। येक्यासंगें तें गुळचट। येक्यासंगें तें तिखट। तुरट क्षार ॥ १६ ॥ ज्या ज्या पदार्थास मिळे। तेथें तद्रूपचि मिसळे। सखोल भूमीस तुंबळे। सखोलपणें ॥ १७ ॥ विषामध्यें विषचि होतें। अमृतामध्यें मिळोन जातें। सुगंधीं सुगंध तें। दुर्गंधीं दुर्गंध ॥ १८ ॥ गुणीं अवगुणीं मिळे। ज्याचें त्यापरी निवळे। त्या उदकाचा महिमा न कळे। उदकेंविण ॥ १९ ॥ उदक वाहे अपरांपर। न कळे नदी कीं सरोवर। जळवास करून राहिले नर। कितीयेक ॥ २० ॥ उगमापैलीकडे गेले। तेथें परतोन पाहिलें। तंव तें उदकचि आटलें। कांहीं नाहीं ॥ २१ ॥ वृत्तिशून्य योगेश्वर। त्यांचा पाहावा विचार। दास म्हणे वारंवार। किती सांगों ॥२२॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चंचळनदीनिरूपणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ आधीं वंदूं सकळकर्ता। समस्त देवांचा जो भर्ता। त्याचे भजनीं प्रवर्ता। कोणीतरी ॥ १ ॥ तेणेंविण कार्य न चाले। पडिलें पर्ण तेंही न हाले। अवघें त्रैलोक्येंचि चाले। जयाचेनी ॥ २ ॥ तो अंतरात्मा सकळांचा। देवदानवमानवांचा। चत्वारखाणीचत्वारवाणींचा। प्रवर्तकु ॥३॥ तो येकलाचि सकळां घटीं। करी भिन्नभिन्न राहाटी। सकळ सृष्टीची गोष्टी। किती म्हणोनी सांगावी ॥ ४ ॥ ऐसा जो गुप्तेश्वर। त्यास म्हणावें ईश्वर। सकळ ऐश्वर्य

तिची सत्ता ब्रह्मांडांत चालते. अनंत प्राणी हीं अनंत पात्रें (भांडीं) आहेत व या सर्व भांड्यांतून तिचें पाणी भरलें आहे, आहे, हें कोठें संसारांत खर्च होतें व कोठें (साधूसंतांच्या ठिकाणीं) पाझरून जातें (त्यांच्या ठिकाणची माया ओझरून जाते) हें पाणी ज्या पदार्थांच्या संगांत जातें त्यासारखें होतें ; सात्त्विकांच्या संगतींत गोड, तामसांच्या संगतींत कडु व राजसांच्या संगतींत खारट तुरट तिखट असें होतें. भूमि खोल पाहिली कीं तें सांचतें म्ह. अज्ञ जीवांच्या ठिकाणीं माया तळ देऊन स्थिर होऊन राहते. ती विषांत विष, अमृतांत अमृत, सुगंधांत सुगंधो व दुर्गंधांत दुर्गंधि होऊन जातें, गुणांत व अवगुणांत मिळून ज्याची त्यापरीची होते. ह्या मायानदीच्या जळाचा महिमा अतर्क्य आहे; तिचें उदक अपरंपार आहे, तिला नदी म्हणावी का नद म्हणावें हें समजत नाहीं. अथांग आहे.कित्येक प्राणी जळांतच राहिले आहेत, मायेंतून त्यांचें डोकें वर निघतच नाहीं. जे मूळ उगमाच्या पलीकडे गेलें म्ह. मायानदी उलट पोंहत जाऊन व मायापार होऊन ब्रह्मस्वरूप झाले ते मागें वळून पाहूं लागले तेव्हां मायानदीच नाहीं, आपण आजवर व्यर्थ भ्रमांत होतों, माया मुळींच मिथ्या आहे असें त्यांना कळून आलें. माया = कल्पना, वृत्ति. योगेश्वर वृत्तिशून्य कसे असतात याचा विचार पहावा (१३–२२). [द० ११, स० ८]

आतां सर्व कर्तृत्वाचें मूळ, सर्व देवांचा नाथ, जो मूळपुरुष (अंतरात्मा) त्याला वंदन करितों. त्याचें भजन अज्ञाना- करितां येणें कठिण, पण कोणी तरी जाणते त्याला जाणून भजतील तर बरें. त्याच्यावांचून झाडाचें पानही हालत नाहीं, फार काय सांगावें, अवघ्या त्रैलोक्याचा चालक तो आहे. चार वाणी व चार खाणी यांचा प्रवर्तक व देवदानवमानव या सर्वांचा अंतरात्मा तोच होय. सर्व घटांत (देहांत) तो एकलाच नांदत असून वेगवेगळया प्रकारें कसा रहाटतो, तें किती म्हणून सांगावें ? त्या गुप्तेश्वरालाच ईश्वर म्हणतात. मोठमोठे त्याच्या सत्तेनेंच ऐश्वर्य भोगतात. त्या विश्वंभराला जो

थोर थोर। जयाचेनि भोगिती ॥ ५॥ ऐसा जेणें वोळखिला। तो विश्वंभरचि जाला। समाधी सहजस्थितीला। कोण पुसे ॥ ६ ॥ अवघें त्रैलोक्य विवरावें। तेव्हां वर्म पडे ठावें। अवचटें घबाड सिणावें। नलगेचि कांहीं ॥ ७ ॥ पाहातां ऐसा कोण आहे। जो अंतरात्मा विवरोन पाहे। अल्प स्वल्प कळोन राहे। समाधानें ॥ ८ ॥ अरे हें पाहिलेंच पाहावें। विवरलेंचि मागुतें विवरावें। वाचिलेंचि वाचावें। पुनः पुन्हां ॥ ९ ॥ अंतरात्मा केवढा कैसा। पाहाणाराची कोण दशा। देखिल्या ऐकिल्या ऐसा। विवेक सांगे ॥ १० ॥ उदंड ऐकिलें देखिलें। अंतरात्म्यास नवचे पुरवलें। प्राणी देहधारी बाउलें। काय जाणे ॥ ११ ॥ पूर्णास अपूर्ण पुरेना। कां जें अखंड विवरेना। विवरतां विवरतां उरेना। देवावेगळा ॥ १२ ॥ विभक्तपणें नसावें। तरीच भक्त म्हणवावें। नाहीं तरी व्यर्थचि सिणावें। खटाटोपें ॥ १३ ॥ उगाच घर पाहोन गेला। घरधणी नाहीं वोळखिला। राज्यामधूनचि आला। परी राजा नेणें ॥ १४ ॥ देहसंगें विषय भोगिले। देहसंगें प्राणी मिरविले। देहधर्त्यास चुकलें। नवल मोठें ॥ १५ ॥ ऐसे लोक अविवेकी। आणि म्हणती आम्ही विवेकी। बरें ज्याची जैसी टाकी। तैसें करावें ॥ १६ ॥ मूर्ख अंतर राखों नेणे। म्हणोन असावे शाहाणे। ते शाहाणेहि दैन्यवाणे। होऊन गेले ॥ १७ ॥ अंतरीं ठेवणें चुकलें। दारोदारीं धुंड्रूं लागलें। तैसें अज्ञानास जालें। देव न कळे ॥ १८ ॥ या देवाचें ध्यान करी। ऐसा

ओळखतो तो विश्वंभरच होतो, त्यांशीं समरस होणारा तोच होतो—अशा अनन्यतेपुढे समाधि, सहजस्थिती इ० कमावलेल्या स्थितींचा काय पाड ? (१–६) सर्व त्रैलोक्याचें विवरण करावें, म्ह० विश्वाची उभारणी व संहारणी पहावी तेव्हांच त्याचें स्वरूप आकळतें व एकदम डबोलें हातीं आल्याचा परमानंद होतो. त्याला कांहीं कष्ट पडत नाहींत. हा अंतरात्मा विवरून पाहणारा व त्यांशीं तद्रूप होणारा महात्मा विरळा, त्याची थोडीशी ओळख होऊन डोलणारेच फार. अरे ! हा अंतरात्मा निरंतर पहावा, दिसत नसेल तर वारंवार मनन करावें, मनन नीट होत नसेल तर त्याचें वर्णन करणारे ग्रंथ पुनः पुन्हां वाचावेत (७–९). हा अंतरात्मा केवढा आहे व कसा आहे, तो पाहूं जाणाऱ्याची स्थिती काय होते हें कसें सांगावें ? लोक जेवढें पाहतात व ऐकतात तेवढेंच बोलतात. पुष्कळ ऐकलें व पाहिलें तरी अंतरात्मा पूर्णपणें कळणार नाहीं. मनुष्य देहधर्तें बाहुलें, तें त्याला काय जाणणार ? तो पडला पूर्ण व पाहणारा अपूर्ण व तोही अखंड विवरील तर त्याला पूर्ण कळेल म्ह० तो त्याहून वेगळा राहणार नाहीं. देवाहून विभक्त (वेगळे) नसावे तरच भक्त म्हणविल्याचें सार्थक, नाहीं तर इतर खटाटोपी व्यर्थ होत (१०–१३). नुसतें घर पाहिलें पण घरधन्यास ओळखलें नाहीं किंवा राज्यांतून येऊन राजाची भेट झाली नाहीं तर जसें व्यर्थ, तसे देहसंगतींत नाना विषय भोगले, मोठें ऐश्वर्य मिरवलें, पण देहाचा चालक ओळखला नाहीं तर सारें व्यर्थ होय. पण नवलाची गोष्ट ही कीं बहुतेक लोक आपणास विवेकी म्हणवितात व वर सांगितल्याप्रमाणें अविचारानें वागतात ! ज्याचा जसा अधिकार किंवा पुण्याई (टाकी), तसें त्यानें वागावें. अंतर म्ह० आंतली ईश्वरी शक्ति मूर्खाला कळत नाहीं, पण शाहाणे म्हणविणारेही मूर्खांसारखेच वागून व्यर्थ दैन्य भोगतात. अंतरींचा (हृदेशीं राहणारा) देव (सर्वांचें जुनें ठेवणें) चुकल्यामुळें घरांत पुरून ठेवलेला ठेवा न सांपडल्यामुळें घरोघर भिक्षा मागत हिंडणाऱ्या करंट्याप्रमाणें, अज्ञ जीव कुचंबत पडतात. चित्तवृत्ति एकदेशी व चंचल (तर्तरीत) अंतरात्म्याचें ध्यान

कोण सृष्टीवरी। वृत्ती येकदेसी तर्तरी। पवाडेल कोठें ॥ १९ ॥ ब्रह्मांडीं दाटले प्राणी। बहुरूपी बहुवाणी ॥ भूगर्भीं आणि पाषाणीं। कितीयेक ॥ २० ॥ इतुकें ठाईं पुरवला। अनेकीं येकचि वर्तला। गुप्त आणि प्रगटला। कितीयेक ॥ २१ ॥ चंचळें न होईजे निश्चळ। प्रचीत जाणावी केवळ। चंचळ तें नव्हे निश्चळ। परब्रह्म तें ॥ २२ ॥ तत्वें तत्व जेव्हां उडे। तेव्हां देहबुद्धि झडे। निर्मळ निश्चळ चहूंकडे। निरंजन ॥ २३ ॥ आपण कोण कोठें कैंचा। ऐसा मार्ग विवेकाचा। प्राणी जो स्वयें काचा। त्यास हें कळेना ॥ २४ ॥ भल्यानें विवेक धरावा। दुस्तर संसार तरावा। अवघा वंशचि उद्धरावा। हरिभक्ती करूनि ॥ २५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अंतरात्मा-विवरणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ आधीं कर्माचा प्रसंग। कर्म केलें पाहिजे सांग। कदाचित पडिलें व्यंग। तरी प्रत्यवाय घडे ॥ १ ॥ म्हणोनी कर्म आरंभिलें। कांहीं-येक सांग घडलें। जेथें जेथें अंतर पडिलें। तेथें हरिस्मरण करावें ॥ २ ॥ तरी तो हरी आहे कैसा। विचार पाहावा आमासा। संध्येपूर्वीं जगदीशा। चोविसां नामीं स्मरावें ॥ ३ ॥ चोविसनामी सहस्रनामी। अनंतनामी तो अनामी। तो कैसा आहे अंतर्यामीं। विविकें वोळखावा ॥ ४ ॥ ब्राह्मण स्नानसंध्या करून आला। मग तो देवार्चनास बैसला। यथासांग तो पूजिला। प्रतिमादेवो ॥ ५ ॥ नानादेवांच्या नानाप्रतिमा। लोक पूजिती धरून प्रेमा।

करण्याकडे मनाची प्रवृत्ति फार थोड्यांची होते. अनेक नामरूपांचे व अनेक शब्दांनीं बोलणारे अनंत प्राणी ब्रह्मांडांत आहेत, कित्येक पृथ्वीच्या व पाषाणांच्याही पोटांत आढळतात; पण या सर्व ठिकाणीं अंतरात्मा भरून राहिला आहे. तो एक असून अनेकांत वर्तत असतो, कोठें प्रकट दिसतो कोठें दिसत नाहीं (१४–२१). चंचळाला निश्चळ केव्हांच होतां येत नाहीं, निश्चळ म्ह० परब्रह्म. ज्या तत्त्वांचा आपला पिंड बनला आहे ती तत्त्वे मूळतत्त्वांत विवेकानें उडविलीं कीं देहावरचें मीपण नाहींसें होतें, व मीपणा जिरल्यावर चहूंकडे निर्मळ, निश्चळ, निरंतर परब्रह्मच भरलें आहे हा प्रत्यय येतो (२२–२३). आपण कोण, कोठें, व कसे आहोंत हें कच्चा म्ह० विवेकहीन जो आहे त्याला कळत नाहीं, म्हणून शाहण्यानें विवेक धरावा, विवेकबळानें दुस्तर भवनदी तरून जावें, व हरिभक्तानें सारा वंश उद्धरावा. वंश म्ह० स्थूल देहाचा वंश नव्हे तर मूळमायेपासून देहापर्यंतचा सारा ब्रह्मवंश (२४–२५). [द० ११, स० ८].

आधीं (प्रथम, आदौ) कर्माशीं संबंध पडतो, (कर्म-उपासना-ज्ञान यांत कर्म प्रथम करावयाचें असतें.) कर्म यथाशास्त्र व यथासांग केलें पाहिजे. कर्मांत कांहीं उणेपणा आला तर उलट विघ्न प्राप्त होतें, म्हणून कर्माला प्रारंभ करावा म्हणजे कांहीं कर्म सांग घडतें आणि जेथें कमीपणा येईल तेथें हरीचें स्मरण करावें (१–२). आतां तो हरि कसा आहे याचा विचार करावा. प्रत्यहीं संध्या करण्यापूर्वीं देवाचीं चोवीस नांवें आपण घेतों. तो २४ नांवांचा, सहस्रनांवांचा, अनंतनांवांचा, व नामातीत परमात्मा कसा आहे. अंतर्यामीं ओळखला पाहिजे. स्नानसंध्या, देवार्चन केलें म्हणजे यथाविधि प्रतिमेची पूजा होते, ज्याला ज्या देवाची प्रीति त्याची तो प्रतिमा करून पूजतो, आतां ह्या सर्व प्रतिमा ज्याच्या आहेत

ज्याच्या प्रतिमा तो परमात्मा । कैसा आहे ॥ ६ ॥ ऐसें वोळखिलें पाहिजे । वोळखोन भजन कीजे । जैसा साहेब नमस्कारिजे । वोळखिल्याउपरी ॥ ७ ॥ तैसा परमात्मा परमेश्वर । बरा वोळखावा पाहोन विचार । तरीच पाविजे पार । भ्रमसागराचा ॥ ८ ॥ पूजा घेताती प्रतिमा । अंगा येतो अंतरात्मा । अवतारी तरी निजधामा । येऊन गेले ॥ ९ ॥ परी ते निजरूपें असती । तें निजरूप ते जगज्जोती । सत्वगुण तयेस म्हणती । जाणती कळा ॥ १० ॥ तये कळेचे पोटीं । देव असती कोट्यानुकोटी । या अनुभवाच्या गोष्टी । प्रत्ययें पाहाव्या ॥ ११ ॥ देहपुरामध्यें ईश । म्हणोन तया नांव पुरुष । जगामध्यें जगदीश । तैसा वोळखावा ॥ १२ ॥ जाणीवरूपें जगदंतरें । प्रस्तुत वर्तती शरीरें । अंतःकरणविष्णु येणें प्रकारें । वोळखावा ॥ १३ ॥ तो विष्णु आहे जगदंतरीं । तोचि आपुले अंतरीं । कर्ता भोक्ता चतुरीं । अंतरात्मा वोळखावा ॥ १४ ॥ ऐके देखे हुंगे चाखे । जाणोन विचारें वोळखे । कित्येक आपुले पारिखे । जाणताहे ॥ १५ ॥ येकचि जगाचा जिव्हाळा । परी देहलोभाचा आडताळा । देहसंबंधें वेगळा । अभिमान धरी ॥ १६ ॥ उपजे वाढे मरे मारी । जैशा उचलती लहरीवरी लहरी । चंचळ सागरीं भरोवरी । त्रैलोक्य होत जातें ॥ १७ ॥ त्रैलोक्या वर्तवितो येक । म्हणोन त्रैलोक्यनायक । ऐसा प्रत्ययाचा विवेक । पाहाना कैसा ॥ १८ ॥ ऐसा अंतरात्मा बोलिला । परी तोहि तत्वांमध्यें आला । पुढें विचार पाहिजे केला ।

तो देव ओळखणें अवश्य नाहीं काय? एखादा मोठा मनुष्य (साहेब) आपण आधीं ओळखतों आणि मग त्याला नमस्कार करितों, तसें देवाला आधीं ओळखावें आणि मग त्याची भक्ति करावी, तरच संसारसागर तरून जाण्याची आशा (३–८). पूजा होते प्रतिमेची, पण पूजकाच्या अंगीं अंतरात्म्याचा संचार होतो; देवाचे किंवा महंताचे अवतार झाले तरी तेही निजरूपीं अंतरात्माच पहातात. सर्वांचें निजरूप अशी ती जगज्योति सत्वगुणाधिष्ठित आहे. सर्वांचे अंतर्यामींची ती जाणीव होय, तिच्या पोटीं असंख्य देव आहेत. ती देवांचा देव आहे. याचा ज्याचा त्यानें प्रत्यय घेऊन पहावा. देहपुरींतला ईश (नियंता) म्हणून त्याला 'पुरुष' म्हणतात. तोच जगदंतरीं जगदीश, किंवा पुरुषांतला उत्तम – पुरुषोत्तम. जाणीवरूपानें सर्व जीवांच्या अंतरीं राहून सर्व शरीरें तो चालवितो तोच विष्णु. तो जगदंतरीं आहे व आपल्याही अंतरीं आहे. तो अंतरात्माच कर्ता भोक्ता असा म्हटला जातो. ऐकणें, पाहणें, हुंगणें, चाखणें, विचार करणें, ओळखणें, आपपर जाणणें, हें सर्व अंतरात्माच करितो. साऱ्या जगाच्या तो अंतरीं राहून तो वर्ततो, तो साऱ्यांचें अंतःकरण (जिव्हाळा) आहे, तोच विष्णु. देहासक्तीमुळें प्रत्येक जीव मी वेगळा आहें असें मिथ्याभिमानानें म्हणत असतो इतकेंच. जन्म मृत्यु, मरणें मारणें, हे दरदेहागणिक वेगवेगळें वाटतें मात्र; पण हें एकाच महासागरावर उचंबळणाऱ्या लहरींनीं आपापलें वेगळेपण भासवण्यासारखेंच भासमात्र आहे. त्रैलोक्य वर्तविणारा त्रैलोक्यनायक एक अंतरात्माच आहे (९–१८). समजुतीसाठीं अंतरात्म्याची ही उभारणी (आवाहन) करून दाखविली, आतां संहारणी (विसर्जन) करून दाखवितों. अंतरात्मा म्हणून वर सांगितला खरा, पण तो सत्वगुणाधिष्ठान म्हणून विष्णु व अंतःकरण या रूपांनीं जगाच्या व जीवाच्या अंतरीं राहतो याचा नीट विचार करून प्रत्यय पाहावा म्हणजे तो तत्त्वांत आला हें समजून येईल. तत्त्वें तितकीं नाशिवंत आहेत, म्हणून तत्त्वें तत्त्वांत सोडून महावाक्याचा विचार करावा. देहबुद्धि सोडून देहातीत अंतरात्मा प्रथम आपल्या अंतरीं पहावा, मग तोच

महावाक्याचा ॥ १९ ॥ आधीं देखिला देहधारी । मग पाहावें जगदंतरीं । तयाचेनियां उपरी । परब्रह्म पावे ॥ २० ॥ परब्रह्माचा विचार । होतां निवडे सारासार । चंचळ जाईल हा निर्धार । चुकेना कीं ॥ २१ ॥ उत्पत्ति स्थिती संव्हार जाण । त्याहून वेगळा निरंजन । येथें ज्ञानाचें विज्ञान । होत आहे ॥ २२ ॥ अष्टदेह थानमान । जाणोन जालियां निरसन । पुढें उरे निरंजन । विमळ ब्रह्म ॥ २३ ॥ विचारेंचि अनन्य जाला । पाहाणाराविण प्रत्यय आला । तेही वृत्ति निवृत्तीला । बरें पाहा ॥ २४ ॥ येथें राहिला वाच्यांश । पाहोन सांडिला लक्ष्यांश । लक्ष्यांशासरिसा वृत्तिलेश । तोहि गेला ॥ २५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे उपदेशनाम समास नवम ॥ ९ ॥

॥ श्रीराम ॥ मूर्ख येकदेसी होतो । चतुर सर्वत्र पाहातो । जैसा बहुधा होऊन भोगितो । नाना सुखें ॥ १ ॥ तोचि अंतरात्मा महंत । तो कां होईल संकोचित । प्रशस्त जाणता समस्त । विख्यात योगी ॥ २ ॥ कर्ता भोक्ता तत्वता । भूमंडळीं सर्व सत्ता । त्यावेगळा त्यास ज्ञाता । पाहेसा कवण ॥ ३ ॥ ऐसें महंतें असावें । सर्व सार शोधून घ्यावें । पाहों जातां न संपडावें । येकायेकीं ॥ ४ ॥ कीर्तिरूपें उदंड ख्यात । जाण ते लहानथोर समस्त । वेष पाहातां शाश्वत । येकही नाहीं ॥ ५ ॥ प्रगटकीर्ति ते ढळेना । बहुतजनांस कळेना । पाहों जातां आडळेना । काय कैसें ॥ ६ ॥ वेषभूषण तें दूषण । कीर्तिभूषण तें भूषण । चाळणेवीण येकक्षण । जाऊंच नेदी ॥ ७ ॥ त्यागी

जगाच्या अंतरीं पहावा आणि मग आपण व जग दोन्ही सोडून महावाक्याचा विचार करावा आणि ब्रह्मपद पावावें. ब्रह्मपदाचा विचार म्हणजे निश्चळ ब्रह्म एक व बाकी सारे चंचळ. एक सार व एक असार. सार शाश्वत व चंचळ असार अशाश्वत हा निश्चय. उत्पत्तिस्थितिलयाहून परमात्मा निराळा आहे या ज्ञानाचाच परिपाक विज्ञानांत (स्वस्वरूपानुभवांत) होत असतो. आठ देहांचें निरसन झालें कीं निरंजन परब्रह्मच उरलें, त्याशीं विचारानें तत्वमसि महावाक्याच्या चिंतनानें—अनन्य होणें, पहाणारा वेगळा न उरतां—त्रिपुटी मोडून पाहणें-रूप होणे, वृत्ति (मी वेगळा, मी परब्रह्म होहि वृत्ति) नाहींशी होऊन निवृत्तिपद अनुभवणें—विज्ञान, साक्षात्कार, सायुज्यता मुक्ति सारीं नांवें यालाच देण्यांत येतात. तत्वमसि या महावाक्याचा वाच्यांश पाहिल्यावर लक्ष्यांश ध्यानीं आणावा, लक्ष्यांशाही सोडून अनन्य व्हावें म्ह. मी ब्रह्म होहि अखेरची ऊर्मि (वृत्तिलेश) सोडावी—सुटलीच ती! (१९–२५) [द० ११, स० ९]

मूर्ख एकदेशी असतो, व चतुर व्यापक असतो. चतुर जणूं अनेकरूपी होऊन अनेक सुखें भोगीत असतो. व्यापकांत अत्यंत व्यापक, बडा महंत म्हणजे अंतरात्माच होय. सर्व जाणता तो. योगी सर्व भूतांतर्यामीं त्याचा वास असल्यामुळें तो अत्यंत प्रशस्त (व्यापक) होय. त्याला संकुचित कोण म्हणेल ? सर्वकर्ता, सर्वभोक्ता तो, साऱ्या सृष्टीवर त्याची सत्ता, त्याचें संपूर्ण ऐश्वर्य पाहील असा त्याच्याहून दुसरा कोण आहे ? (१–३) महंतानें या अंतरात्म्यासारखें सारग्राही व्यापक व्हावें, सर्वत्र असावें पण कोठेंही सहसा सांपडूं नये. महंत कीर्तिरूपानें लहानथोरास माहित असावा, पण त्याचा एकही वेष कायम नसावा. कीर्ति मात्र अचळ पण मूर्ति पाहून सामान्य जनास याचें कांहींएक कळूं नये. कीर्ति हें खरें भूषण, वेषाचें कसचें भूषण ? वेश नाना प्रकारचे, पण अंतर्यामीं चाळणा (चिंतन) सतत चाललेली. ओळखीचे लोक सोडून हा

वोळखीचे जन । सर्वकाळ नित्यनूतन । लोक शोधुन पाहाति मन । परी इच्छा दिसेना ॥ ८ ॥ पुतें कोणाकडे पाहेना । पुतें कोणासीं बोलेना । पुतें येके स्थळीं राहेना । उठोन जातो ॥ ९ ॥ जातें स्थळ तें सांगेना । सांगितलें तरी तेथें जायेना । आपुली स्थिती अनुमाना । येवोंच नेदी ॥ १० ॥ लोकीं केलें तें चुकवी । लोकीं भाविलें तें उलथवी । लोकीं तर्किलें तें दावी । निर्फळ करूनी ॥ ११ ॥ लोकांसी पाह्याचा आदर । तेथें याचा अनादर । लोक सर्वकाळ तत्पर । तेथें याची अनिच्छा ॥ १२ ॥ एवं कल्पितां कल्पेना । ना तर्कितांही तर्केना । कदापी भावितां भावेना । योगेश्वर ॥ १३ ॥ ऐसें अंतर सांपडेना । शरीर ठाईं पडेना । क्षणयेक विसंबेना । कथाकीर्तन ॥ १४ ॥ लोक संकल्पविकल्प करिती । ते अवघेचि निर्फळ होती । जनाची जना लाजवी वृत्ति । तेव्हां योगेश्वर ॥ १५ ॥ बहुतीं शोधून पाहिलें । बहुतांच्या मनास आलें । तरी मग जाणावें साधलें । महत्कृत्य ॥ १६ ॥ अखंड येकांत सेवावा । अभ्यास करीतचि जावा । काळ सार्थकचि करावा । जनासहित ॥ १७ ॥ उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनांस सिकवावे । उदंड समुदाय करावे । परी गुप्तरूपें ॥ १८ ॥ अखंड कामाची लगबग । उपासनेस लावावें जग । लोक समजोन मग । आज्ञा इच्छिती ॥ १९ ॥ आधीं कष्ट मग फळ । कष्टचि नाहीं तें निर्फळ । साक्षेपेंवीण केवळ । वृथा पुष्ट ॥ २० ॥ लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जाणावे । जाणजाणोन धरावे । जवळी दुरी ॥ २१ ॥

नित्य नवीन लोकांत फिरत असतो, लोक याला काय पाहिजे म्हणून याचें मन शोधून पाहत असतात, पण हा अत्यंत निरिच्छ आहे असेंच सर्वांस आढळून येतें. धड कोणाकडे पहात नाहीं, धड कोणाशीं बोलत नाहीं, धड एके ठिकाणीं राहत नाहीं–निघून जातो. जेथें जातो तें स्थळ सांगत नाहीं, सांगितलें तर तेथें जात नाहीं. याची स्थिति कोणाला अनुमानतांच येत नाहीं. लोक करतील तें हा चुकवितो, लोकांचे भाव व तर्क उलथून पाडतो. याला पाहण्यासाठीं लोक हपापलेले–पण हा लोकांच्या मेळ्यांत यायचाच नाहीं; लोकांचा जेथें आदर तेथें याची अनिच्छा. तात्पर्य, या योगेश्वरापुढें कोणाची कल्पना, भावना, तर्क कांहींएक चालत नाहीं (४–१३). याप्रमाणें त्याचें मनोगत कोणालाही कळत नाहीं, त्याचा देह कोठें जातो येतो तें समजत नाहीं, तथापि हा हरिकीर्तनाला क्षणभरही विसरत नाहीं. लोकांचे संकल्प विकल्प (बऱ्यावाईट) कल्पना हा निष्फळ करून टाकतो, व याप्रमाणें आपले तर्कवितर्क फजीत झाले असें लोकांच्या परभारें प्रत्ययाला आणून देतो. बहुतांना शोधपूर्वक पाहिल्यावर याचेंच म्हणणें पटतें. असें झालें म्हणजे महत्कृत्य साधलें असें समजावें (१३–१६). महंतानें अखंड एकांतांत असावें, आपला अभ्यास (ध्यानधारणानामजपादि) सोडूं नये, आपलें आयुष्य सार्थकीं लावावें व इतरांचेंही सफल करावें. प्राणिमात्रांचे उत्तम गुण तेवढे घ्यावे व तेच जनांस शिकवावे, याप्रमाणें आपल्या संप्रदायांत अनेक लोक घेऊन त्यांचे संघ बनवावे पण ते गुप्त ठेवावे (एकाचे एकास कळों नये). एकामागें एक अशीं अनेक कामें अंगावर घेऊन त्या उद्योगांत गुंग असावें, लोक उपासनेस (भजन–मार्गास) लावावे, लोकांस कळत चाललें कीं मग शब्द झेलण्यास तत्पर होतात, आधीं उदंड कष्ट आणि मग मोठें फळ असा नियम आहे. ज्यांत कष्टच नाहींत त्याचें फळही शून्य. साक्षेप (उद्योग) न करितां गलेलठ्ठपणा काय कामाचा बारकाईनें लोक परिक्षून, ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें त्याला जवळ किंवा दूर ठेवावें. अधिकाराप्रमाणें लोकांच्या हातून

अधिकारपरत्वें कार्य होतें । अधिकार नस्तां व्यर्थ जातें । जाणोनि शोधावीं चित्तें । नाना प्रकारें ॥ २२ ॥ अधिकार पाहोन कार्य सांगणें । साक्षेप पाहोन विश्वास धरणें । आपला मगज राखणें । कांहींतरी ॥ २३ ॥ हें प्रचीतीचें बोलिलें । आधीं केलें मग सांगितलें । मानेल तरी पाहिजे घेतलें । कोणीयेकें ॥ २४ ॥ महंतें महंत करावे । युक्तिबुद्धीनें भरावे । जाणते करून विखरावे । नाना देसीं ॥ २५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे निस्पृहवर्तणुकनाम समास दशम ॥ १० ॥

कार्यें होतात, अधिकार अंगीं नसल्यास तें तें कार्य होत नाहीं, म्हणून अनेक प्रकारांनीं मनुष्यांचे अधिकार (योग्यता, कार्यकर्तृत्व) पाहात असावें. अधिकार पाहून योग्य तें काम सांगावें, उद्योग किंवा व्याप पाहून विश्वास धरावा, आपलें महत्त्व राखून कार्य करून घ्यावें. हें अनुभवाचें सांगणें आहे. (समर्थ म्हणतात) याप्रमाणें मी स्वतः वागलों आहें व करून सांगत आहें. मानेल तर कोणीतरी घ्यावें. महंतानें आपल्यासारखे दुसरे महंत करावे, युक्तिबुद्धि शिकवून तयार करावे व अनेक स्थळीं ते पसरून ठेवावे (१७–२५). [द० ११ स० १०]